सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शुक्रवार, ८ मे २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक १५९ । पाने १२ । किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# ममता सरकार बरखास्त

## राज्यपालांनी जारी केला आदेश ● घटनात्मक तरतुदीचा केला वापर ● आडमुठेपणा भोवला

◆ **कोलकाता, ७ मे**

राजीनामा देणार नाही, अशी आडमुठेपणाची भूमिका पराभवानंतरही घेणाऱ्या ममता बॅनर्जी यांचे सरकार राज्यपाल आर. एन. रवी यांनी गुरुवारी सायंकाळी घटनात्मक तरतुदीचा वापर करीत बरखास्त केले. विधानसभेचा कार्यकाळ आज संपुष्टात आल्यानंतर त्यांनी तृणमूल काँग्रेसचे सरकार बरखास्त करण्याचा आदेश जारी केला.

ममता आणि त्यांचे संपूर्ण मंत्रिमंडळच बरखास्त झाले असून, राज्यात नवीन सरकार स्थापन होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नवीन सरकार स्थापन होईपर्यंत राज्यपालांच्या अखत्यारित राज्याचा कारभार राहणार आहे. विधानसभा निवडणुकीत बंगालच्या जनतेने भाजपाच्या बाजूने कौल दिली. मात्र, ममता बॅनर्जी यांनी निकाल मान्य नसल्याचे स्पष्ट करीत मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणार नसल्याचे जाहीर केले होते.

राज्यातील राजकीय संघर्षाच्या पृष्ठभूमीवर गुरुवारी विधानसभेचा कार्यकाळ पूर्ण होताच सायंकाळी राज्यपाल रवी यांनी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १७४(२)(ब) अंतर्गत ममता सरकार बरखास्त करण्याचा आदेश काढला. या आदेशात स्पष्ट करण्यात आले की, पश्चिम बंगाल विधानसभा ७ मे २०२६ पासून विसर्जित करण्यात आली आहे. या अधिसूचनेवर बंगालचे मुख्य सचिव दुष्यंत नारियाला यांचीही स्वाक्षरी आहे. यामुळे बंगालमधील ममता यांच्या १५ वर्षांची सत्ता संपुष्टात आली.



चंद्रनाथ रथ यांच्या हत्येच्या तपासादरम्यान भाजपा नेते उत्तर २४ परगणा येथील बारासात वैद्यकीय महाविद्यालयात दाखल झाले. यावेळी मोठी गर्दी उसळली होती

### चंद्रनाथ रथ यांच्या हत्येची एसआयटी चौकशी

उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील मध्यमग्राम येथे बुधवारी रात्री भाजपा नेते शुभेंदू अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक चंद्रनाथ रथ यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. याप्रकरणाची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आले. पोलिस पथकाने तीन संशयितांना ताब्यात घेतले असून, त्यांची चौकशी सुरू आहे. ◀*(वृत्तसंस्था)*

> ही राष्ट्रपती राजवट नसून एक अंतरिम व्यवस्था आहे. नवीन सरकारचा शपथविधी होईपर्यंत राज्यपाल प्रशासनाचा कार्यभार सांभाळतील. बंगालचा कारभार आता थेट राजभवनाच्या देखरेखीखाली असेल.''
>
> **- जवाहर सरकार,** माजी केंद्रीय सचिव

> चंद्रनाथ यांची हत्या पूर्वनियोजित कट होता. ममता बॅनर्जी यांचा पराभव केल्यामुळेच त्यांच्या सूचनेवरून माझ्या स्वीय सहाय्यकाची हत्या करण्यात आली. मारेकऱ्यांना अटक करून कठोर शिक्षा करावी.
>
> **- सुवेंदू अधिकारी,** भाजपा नेते

### बॉम्बहल्ल्यात भाजपाचे पाच कार्यकर्ते जखमी

निवडणुकीनंतर सुरू झालेल्या हिंसाचारादरम्यान गुरुवारी उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील पाणीहाटी परिसरात दुचाकीवर आलेल्या दोघांनी भाजपा कार्यलयासमोर गावठी बॉम्ब फेकले. स्फोटात भाजपाचे पाच कार्यकर्ते जखमी झाले. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहे. ■

### हावडासह विविध जिल्ह्यांत हिंसाचार

हावडा येथेही भाजपा कार्यकर्त्यांवर हल्ला करण्यात आला. यात तीन कार्यकर्ते जखमी आहे. याशिवाय उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील बशीरहाट परिसरात रोहित राय नावाच्या भाजपा कार्यकर्त्यावर गोळीबार झाला. उत्तर कोलकात्याच्या बारानगर भागातही एका भाजपा कार्यकर्त्याला चाकूने भोसकले. सातत्याने होणाऱ्या हल्ल्यांमुळे भाजपा कार्यकर्ते आक्रमक झाले आणि त्यांनी ठिकठिकाणी निषेध आंदोलने केली. अनेक ठिकाणी तृणमूल काँग्रेस आणि भाजपा कार्यकर्त्यांत हाणामारी झाली. पोलिस आणि केंद्रीय राखीव दलाचे जवान हिंसाचारग्रस्त भागात तैनात करण्यात आले आहेत. ■

# चूक केल्यास नकाशा बदलणार

## भारतीय सैन्यदलाचा पाकिस्तानला इशारा



**जयपूर, ७ मे**

भारताने नेहमीच 'जगा द्या आणि जगू द्या'चे पालन केले आहे. पण, ही भावना तुडवली जाते, तेव्हा देश निर्णायक कारवाईतून प्रत्युत्तर देतो, हे 'ऑपरेशन सिंदूर'ने दाखवून दिले. 'ऑपरेशन सिंदूर' अंत नसून सुरुवात आहे. अजूनही शत्रूच्या प्रत्येक हालचालींवर आमचे लक्ष्य आहे. कोणतीही चूक केल्यास शत्रू देशाचा नकाशा बदलला जाईल. तिन्ही दल युद्धासाठी सज्ज असल्याचा इशारा उपलष्करप्रमुख लेप्टनंट जनरल राजीव घई यांनी दिला.

'ऑपरेशन सिंदूर'च्या वर्षपूर्तीनिमित्त जयपूरमध्ये तिन्ही दलाचे अधिकारी एकत्र आले. गुरुवारी दुपारी साऊथ वेस्टर्न कमांडमध्ये झालेल्या पत्रपरिषदेत लेफ्टनंट जनरल राजीव घई, व्हाईस ॲडमिरल ए. एन. प्रमोद (डीजी नौदल ऑपरेशन्स) आणि लेफ्टनंट जनरल झुबिन मिनवाला (उपप्रमुख एकात्मिक संरक्षण दल) उपस्थित होते. लेफ्टनंट जनरल राजीव घई म्हणाले, सीमेपलीकडून अतिरेकी कारवाया केल्या गेल्यास, त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी आराखडा तयार आहे.

पाकिस्तानकडून झालेल्या हल्ल्यात कोणत्याही लष्करी पायाभूत सुविधा, नागरी संरचनांचे नुकसान झालेले नाही. पाकिस्तानकडून काहीही सांगितले जात असले तरी या थापा तुम्हाला विजय मिळवून देऊ शकत नाही. विजयाचे मोजमाप हे ठोस तथ्यांवरून केले जाते. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये आम्ही ९ दहशतवादी अड्डे आणि ११ हवाई तळांना लक्ष्य केले. जमिनीवरून आणि हवाई हल्ल्यात त्यांची १३ विमाने नष्ट झाली तसेच ३०० किमी अंतरावरून त्यांचे ॲवॉक्स विमानही उद्ध्वस्त केले. ◀*(वृत्तसंस्था)*


### विचारपुष्प



राष्ट्राच्या जडणघडणीत सामान्य माणसाचा सहभाग असावा लागतो. तसा तो राहिला तरच सामान्य माणसाला देश आणि देशातील संस्था आपल्या वाटू लागतात.

**स्व. मधुभाई कुलकर्णी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

### विनम्र अभिवादन



रवींद्रनाथ टागौर यांची आज जयंती

### महत्त्वाचे

#### शेअर बाजार अस्थिर; सेन्सेक्स-निफ्टी सपाट

**मुंबई** : शेअर बाजारांत गुरुवारी सलग दुसऱ्या दिवशी कमालीची अस्थिरता दिसून आली. अमेरिकेने इराणसोबत शांतता करार केल्याच्या बातम्यांमुळे भू-राजकीय तणाव निवळण्याची शक्यता निर्माण झाली होती. यामुळे सुरुवातीला निफ्टी २४,३३० अंकांच्या वर टिकून राहण्यात यशस्वी झाला. मात्र, वरच्या स्तरावर नफा वसुली झाल्यामुळे बाजाराने सुरुवातीची सर्व वाढ गमावली आणि दिवसअखेर दोन्ही निर्देशांक सपाट स्तरावर बंद झाले. गुरुवारी बाजार उघडताना असलेला सकारात्मक कल टिकवून ठेवण्यात गुंतवणूकदारांना अपयश आले. व्यवहार थांबले तेव्हा सेन्सेक्स ११४ अंकांनी म्हणजेच ०.१५ टक्क्यांनी घसरून ७७,८४४.५२ वर स्थिरावला. तसेच, निफ्टी ४.३० अंकांच्या किरकोळ घसरणीसह २४,३२६.६५ वर बंद झाला. ■

#### आज दहावीचा निकाल; दुपारी एक वाजता ऑनलाईन

**पुणे** : दहावीच्या विद्यार्थ्यांची निकालाची प्रतीक्षा अखेर संपली असून, शुक्रवारी दुपारी एक वाजता इयत्ता दहावीचा निकाल मंडळाने जाहीर केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन पाहता येणार आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सचिव डॉ. दीपक माळी यांनी ही माहिती दिली. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा घेण्यात आली होती. विद्यार्थ्यांना विषयनिहाय गुण संकेतस्थळांवरून उपलब्ध होतील आणि निकालाची प्रत (प्रिंट) देखील घेता येईल. शिक्षण मंडळाने जारी केलेल्या अधिकृत संकेतस्थळावरून विद्यार्थ्यांना निकाल बघता येणार आहे. ■

### अंतरंग

३ परकीय चलनात भारत अव्वल
४ 'हिंसा संस्कृती' ठेचून काढा! (अग्रलेख)
६ पहिली विश्व योगासन स्पर्धा अहमदाबादमध्ये
२ सार्वभौमत्वाला आव्हान सहन करणार नाही

# सोहराबुद्दिन चकमकीतील २२ आरोपी निर्दोष

◆ **मुंबई, ७ मे**

गुंड सोहराबुद्दिन शेख, त्याची पत्नी कौसर बी आणि त्यांचा साथीदार तुळशीराम प्रजापती यांच्याशी संबंधित २००५ मधील चकमक प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने विशेष न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत सर्व २२ आरोपींच्या निर्दोष मुक्ततेवर शिक्कामोर्तब केले.

उच्च न्यायालयाचे मु'य न्यायाधीश श्री चंद्रशेखर आणि न्या. गौतम अंकहर यांच्या खंडपीठाने गुरुवारी सोहराबुद्दीनचे भाऊ रुबाबुद्दीन आणि नयाबुद्दीन यांनी दाखल केलेली याचिका फेटाळून लावली. या याचिकांमध्ये त्यांनी डिसेंबर २०१८ च्या विशेष न्यायालयाच्या सर्व आरोपींना निर्दोष मुक्त करणाऱ्या निकालाला आव्हान दिले होते. निर्दोष मुक्त झालेल्या २२ आरोपींपैकी २१ जण गुजरात आणि राजस्थान पोलिसांचे कनिष्ठ अधिकारी होते. ◀*(वृत्तसंस्था)*

# यवतमाळ, अमरावती जिल्ह्यांत गारपीट

## उमरेडमध्ये वीज पडून एक ठार

◆ **नागपूर, ७ मे**

यवतमाळ, अमरावती आणि भंडारा जिल्ह्यात गुरुवारी दुपारनंतर विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. यवतमाळ, आर्णी, दिग्रस, घाटंजी, दारव्हा व उमरखेड शहरात दुपारी दीडच्या सुमारास गारपिटीसह पाऊस झाला. उमरखेड तालुक्यात वीज पडून एक जण ठार झाला. वादळामुळे अनेक घरांची टिनपत्रे उडून गेली, तर काही ठिकाणी मोठमोठी झाडे उन्मळून पडली.

खैरी ते मारेगावदरम्यान दापोरा मार्गावर झालेल्या वादळी पावसात रस्त्यालगतचे काटेरी झाड अंगावर कोसळल्याने दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. आर्णी तालुक्यातील साकूर, मुकिंदपूर, अंबोडा, कवठाबाजार, कोसदनीसह अनेक गावांत वादळी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. राणीधानोरा कवठाबाजार येथे पावसासह गारपीट झाल्याचे वृत्त आहे. यामुळे तीळ, मूग, ज्वारी आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. साकूर येथे घरावरील टिनपत्रे उडून गेल्याने घरातील धान्य भिजले. दत्तात्रेय भालेराव यांच्या बाथरूमवर कडुलिंबाचे मोठे झाड कोसळले तसेच झोपडपट्टीतील रामदास खाडे यांच्या घरावर झाड कोसळल्याने मोठे नुकसान झाले. लोणबेहळ परिसरातील शेतकऱ्यांची पिके उद्ध्वस्त झालीत. शिवाय शेतातील गाई, म्हशी, शेळ्या आदी जनावरे जखमी झाली. वादळी पावसात झालेल्या नुकसानीची पाहणी करून भरपाई देण्यात यावी, अशी मागणी होत आहे.



वादळात उडून गेलेला टिनपत्रा

### नागपुरात वादळी वाऱ्यासह पाऊस

शहरासह जिल्ह्यात गुरुवारी दुपारनंतर वातावरणात अचानक बदल झाला. रणरणत्या उन्हानंतर वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. शहरात मात्र तुरळक पाऊस होता. शहरातील काही भागांत पाऊस तर, काही भागांत केवळ वादळी वाऱ्याने हजेरी लावली. काटोलमध्ये काहीप्रमाणात गारपीट झाल्याचे वृत्त आहे. जिल्ह्यातील भिवापूर, उमरेड आणि काटोलमध्ये तुरळक पाऊस झाला. ■

### अमरावतीत वादळी पाऊस

जिल्ह्यातील काही भागांमध्ये दुपारी सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाची नोंद झाली. अचलपूर, चांदूर बाजार, दर्यापूरच्या काही भागांत पाऊस झाला. अमरावती शहरातही वारे जोरात वाहत होते. दुपारी १२ नंतर कधी उन्ह तर कधी ढगाळ वातावरण होते.

### अकोल्यात काही ठिकाणी गारपीट

शहर आणि जिल्ह्यात ४६ अंशांपेक्षा अधिक तापमानाचा तडाखा सहन करणाऱ्या अकोलेकरांना गुरुवारी दुपारी १ ते दीडच्या सुमारास अल्पकाळ आलेल्या पावसाने थोडा दिलासा दिला. जिल्ह्यात काही ठिकाणी गारपीट झाल्याचेही वृत्त आहे. दुपारी आभाळ ढगांनी भरून आले व उन्हाचा तडाखा कमी झाल्याचे जाणवत असतानाच पावसाला सुरुवात झाली. ◀*(तभा वृत्तसेवा)*

# बहुमत सिद्ध करण्यासाठी विजय यांनी मागितली मुदत

◆ **चेन्नई, ७ मे**

तामिळनाडूमध्ये सर्वाधिक जागा जिंकणाऱ्या टीव्हीके पक्षासाठी सरकार स्थापन करणे कठीण होत आहे. पक्षाचे प्रमुख आणि अभिनेते विजय यांनी गुरुवारी सलग दुसऱ्या दिवशी राजभवन येथे राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर यांची भेट घेतली. त्यांनी बहुमत सिद्ध करण्यासाठी दोन महिन्यांची मुदत मागितल्याची माहिती सूत्रांनी दिली.



राज्यात स्थिर सरकार हवे आहे, असे राज्यपालांनी स्पष्ट केले. त्यामुळे सत्ता स्थापनेचा दावा करण्यापूर्वी ११८ आमदारांचे संख्याबळ असणे आवश्यक आहे. जोपर्यंत विजय राज्यपालांकडे ११८ आमदारांच्या पाठिंब्याचे पत्र सादर करत नाहीत, तोपर्यंत ते मुख्यमंत्रिपदाची शपथ घेऊ शकणार नाहीत, असे सूत्रांनी सांगितले.

अशा एका प्रस्तावावर चर्चा होत आहे, ज्यामध्ये अण्णाद्रमुक सरकार स्थापन करेल आणि द्रमुक बाहेरून पाठिंबा देईल. या सूत्रानुसार लहान पक्षांचा पाठिंबा घेण्याबाबतही विचार सुरू आहे. मात्र, अद्याप कोणताही अधिकृत निर्णय झालेला नाही. विजय यांनी दोन मतदारसंघांतून निवडणूक लढविली होती आणि दोन्ही ठिकाणी विजय मिळवला. एका जागेचा राजीनामा दिल्यावर टीव्हीकेच्या संख्याबळात घट होईल. त्यानंतर सत्तास्थापनेसाठी त्यांना आणखी सात आमदारांच्या समर्थनाची आवश्यकता भासणार आहे. ◀*(वृत्तसंस्था)*

# बिहारमध्ये ३२ मंत्र्यांनी घेतली शपथ

## सम्राट चौधरी यांच्या मंत्रिमंडळाचा विस्तार




शपथविधी सोहळ्याला उपस्थित पंतप्रधान नरेंद्र मोदी, बिहारचे राज्यपाल सय्यद अता हसनैन, मुख्यमंत्री सम्राट चौधरी आणि इतर मान्यवर

◆ **पाटणा, ७ मे**

मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्या गुरुवारी झालेल्या मंत्रिमंडळ विस्तारात ३२ नेत्यांना राज्यपाल ले. सय्यद अता हसनैन यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. सोहळ्याला पंतप्रधान मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि भाजपा अध्यक्ष नितीन नवीन उपस्थित होते. मंत्रिमंडळात माजी उपमुख्यमंत्री विजयकुमार सिन्हा, माजी मंत्री श्रवणकुमार आणि अशोक चौधरी यांचाही समावेश आहे.

या मंत्रिमंडळ विस्तारात भाजपाचे १५, जदयूचे १३, एलजेपी रामविलासचे दोन आणि एचएएम व आरएलएमचे प्रत्येकी एका नेत्याने मंत्री म्हणून शपथ घेतली. जदयूच्या तीन नवीन चेहऱ्यांनी शपथ घेतली. यात माजी मुख्यमंत्री नितीश कुमार यांचे पुत्र निशांतकुमार, बुलो मंडल आणि श्वेता गुप्ता यांचा समावेश आहे.

बिहार भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि माजी उपमुख्यमंत्री विजयकुमार सिन्हा पुन्हा एकदा नव्या सरकारमध्ये मोठी जबाबदारी मिळाली आहे. त्यांच्या मजबूत संघटनात्मक स्थितीमुळे, सभागृहातील आक्रमक शैलीमुळे आणि प्रशासकीय अनुभवामुळे पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर सातत्याने विश्वास ठेवला आहे. आमदार ते मंत्री, विधानसभेचे अध्यक्ष, विरोधी पक्षनेते, उपमुख्यमंत्री आणि आता सम्राट मंत्रिमंडळातील त्यांचे यश, हे बिहारच्या राजकारणातील त्यांच्या मजबूत अस्तित्वाची साक्ष आहे. ◀*(वृत्तसंस्था)*

# उपमुख्यमंत्री शिंदेंचे हेलिकॉप्टर वादळात अडकले

◆ **मुंबई, ७ मे**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हेलिकॉप्टरला आज मुंबईच्या आकाशात निसर्गाच्या रौद्र रूपाचा सामना करावा लागला. महालक्ष्मी रेसकोर्सवरून कल्याण-मुरबाडच्या दिशेने उड्डाण घेतलेले हेलिकॉप्टर अचानक सुटलेल्या वादळी वाऱ्यात आणि मुसळधार पावसात सापडले. निसर्गाच्या या कोपामुळे निर्माण झालेल्या अत्यंत कठीण परिस्थितीत वैमानिकाने दाखवलेल्या कमालीच्या धैर्यामुळे मोठा अनर्थ टळला असून, जुहू विमानतळावर विमानाचे सुरक्षित इमर्जन्सी लॅण्डिंग करण्यात आले. ◀*(तभा वृत्तसेवा)*

# अपहरणाचा बनाव; पित्यालाच मागितली खंडणी

## पोलिसांनी १२ तासांत केला पर्दाफाश

◆ **मेहकर, ७ मे**

स्वतःच्याच अपहरणाचा बनाव करून वडिलांकडे ४० तोळे सोन्याची खंडणी मागणाऱ्या मुलाचा प्रताप मेहकर पोलिसांनी अवघ्या १२ तासांत उघडकीस आणला. आर्थिक अडचण दूर करण्यासाठी एका मित्राच्या मदतीने हे सर्व 'नाट्य' रचल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले.

जनार्दन काळे (रा. रायपूर ता. मेहकर) यांचा १९ वर्षीय मुलगा चेतन ६ मे रोजी बी.एस्सीची परीक्षा देण्यासाठी ब्रह्मपुरी तालुका मेहकर येथील छगन भुजबळ महाविद्यालयात गेला होता. मात्र, सायंकाळपर्यंत तो परतला नाही. जनार्दन काळे यांना चेतनच्याच मोबाईलवरून दुपारी एक व्हिडीओ आणि संदेश प्राप्त झाला.

या व्हिडीओमध्ये चेतनला बांधून ठेवल्याचे दिसत होते. तुमचा मुलगा आमच्या ताब्यात आहे, त्याला जिवंत पाहायचे असेल तर, दोन तासांत ४० तोळे सोने घेऊन एकट्याने शेगाव रेल्वे स्टेशनवर या, अशी धमकी अज्ञाताने दिली होती. याप्रकरणी मेहकर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली.

पोलिसांनी तातडीने तपास पथके तयार केली. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची चक्रे फिरविली. तपासादरम्यान, पोलिसांना संशय आल्याने त्यांनी नाशिक ग्रामीणमधील लासलगाव परिसरातून चेतन काळे आणि त्याचा मित्र विवेक सखाराम काकडे (रा. पोखरी) फाटा यांना ताब्यात घेतले.

पोलिसांनी दोघांनाही विश्वासात घेऊन विचारपूस केली असता, धक्कादायक वास्तव समोर आले. आर्थिक अडचणीमुळे त्याने स्वतःच्याच अपहरणाचा डाव रचला होता. वडिलांकडून मोठी रक्कम किंवा सोने उकळण्यासाठी त्यांनी हा कट आखला होता. या प्रकरणात आणखी काही साथीदार असण्याची शक्यता असून, पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक अशोक अवचार करीत आहे. ◀*(तभा वृत्तसेवा)*

# ३०० कोटी वृक्षारोपणासाठी 'हरित महाराष्ट्र आयोग' स्थापन

## वनाच्छादन ३३ टक्क्यांपर्यंत नेण्यासाठी राज्य सरकारचा 'मास्टरप्लॅन'

◆ **मुंबई, ७ मे**

वाढते प्रदूषण आणि हवामान बदलाच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने गुरुवारी एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. राज्यातील वनाच्छादन वाढवण्यासाठी आणि ३०० कोटी वृक्षारोपण मोहिमेचे नियोजन करण्यासाठी 'हरित महाराष्ट्र आयोग' स्थापन करण्यास महसूल व वन विभागाने मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील हा आयोग राज्याच्या पर्यावरण संवर्धनाला नवी दिशा देणार आहे.



राष्ट्रीय वन धोरणानुसार, कोणत्याही राज्याचे किमान ३३ टक्के क्षेत्र वनाच्छादित असणे आवश्यक आहे. महाराष्ट्राचे सध्याचे वनाच्छादन २१.२५ टक्के असून, ते ३३ टक्क्यांपर्यंत नेण्याचे मोठे उद्दिष्ट आयोगाला दिले आहे. केवळ वृक्षारोपणच नाही, तर लावलेली झाडे जगवणे आणि त्यांच्या संवर्धनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे ही या आयोगाची मुख्य जबाबदारी असेल.

### आयोगाची रचना आणि कार्यपद्धती

'हरित महाराष्ट्र आयोग' हा एक उच्चाधिकार संपन्न गट म्हणून काम करेल. देवेंद्र फडणवीस या आयोगाचे अध्यक्ष असतील. उपमुख्यमंत्री आणि वनमंत्री हे उपाध्यक्ष म्हणून काम पाहतील. मुख्य सचिव, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव आणि वन विभागाचे प्रधान सचिव हे या आयोगाचे सदस्य असतील. आयोग दर सहा महिन्यांतून किमान एकदा बैठक घेऊन मोहिमेच्या प्रगतीचा आढावा घेईल. ■

### हरित पायाभूत सुविधांवर भर

केवळ जंगले वाढवणे हाच या आयोगाचा उद्देश नसून, शहरांमध्ये 'नागरी वने' विकसित करणे, रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण करणे आणि हरित पायाभूत सुविधांची निर्मिती करणे यावरही भर दिला जाणार आहे. बांबू लागवडीसारख्या उपक्रमांना प्रोत्साहन देऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देण्याचे नियोजनही या आयोगाच्या माध्यमातून केले जाईल. ◀*(तभा वृत्तसेवा)*

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### दहशतवाद्यांना लपायला जागा नाही : रुवेन अझार



**नवी दिल्ली** : 'ऑपरेशन सिंदूर'च्या पहिल्या वर्षपूर्तीनिमित्त, इस्रायलचे राजदूत रुवेन अझार यांनी भारताला पाठिंबा व्यक्त करीत, दहशतवाद्यांना आता लपायला जागा उरलेली नाही अशा शब्दांत पाकिस्तानला टोला लगावला. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानी भूमीवर फोफावलेल्या दहशतवाद्यांविरुद्ध भारताने केलेल्या ऐतिहासिक प्रत्युत्तरात्मक कारवाईची आठवण करून देताना अझार यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले की, निष्पाप लोकांचे बळी घेणाऱ्या दहशतवाद्यांसाठी आता कोणतेही सुरक्षित आश्रयस्थान उरलेले नाही. भारतासोबतच्या दहशतवाद्याविरोधातील लढ्यात इस्रायलचा पूर्ण पाठिंबा आहे.



एका व्यावसायिक कार्यक्रमात सहभागी झालेली बॉलिवूड अभिनेत्री वामिका गब्बी

# सार्वभौमत्वाला आव्हान सहन करणार नाही

## राष्ट्रपतींनी ठणकावले ● देश एकजूट आणि जोरदार प्रत्युत्तर देण्यास सज्ज



◆ **नवी दिल्ली, ७ मे**

'ऑपरेशन सिंदूर' दहशतवादाविरुद्ध भारताचा दृढ निर्धार आणि लष्करी सामर्थ्याचे प्रतीक आहे. या मोहीमेने जगाला लष्कराचा उत्कृष्ट समन्वय, अचूक कारवाई आणि भारताची वाढती लष्करी ताकद दाखवून दिली आहे. देशाच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणे सहन केले जाणार नाही आणि त्यांनी हे लक्षात ठेवावे की देश सतर्क, एकजूट आणि जोरदार प्रत्युत्तर देण्यासाठी सज्ज आहे, अशा शब्दांत राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांनी अप्रत्यक्षपणे पाकिस्तानला इशारा दिला.

राष्ट्रपती मुर्मू यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले की, पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय सैन्यदलाने राबविलेले 'ऑपरेशन सिंदूर' हे दहशतवाद आणि राष्ट्राच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्या शक्तींविरुद्ध भारताच्या अढळ निर्धाराचे प्रतीक आहे. या मोहिमेचे उल्लेखनीय यश भारतीय सशस्त्र दलांचे शौर्य, दृढनिश्चय आणि व्यावसायिकता दर्शवते. भारतीय लष्कराने पहलगाममधील अमानुष दहशतवादी हल्ल्याला अचूक आणि जोरदार प्रत्युत्तर दिले. जे भारताला धमकावण्याचा प्रयत्न करत आहेत, त्यांनी हे लक्षात ठेवावे की, देश सतर्क, एकजूट आणि जोरदार प्रत्युत्तर देण्यासाठी सज्ज आहे. शत्रूचा कोणताही कट उद्ध्वस्त करण्यासाठी देशाचे तिन्ही दल सज्ज आहे. भारताचा दहशतविरुद्धचा लढा यापुढे सुरूच राहील. मी सैनिकांचे शौर्य, त्याग आणि समर्पणाला सलाम करते.

### दहशतवाद ठेचून काढण्यास कटिबद्ध : पंतप्रधान




'ऑपरेशन सिंदूर'च्या वर्षपूर्तीनिमित्त 'एक्स'वरील पोस्टमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले की, मागीलवर्षी ७ मे रोजी भारताने शत्रूविरोधात राबवलेली मोहीम दहशतवादाविरोधातील भारताचे कठोर धोरण, सैन्य दलांमधील उत्कृष्ट समन्वय आणि संरक्षण क्षेत्रातील स्वावलंबनाचे प्रतीक होते. भारतीय लष्कराने 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान अतुलनीय शौर्य दाखवले आणि पहलगाममध्ये निष्पाप भारतीयांवर हल्ला करणाऱ्यांचा सूड घेतला. संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतेसाठी भारताने केलेल्या प्रयत्नांमुळे देशाची सुरक्षा अधिक मजबूत झाली. भारत दहशतवाद आणि त्याला पाठिंबा देणारी संपूर्ण व्यवस्था नष्ट करण्यासाठी कटिबद्ध आहे.

### भारत कोणत्याही युद्धासाठी तयार : राजनाथसिंह



संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी भारतीय सशस्त्र दलांच्या शौर्य, त्याग आणि समर्पणाला आदरांजली वाहताना म्हटले की, भारत भविष्यातील कोणत्याही प्रकारच्या युद्धासाठी तयार आहे. 'ऑपरेशन सिंदूर' हे राष्ट्रीय निर्धार, सज्जता आणि लष्करी क्षमतेचे एक शक्तिशाली प्रतीक आहे. भारतीय सशस्त्र दल प्रत्येक आव्हानात्मक परिस्थितीत निर्णायक कारवाईसाठी पूर्णपणे सज्ज आहे. दहशतवादी आणि त्यांच्या सूत्रधारांसाठी जगातील कोणतीही जागा सुरक्षित नाही.

**लष्करी कारवाई शत्रू कायम लक्षात ठेवेलः शाह**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी भारतीय सशस्त्र दलांच्या शौर्याची आणि कारवाईची प्रशंसा करताना 'एक्स'वर म्हटले की, 'ऑपरेशन सिंदूर' भारतीय लष्कराच्या अढळ सामर्थ्याची शत्रूंना नेहमीच आठवण करून देईल. भारतीय लष्कराची अचूक मारा करण्याची क्षमता, गुप्तचर संस्थांची परिपूर्ण माहिती आणि प्रबळ राजकीय इच्छाशक्ती यांचे एकत्रित प्रदर्शन म्हणून इतिहास हा दिवस लक्षात ठेवेल. दहशतवादी कुठेही लपले तरी भारताच्या नजरेतून आणि लष्कराच्या सामर्थ्यातून सुटू शकत नाहीत. (वृत्तसंस्था)



## बंगाल हिंसाचारात ४०० जणांना अटक

◆ **कोलकाता, ७ मे**

पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर अनेक भागांत झालेल्या हिंसाचाराच्या प्रकरणात पोलिसांनी ४३३ जणांना अटक केली, यात तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचाही समावेश आहे. आतापर्यंत दोनशे एफआयआर दाखल करण्याच आल्याची माहिती राज्याचे पोलिस महासंचालक सिद्ध नाथ गुप्ता यांनी दिली.

जोळपोळ, मारहाण, तोडफोड आणि सुरक्षा दलावर झालेल्या गोळीबाराच्या घटनेत आतापर्यंत २०० पेक्षा जास्त गुन्हे दाखल झाले आणि ४३३ लोकांना विविध प्रकरणांत अटक करण्यात आली . याशिवाय वेगवेगळ्या कलमान्वये ११०० पेक्षा जास्त जणांना ताब्यात घेण्यात आल्याचे गुप्ता यांनी पत्रपरिषदेत सांगितले. पोलिस कारवाईनंतर परिस्थिती आता नियंत्रणात आहे. हिंसाचारात पाच जणांचा मृत्यू आणि अनेक पक्षांच्या कार्यालयांची तोडफोड झाली. हिंसाचारात सहभागी असलेल्यांची ओळख पटवण्यासाठी आणि त्यांना पकडण्यासाठी विविध पथके कार्यरत आहे. (वृत्तसंस्था)

## बंगालमधील मुख्यमंत्र्याची आज निवड

◆ **नवी दिल्ली, ७ मे**

पश्चिम बंगालचा नवा मुख्यमंत्री निवडण्यासाठी भाजपाच्या नवनिर्वाचित आमदारांची शुक्रवारी सायंकाळी बैठक होणार आहे. राज्यातील भाजपाचा पहिला मुख्यमंत्री म्हणून कोणाची निवड होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

विधानसभा निवडणुकीच्या मतदानानंतरच राज्यात मोठ्या प्रमाणात हिंसाचार फोफावला होता. निवडणुकीच्या निकालानंतर त्यात आणखी वाढ झाली. राज्यातील भाजपाचा प्रमुख चेहरा असलेले शुभेंदू अधिकारी यांचे स्वीय सहायक चंद्रनाथ रथ यांची बुधवारी रात्री हत्या झाल्यामुळे राज्यातील वातावरण आणखी तापले आहे. या पृष्ठभूमीवर भाजपा विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत नेता म्हणून कोणाची निवड होते, याबाबत उत्सुकता वाढली आहे.

दुपारी ४ वाजता होणाऱ्या भाजपाच्या नवनिर्वाचित आमदारांच्या बैठकीला केंद्रीय निरीक्षक म्हणून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि सहनिरीक्षक म्हणून ओडिशाचे मुख्यमंत्री मोहनचरण मांझी उपस्थित राहणार आहेत. नेतेपदाच्या स्पर्धेत शुभेंदू अधिकारी, दिलीप घोष, सुकांता मुजुमदार, शमिक भट्टाचार्य, अग्निमित्रा पॉल आणि रूपा गांगुली यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

भाजपा विधिमंडळ पक्षाचा नवा नेता निवडल्या गेल्यानंतर तो सायंकाळी राज्यपालांची भेट घेत सरकार स्थापनेचा दावा करेल. शनिवार ९ मेला राजधानी कोलकात्यातील ब्रिगेड परेड मैदानावर सकाळी १० वाजता आयोजित समारंभात भाजपाचा राज्यातील पहिला मुख्यमंत्री शपथ घेणार आहे. या शपथविधी समारंभाला पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन उपस्थित राहणार आहेत. भाजपाशासित तसेच रालोआशासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यानाही शपविधी समारंभासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. २९४ सदस्यांच्या विधानसभेत भाजपाने २०७ जागा जिंकत स्पष्ट आणि निर्विवाद बहुमत मिळवले आहे. (तभा वृत्तसेवा)

### चिराग पासवान एकट्याने लढणार निवडणूक

**चंदीगड** : लोक जनशक्ती पक्षाने पुढील वर्षी होणारी विधानसभा निवडणूक स्वतंत्रपणे लढवण्याची घोषणा केली आहे. पंजाब विधानसभेच्या सर्व ११७ जागांवर उमेदवार उभे करणार असल्याचे पक्षाने स्पष्ट केले आहे.

पक्ष आता पंजाबमधील आपली संघटना मजबूत करण्यावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करेल. राष्ट्रीय अध्यक्ष चिराग पासवान यांच्या निर्देशानुसार राज्यात मोठ्या प्रमाणावर राजकीय हालचाली सुरू केल्या जात आहेत, असे चंदीगड प्रेस क्लबमध्ये आयोजित पत्रपरिषदेत, पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस आणि पंजाबचे प्रभारी, डॉ. के. पी. चौधरी यांनी सांगितले.

# सम्राट चौधरी मंत्रिमंडळात माजी मुख्यमंत्र्यांची तीन मुले

◆ **नवी दिल्ली, ७ मे**

बिहारमधील भाजपाचे पहिले मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्या मंत्रिमंडळाचा पहिला विस्तार गुरुवारी करण्यात आला. मंत्रिमंडळात एकूण ३२ मंत्र्याचा समावेश करण्यात आला. यात राज्याच्या तीन माजी मुख्यमंत्र्यांच्या तीन मुलांचा समावेश करण्यात आला आहे.



सम्राट चौधरी यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली, त्यावेळी त्यांच्यासोबत जदयूच्या दोन उपमुख्यमंत्र्याचाही शपथविधी झाला होता. चौधरी यांच्या मंत्रिमंडळात भाजपाचे १५ मंत्री, जदयूचे १३ मंत्री तर अन्य पक्षांच्या चार मंत्र्याचा समावेश आहे. राज्याच्या मंत्रिमंडळात जास्तीत जास्त ३६ मंत्री राहू शकतात, ३५ मंत्र्याचा शपथविधी झाल्यामुळे आता फक्त मंत्रिमंडळात एक जागा रिकामी आहे. चिराग पासवान यांच्या लोकजनशक्ती पक्षाच्या दोन, उपेंद्र कुशवाह यांच्या राष्ट्रीय लोक मोर्चाच्या एका तर, जितनराम मांझी यांच्या हिंदुस्थान अवाम मोर्चाच्या एका सदस्याचा मंत्रिमंडळात समावेश झाला आहे. या विस्ताराचे वैशिष्ट्य म्हणजे, मंत्रिमंडळात राज्याच्या तीन माजी मुख्यमंत्र्याच्या मुलांचा समावेश झाला आहे. माजी मुख्यमंत्री नितीशकुमार यांचे पुत्र निशांतकुमार, माजी मुख्यमंत्री जितनराम मांझी यांचे पुत्र संतोषकुमार सुमन आणि दिवंगत मुख्यमंत्री जगन्नाथ मिश्र यांचे पुत्र नितीश मिश्र यांचा मंत्रिमंडळात समावेश झाला आहे. नितीशकुमार यांचे पुत्र निशांतकुमार मंत्रिमंडळात सहभागी होणार का, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले होते. अपेक्षेप्रमाणे त्यांनी आज शपथ घेतली.

एखाद्या राज्याच्या मंत्रिमंडळ विस्ताराला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थित राहण्याची देशातील पहिलीच घटना असावी. भाजपाचे मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्या शपथविधी समारंभाला मोदी उपस्थित राहू शकले नव्हते, त्यामुळे ते यावेळी मंत्रिमंडळ विस्ताराला उपस्थित राहिले, असे समजते. जदयूच्या कोट्यातून एका मुस्लिम आमदाराचाही मंत्रिमंडळात समावेश झाला आहे.

ओबीसी आणि दलित समाजाचे प्रत्येकी सात मंत्री आहेत. अतिमागासलेल्या समाजाच्या ९ जणांचाही मंत्रिमंडळात समावेश करण्यता आला आहे. (तभा वृत्तसेवा)

# निदा खान धर्मांतराची सूत्रधार?

## एसआयटीच्या तपासात धक्कादायक माहिती समोर




◆ **नाशिक, ७ मे**

नाशिकमधील टीसीएस कंपनीशी संबंधित कथित लैंगिक अत्याचार आणि बेकायदेशीर धर्मांतर प्रकरणाने आता आणखी गंभीर वळण घेतले आहे. या प्रकरणातील मु'य संशयित आरोपी निदा खानकडेच कथित 'मिशन कन्व्हर्जन'ची जबाबदारी सोपवण्यात आल्याचा संशय विशेष तपास पथकाने व्यक्त केला आहे. या प्रकरणात अनेक धक्कादायक बाबी समोर येत असून, तपास यंत्रणांनी आपला फास अधिक घट्ट केला आहे. सध्या निदा खान फरार असून, तिचा शोध सुरू आहे.

या प्रकरणात मुंबई नाका आणि देवळाली कॅम्प पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यांमध्ये निदा खानचे नाव समोर आले आहे. तपासादरम्यान टीसीएसमधील एका पुरुष कर्मचाऱ्यासह महिला कर्मचाऱ्याचे धर्मांतर घडवून आणण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली. धार्मिक भावना दुखावणे, गुंगी आणणारे पदार्थ वापरून अत्याचार करणे आणि पीडितांना धमकावणे असे गंभीर आरोपही आहेत. (वृत्तसंस्था)

### स्वतंत्र पथकांकडून शोध

एसआयटीच्या हाती लागलेल्या काही पुराव्यांनुसार निदा खान ही केवळ सहभागी नव्हती, तर काही विशिष्ट व्यक्तींना लक्ष्य करण्याचे काम तिच्याकडे देण्यात आल्याचा संशय आहे. निदाचा अटकपूर्व जामीन न्यायालयाने गुन्ह्याचे स्वरूप आणि प्राथमिक पुरावे लक्षात घेऊन अर्ज फेटाळला. त्यानंतर ती फरार झाली असून, पोलिसांनी तिचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र पथके तयार केली आहेत.

### मान यांच्या 'ओएसडी'वर ईडीचा छापा

**चंदीगड** : पंजाबमध्ये मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात ईडीने त्यांच्या ओएसडीवर छापेमारी केली. या कारवाईदरम्यान मोठ्या प्रमाणात रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. मोहाली आणि चंदीगड परिसरात काही ठिकाणी छापे टाकण्यात आले. यामध्ये मान यांच्या ओएसडीचा समावेश आहे. खरार परिसरातील एका इमारतीत छापेमारीनंतर खळबळ उडाली. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, कारवाईची माहिती मिळताच इमारतीच्या वरच्या मजल्यावरून दोन बॅगा खाली फेकण्यात आल्या. यामध्ये मोठ्या प्रमाणात रोख रक्कम आढळून आली. तपास यंत्रणांनी घटनास्थळी पसरलेल्या नोटा ताब्यात घेतल्या. या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे. आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्यांतर्गत ही कारवाई करण्यात आली. (वृत्तसंस्था)

# अनिल परबांसह सर्व आरोपी निर्दोष

### दापोली 'साई रिसॉर्ट' प्रकरण

◆ **रत्नागिरी, ७ मे**

राजकीय वर्तुळात चर्चेत असलेल्या दापोलीतील 'साई रिसॉर्ट' प्रकरणात खेड येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने उबाठा नेते अनिल परब यांच्यासह सर्व आरोपींची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली. या निर्णयामुळे दीर्घकाळ गाजलेल्या या प्रकरणावर पडदा पडला आहे.

या प्रकरणात माजी मंत्री परब यांच्यासह तत्कालीन प्रशासकीय अधिकाऱ्यांवरही गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्यामध्ये उपविभागीय अधिकारी, महसूल विभागातील अधिकारी तसेच मुरूड येथील तत्कालीन सरपंचांचा समावेश होता. आरोपींवर फसवणूक, गुन्हेगारी कट यासह इतर कलमांखाली गुन्हे दाखल होते. याशिवाय भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा अंतर्गतही आरोप ठेवण्यात आले होते.

सरकारी पक्षाने संबंधित रिसॉर्टचे बांधकाम पूर्ण नसतानाही कर आकारणी करून शासनाची फसवणूक केल्याचा आणि आवश्यक स्टॅम्प शुल्क न भरता महसूल बुडवल्याचे युक्तिवाद केला. मात्र, बचाव पक्षाचे वकील सुधीर शरद बुटाला यांनी न्यायालयात सादर केलेल्या युक्तिवादात जमीन आणि बांधकाम हे स्वतंत्र घटक असल्याचे स्पष्ट केले. न्यायालयाने हा मुद्दा ग्राह्य धरत, सरकारी पक्षाला आरोप सिद्ध करता न आल्याने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. (वृत्तसंस्था)

# हॉटेलात रचला बॉम्बस्फोटाचा कट

### सीसीटीव्ही फुटेजमधून खुलासा

### बब्बर खालसा संघटनेचा सहभाग

◆ **जालंधर, ७ मे**

जालंधर येथील बीएसएफ पंजाब फ्रंटियर मुख्यालयाबाहेर झालेल्या स्फोटाचा कट एका हॉटेलात रचण्यात आला होता आणि यात बब्बर खालसा दहशतवादी संघटनेचा सहभाग असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे.

पांढरा टी-शर्ट घातलेल्या एका दहशतवाद्याने हा हल्ला केला. बीएसएफ मुख्यालयाजवळील एका हॉटेलमध्ये संशयित थांबला होता आणि स्फोट झाल्यापासून तो बेपत्ता आहे. पोलिसांना हॉटेलच्या सीसीटीव्हीमधून महत्त्वपूर्ण माहिती मिळाली असल्याचे एका पोलिस अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले. या हल्ल्यात दोन दहशतवादी असून, दोघेही फरार आहेत. त्यांच्या शोधासाठी व्यापक मोहीम राबवली जात आहे. लक्ष विचलित करण्यासाठी आणि सुरक्षा यंत्रणेला संदेश देण्याच्या उद्देशाने त्यांनी अतिशय संवेदनशील असलेले बीएसएफ मुख्यालयाजवळील ठिकाण निवडले.

**आयईडी स्फोटासाठी रिमोटचा वापर**

पांढरा टी-शर्ट घातलेला एक तरुण हातात एक लिफाफा घेऊन आला आणि डिलिव्हरी बॉयच्या स्कूटरजवळ ठेवला, त्यानंतर काही तो निघून गेल्याचे सीसीटीव्हीत दिसत आहे. आयईडीचा स्फोट घडवण्यासाठी रिमोटचा वापर करण्यात आल्याचे तपासात उघड झाले. (वृत्तसंस्था)

# पोटफाडी चौकात लोखंडी फायटरच्या हल्ल्यात तरुण जखमी

### चौघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मे-**

दुचाकीला कट लागल्याच्या कारणावरून झालेल्या वादात चौघांजणांनी आम्ही मोठे गुंड आहोत असे म्हणत एका तरुणावर लोखंडी फायटरने हल्ला करून त्याला गंभीर जखमी केल्याची घटना पोटफाडी चौकात २९ एप्रिल रोजी रात्री घडली. दरम्यान या प्रकरणी जेलरोड पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आयान ऊर्फ बडा सैफन मुच्छाले (रा. मुस्लिम पाच्छा पेठ) व त्याच्या तीन साथीदारांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून याबाबत प्रमोद राम पवार (वय ३५, रा. निलम नगर, एमआयडीसी) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी हे राहुल गांधी झोपडपट्टी येथील आपल्या नातेवाईकांकडे २९ एप्रिल रोजी रात्री च्या सुमारास आपल्या दुचाकी वरून पाथरूट चौक ते पोटफाडी चौक या मार्गाने जात होते. , पोटफाडी चौकातील कारपेट दुकानासमोर त्यांच्या दुचाकीला दुसऱ्या एका दुचाकीचा कट लागला. त्यावेळी आरोपी मुच्छाले याने शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. शिवाय तुला गाडी नीट चालवता येत नाही का? असे म्हणून त्याने प्रमोद यांच्यावर लोखंडी फायटरने मारहाण केली. शिवाय हे चौक माझे आहे, येथे फक्त माझेच चालते अशी धमकी दिली. त्याच्यासोबत असलेल्या इतर तीन साथीदारांनीही आम्ही मोठे गुंड आहोत, पोलीसही आमचे काही करू शकत नाहीत असे ओरडून सांगत लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक चानकोटी हे गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.




# अरविंद मार्डीकर पुन्हा 'हिंदुस्थान समाचार'चे अध्यक्ष

### सलग दुसऱ्यांदा बिनविरोध निवड

◆ **नवी दिल्ली, ७ मे**

हिंदुस्थान समाचार बहुभाषिक वृत्तसंस्थेच्या अध्यक्षपदी अरविंद भालचंद्र मार्डीकर यांची पुन्हा एकदा बिनविरोध निवड झाली आहे. बुधवारी नवी दिल्लीतील इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्राच्या उमंग सभागृहात झालेल्या विशेष वार्षिक सर्वसाधारण सभेत ही निवड प्रकिं या पार पडली.

या निवडणुकीत मार्डीकर यांची सलग दुसऱ्यांदा अध्यक्षपदी निवड झाली असून, ते पुढील तीन वर्षांसाठी संस्थेचे नेतृत्व करणार आहेत. यापूर्वी २०२३ मध्येही ते प्रथमच बिनविरोध अध्यक्ष म्हणून निवडले गेले होते. या बैठकीत नवीन संचालक मंडळाची स्थापना करण्यात आली. ज्येष्ठ पत्रकार पद्मविभूषण राम बहादूर राय आणि समाजसेवक रवींद्र मणिलाल संघवी यांचीही पुन्हा संचालक मंडळावर निवड झाली आहे. याशिवाय अशोक टंडन (ज्येष्ठ पत्रकार, माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे माजी माध्यम सल्लागार), परेशकांत प्रेम मनोहर मांगलिक (मुंबई), मंगल प्रताप पांडे (रांची), कमल कांत वशिष्ठ (उद्योगपती, इंदूर) यांचीही संचालक मंडळात निवड करण्यात आली आहे.

निवडणूक प्रक्रिया वकील आणि निवडणूक अधिकारी अजित कुमार यांनी पार पाडली. निवडीनंतर संचालक मंडळातील सदस्यांनी मार्डीकर यांचे अभिनंदन केले. राम बहादूर राय यांनी त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेने आव्हानांवर मात करत प्रतिष्ठा वाढवल्याचे नमूद केले. तर रवींद्र संघवी यांनी संस्थेचे भवितव्य मजबूत हातात असल्याचे सांगितले. मार्डीकर यांनी आपल्या भाषणात संस्थेतील सहकाऱ्यांच्या मेहनतीचे कौतुक करीत यशाचे श्रेय संपूर्ण टीमला दिले.

अरविंद मार्डीकर यांचा संस्थेतील प्रवास २०१६ पासून सुरू झाला. यानंतर त्यांनी उपाध्यक्ष, कार्यकारी अध्यक्ष आणि नंतर २०२३ मध्ये अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली होती. आर्थिक स्थैर्य, संस्थेचा विस्तार आणि विश्वासार्हता वाढवण्यात त्यांचा महत्त्वपूर्ण वाटा असल्याचे नमूद करण्यात आले. (तभा वृत्तसेवा)




अध्यक्षपदी फेरनिवड झाल्यानंतर अरविंद मार्डीकर यांचा सत्कार करताना पद्मश्री रामबहादूर राय

# मानवाचा अंतराळातील कचरा सूर्य पाठवतोय् परत

## इस्रोच्या शास्त्रज्ञांचा शोध ● सौर हालचालींचा होतोय् परिणाम

◆ **नवी दिल्ली, ७ मे**

मानवाने जमीन, पाणी आणि आता आकाश म्हणजेच अंतराळातही मोठ्या प्रमाणात कचरा केला आहे. मानवी कृत्याला निसर्ग उत्तर देतोच. नेमके तेच आता सूर्य करीत आहे. मानवाने अंतराळात केलेला कचरा तो पृथ्वीकडे परत पाठवत आहे. वाढलेली सौर क्रियाशीलता अंतराळातील कचरा पृथ्वीच्या कक्षेत अधिक वेगाने ढकलण्यास मदत करीत असल्याचे नवीन संशोधनात आढळले आहे.

या निष्कर्षामुळे अंतराळ संस्थांना अधिक सुरक्षित मोहिमांचे नियोजन करण्यास मदत होऊ शकते. भारतातील विक्रम साराभाई अंतराळ केंद्रातील शास्त्रज्ञांनी ३४ वर्षांच्या कालावधीत कक्षेतील कचऱ्याच्या १७ तुकड्यांचा मागोवा घेतला. एकदा सौरडागांची संख्या त्यांच्या चक्रातील सर्वोच्च पातळीच्या सुमारे ७० टक्क्यांपर्यंत वाढली की, कचरा लक्षणीयरीत्या अधिक वेगाने उंची गमावू लागतो, असे त्यांना आढळले. संशोधकांना ज्या गोष्टीचा दीर्घकाळापासून संशय होता, त्याला दुजोरा देणारा हा पहिलाच अभ्यास आहे. सौर क्रियाशीलता आणि अवकाशातील कचऱ्याचे भवितव्य यांचा थेट संबंध आहे.



सूर्याचे एक चक्र अंदाजे ११ वर्षांचे असते. जेव्हा तो सर्वाधिक सक्रिय असतो, तेव्हा सौरडागांची संख्या वाढते आणि तीव्र किरणोत्सर्ग बाहेरच्या दिशेने पसरतो. यामुळे पृथ्वीच्या वातावरणाचा 'थर्मोस्फियर' नावाचा वरचा थर तापतो. यामुळे तो वरच्या दिशेने विस्तारतो. पृथ्वीपासून १६० ते दोन हजार किलोमीटर उंचीवर परिभ्रमण करणारे उपग्रह आणि अवकाशातील कचरा अचानक दाट हवेच्या संपर्कात येतात. यामुळे हवेचा रोध निर्माण होतो. त्यांचा वेग कमी होतो आणि ते खालच्या कक्षेत खेचले जातात. अखेरीस गडबडत पृथ्वीच्या दिशेने ते परत येतात.

जेव्हा सूर्य अधिक सक्रिय असतो, तेव्हा पृथ्वीभोवतीचा अवकाशातील कचरा अधिक वेगाने उंची गमावतो हे आम्ही येथे दाखवून दिले आहे, असे भारतातील तिरुवनंतपुरम् येथील विक्रम साराभाई अवकाश केंद्राच्या अवकाश भौतिकी प्रयोगशाळेतील शास्त्रज्ञ तसेच 'फ्रंटियर्स इन ॲस्ट्रॉनॉमी ॲण्ड स्पेस सायन्सेस'मधील नवीन अभ्यासाशी संबंधित लेखिका आयशा एम. अशरूफ यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### अंतराळ नियोजनासाठी उपयुक्त नमुना

दर ९० ते १२० मिनिटांनी पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घालणाऱ्या, निरीक्षण केलेल्या १७ वस्तूंची उंची प्रत्येक वेळी सौर हालचालींमुळे अनेक किलोमीटरने कमी झाली. १९८६ ते २०२४ या सलग तीन सौर चक्रांमध्ये निरीक्षण केलेला हा विश्वसनीय नमुना आहे. अंतराळातील कचरा जसजसा वाढत जाईल, तसतसा सूर्य नैसर्गिकरीत्या त्यातील काही कचरा केव्हा दूर करेल हे जाणून घेतल्यास, मोहीम नियोजकांना अधिक हुशारीने आणि सुरक्षितपणे प्रक्षेपण करण्याची वेळ निवडण्यास मदत होऊ शकते.

CMYK



राजकारणात असूनही जर चिमुकल्या मुलींना आणि महिलांना न्याय देता येत नसेल, तर आपण कुठेतरी फसलो किंवा चुकलो आहोत. महिलांवर आणि चिमुकल्या मुलींवर होणाऱ्या घटना कमी होण्यासाठी शासनाने कठोर पावले उचलली पाहिजेत.

**-रोहित पवार**, आमदार

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा



युरोपमधून आफ्रिकेत पोहत गेलो. स्पेनमधील टारिफा येथून मोरोक्कोच्या किनाऱ्यापर्यंत जिब्राल्टर सामुद्रधुनी ओलांडत जवळपास १५ किलोमीटरचे अंतर पार केले. पोहोण्याचा हा अनुभव खूपच सुंदर, अविस्मरणीय आणि भन्नाट होता.

**-मिलिंद सोमण**, अभिनेता



# परकीय चलनात भारत अव्वल

## वर्षभरात १३७ अब्ज डॉलर्स तिजोरीत जमा ● १०० अब्ज डॉलर्सचा टप्पा ओलांडणारा भारत एकमेव देश



◆ **न्यू यॉर्क, ७ मे**

परकीय चलन प्राप्त करणाऱ्या देशांच्या यादीत भारताने सलग दुसऱ्या वर्षी अव्वलस्थान मिळवले आहे. परदेशात रोजगारानिमित्त असलेल्या भारतीयांनी वर्षभरात देशात १३७ अब्ज डॉलर्स पाठवले आहे. १०० अब्ज डॉलर्सचा टप्पा ओलांडणारा भारत हा एकमेव देश असल्याचे संयुक्त राष्ट्रांच्या स्थलांतर संस्थेच्या अहवालात म्हटले आहे.

आंतरराष्ट्रीय स्थलांतर संघटनेचा 'जागतिक स्थलांतर अहवाल-२०२६' अहवाल सादर करण्यात आला. भारत या यादीत अव्वल स्थानी कायम आहे. मेक्सिको दुसऱ्या क्रमांकावर असून, त्यानंतर फिलिपिन्स आणि फ्रान्स अनुक्रमे तिसऱ्या आणि चौथ्या स्थानावर आहेत. गेल्या काही वर्षांत भारताला मिळणाऱ्या परकीय चलनात सातत्याने वाढ झाली आहे. हा आकडा २०१० मध्ये ५३.४८ अब्ज डॉलर्स होता, जो २०१५ मध्ये ६८.९१ अब्ज डॉलर्स, २०२० मध्ये ८३.१५ अब्ज डॉलर्स आणि २०२४ मध्ये १३७.६७ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढला, ज्यात २०२४ मध्ये ११.८ टक्के वाढ झाली. उच्च-उत्पन्न असलेले देश हे रेमिटन्सचे प्रमुख स्रोत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले. भारतात सर्वाधिक परकीय चलन अमेरिकेतून पाठवण्यात आले. त्यानंतर सौदी अरब, स्वित्झर्लंड आणि जर्मनी यांचा क्रमांक लागतो.

**शिक्षणात दुसरे स्थान**

अहवालात आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांविषयीची माहितीही समाविष्ट आहे. चीनमधील १० लाखांपेक्षा जास्त विद्यार्थी परदेशात शिक्षण घेत आहे तर, ६.२ लाखांहून अधिक विद्यार्थी परदेशात शिक्षण घेत असलेला भारत यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहे.

◂(*वृत्तसंस्था*)

### तंत्रज्ञान क्षेत्रात आघाडी

**देशाच्या तंत्रज्ञान क्षेत्राच्या विकासात भारतीय डायस्पोरा (परदेशस्थ भारतीय समुदाय) महत्त्वाची भूमिका बजावत आहे. 'ब्रेन ड्रेन'च्या (बुद्धिमान लोकांचे स्थलांतर) आव्हानाचे ब्रेन गेनमध्ये (बुद्धिमान लोकांचे आगमन) रूपांतर करण्यासाठी भारत 'डायस्पोरा कॉन्फरन्स अ‍ॅण्ड इनोव्हेशन सेंटर'सारखे उपक्रमही राबवत आहे. आशियामध्ये नैसर्गिक आपत्ती हेदेखील अंतर्गत विस्थापनाचे एक प्रमुख कारण ठरले असल्याचे अहवालात नमूद आहे.** ■




व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांनी गुरुवारी मुंबई येथील नॅशनल स्टॉक एक्सचेंजला भेट दिली. यावेळी एनएसईचे अध्यक्ष श्रीनिवास इंजेटी यांनी त्यांचे स्वागत केले

# अटी मान्य करा, अन्यथा हल्ल्यासाठी तयार राहा

## डोनाल्ड ट्रम्प यांची इराणला धमकी ● होर्मुझमधील नाकाबंदी कायम राहणार

◆ **वॉशिंग्टन, ७ मे**

अमेरिका आणि इराणमध्ये पाकिस्तानच्या माध्यमातून शांतता कराराच्या हालचाली सुरू आहेत. पण, अद्याप करारावर दोन्ही देशांनी सहमती दर्शविलेली नाही. अशातच राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रस्तावित १४ अटी मान्य करा, अन्यथा भीषण हल्ल्यासाठी तयार राहा, असा इशारा दिला.



इराण करारासाठी तयार होत नाही, तोपर्यंत होर्मुझ सामुद्रधुनीत अमेरिकन नौदलाची नाकाबंदी कायम राहील, असे ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये नमूद केले. इराणला आम्ही विचार करण्यासाठी खूप वेळ दिला, यापुढे त्यांनी दिलेली कारणे खपवून घेतली जाणार नाहीत. त्यांनी करारावर सहमती दर्शवली नाही, तर पूर्वीपेक्षा भीषण बॉम्बहल्ला सुरू होईल. आम्ही मध्यस्थ राष्ट्रांमार्फत १४ अटी असलेल्या कराराचा मसुदा सादर केला आहे. इराण सध्याच्या अटी मान्य करत असेल, तर 'एपिक फ्युरी' संपेल आणि प्रभावी नाकाबंदी उठवली जाईल.

या नाकाबंदीमुळे इराणसह सर्वांसाठी होर्मुझची सामुद्रधुनी खुली होईल आणि जगातील सर्वांत महत्त्वाच्या सागरी मार्गावरील परिस्थिती सामान्य होईल.

**कोणत्याही परिस्थितीसाठी तयार : नेत्यान्याहू**

इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू म्हणाले, इराणचा अणुकार्यक्रम थांबवणे हे आमचे ध्येय आहे आणि त्यासाठी आम्ही कोणत्याही परिस्थितीसाठी तयार आहे. ट्रम्प यांच्या संपर्कात असून, दोन्ही देशांमध्ये प्रत्येक स्तरावर पूर्ण समन्वय आहे. इराणची आण्विक क्षमता आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांचा साठा हा जगासाठी गंभीर धोका आहे.

◂(*वृत्तसंस्था*)

### ...तर 'प्रोजेक्ट फ्रीडम' पुन्हा सुरू

अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्ध समाप्तीच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे संकेत ट्रम्प यांनी बुधवारी दिले होते. त्यामुळेच त्यांनी होर्मुझ सामुद्रधुनीत सुरू करण्यात आलेली 'प्रोजेक्ट फ्रीडम' मोहीम स्थगित करण्याची घोषणा केली होती. त्यांनी ही मोहीम पुन्हा सुरू करण्याचा इशारा दिला आहे. अंतिम करारावर स्वाक्षरी न झाल्यास होर्मुझ जलमार्गात 'प्रोजेक्ट फ्रीडम' सुरू करण्यासाठी अमेरिकन सैन्य सज्ज असल्याचे त्यांनी सांगितले. ■

# भारतासोबतचे संबंध बळकट करण्याला प्राधान्य

**इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाची भूमिका**

◆ **तेहरान, ७ मे**

नुकत्याच झालेल्या संघर्षात शत्रूला जेरीस आणून माघार घेण्यास आम्ही भाग पाडले. त्यामुळे इराण स्वतः एक महासत्ता आहे. त्यामुळे अमेरिकेपुढे झुकण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. भारतासोबतचे संबंध अधिक बळकट करण्याला प्राधान्य असल्याचे इराणचे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बघाई यांनी सरकारी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत सांगितले.



सार्वभौमत्व आणि सन्मानाचे रक्षण करण्यासाठी दोन अण्वस्त्रधारी देशांना आम्ही युद्धात धूळ चारली. या संघर्षानंतर इराण मध्यपूर्वेतील महासत्ता म्हणून उदयास आला. अमेरिकेने ठेवलेल्या अटी इराणच्या महत्त्वाकांक्षेला नुकसान पोहोचवणाऱ्या आहेत. त्यामुळे कितीही दबाव आला तरी, त्या मान्य केल्या जाणार नाहीत. युद्धाची परिस्थिती उद्भवल्यास इराणचे सैन्य सज्ज आहे. भारताचा उल्लेख करताना बघाई म्हणाले, भारत आणि इराणमधील संबंध सध्या अधिक दृढ होत आहेत. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या भारतीय जहाजांवर इराण काही शुल्क आकारेल का, असे विचारले असता, तशी कोणतीही योजना नाही. भारताशी संबंध बळकट करण्याला आमचे प्राधान्य असल्याचे त्यांनी सांगितले.

**करारासाठी विश्वासाची कमतरता**

अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता चर्चेसंदर्भात बघाई म्हणाले की, वाटाघाटी सुरू आहेत, परंतु करारासाठी विश्वासाची कमतरता हा मोठा अडथळा आहे. इराणने अमेरिकेला ४०-कलमी शांतता प्रस्ताव पाठवला होता. त्याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेने १४ अटींचा नवीन प्रस्ताव पाठवला आहे. त्यानंतर आम्ही पाकिस्तानी मध्यस्थांना आमचे उत्तर सादर करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

◂(*वृत्तसंस्था*)

### 'होर्मुझ'साठी शुल्क आकारले नाही

होर्मुझ जलमार्ग पार करण्यासाठी आम्ही कोणत्याही देशाकडून शुल्क आकारत नाही. आम्ही केवळ आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार स्वतःचे संरक्षण करण्यासाठी पावले उचलत आहोत. आम्ही भारतातील लोकांच्या खूप जवळ आहोत. भारत आणि इराण यांच्यातील ऐतिहासिक संबंधांचा आम्हाला अभिमान आहे. दोन्ही देश अलिप्ततावादी चळवळीचा भाग राहिले आहेत आणि दोन्ही देशांची सरकारे संबंध अधिक दृढ करण्यासाठी वचनबद्ध आहेत. ■

# भारतीय वंशाचे तज्ज्ञ टेलिस यांना दिलासा

## हेरगिरी कायद्याचा खटला न्यायालयाकडून रद्द

◆ **वॉशिंग्टन, ७ मे**

एका अमेरिकी न्यायालयाने भारतीय वंशाचे धोरणात्मक तज्ज्ञ अ‍ॅशले जे. टेलिस यांच्यावरील हेरगिरी कायद्याचा खटला रद्द केला आहे. आरोपीवर चुकीच्या कायदेशीर कलमाचा वापर करून गुन्हा दाखल केल्याचे न्यायालयाने मान्य केले. टेलिस यांच्यावर गोपनीय कागदपत्रे ठेवल्याचा आरोप होता.

व्हर्जिनियामधील अमेरिकी जिल्हा न्यायालयाचे न्यायाधीश मायकल एस. नॅकमनॉफ यांनी तांत्रिक कायदेशीर कारणास्तव हा खटला रद्द करीत असल्याचे आदेशात म्हटले आहे. चुकीच्या कायदेशीर कलमांतर्गत आरोप दाखल केल्याचे स्पष्ट होत असल्याने खटला रद्द करण्यात येत असल्याची निर्णय न्यायाधीशांनी दिला. सरकारच्या आरोपपत्रात टेलिस यांनी त्याच्या खाजगी निवासस्थानी ११ गोपनीय राष्ट्रीय सुरक्षा संबंधी दस्तावेज आणि डिजिटल स्वरूपातील फाईल ठेवल्याचा आरोप सरकारी पक्षाने केला. सरकारी कार्यालयांमधील आपल्या उच्चस्तरीय प्रवेशाचा गैरवापर केल्याने त्यांच्यावर हेरगिरीचा गुन्हा दाखल केला होता. टेलिस यांनी कारवाईला न्यायालयात आव्हान दिले होते.

दरम्यान, टेलिस हे अमेरिकेचे परराष्ट्र धोरण, राष्ट्रीय सुरक्षा आणि भारत-प्रशांत घडामोडींवरील एक प्रख्यात तज्ज्ञ मानले जातात. अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयात आणि संरक्षण यंत्रणेत वरिष्ठ पदांवर कार्यरत असताना टेलिसकडे अनेक संवेदनशील दस्तऐवज होते असा आरोप प्रशासनाने केला होता.

◂(*वृत्तसंस्था*)

## चित्रपट वार्ता

### 'द महाराष्ट्र फाईल्स' प्रदर्शनाची तारीख जाहीर

**मुंबई** : 'द महाराष्ट्र फाईल्स' हा चित्रपट शेतकरी कुटुंबाच्या न्यायासाठीच्या संघर्षावर आधारित असून, २९ मे रोजी मोठ्या पडद्यावर प्रदर्शित होणार आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील वास्तव, सामाजिक अन्याय आणि न्याय मिळवण्यासाठी चाललेली लढाई या चित्रपटातून प्रभावीपणे मांडण्यात आली आहे. या चित्रपटात महाराष्ट्रातील एका शेतकरी कुटुंबाची कथा दाखवण्यात आली आहे. निर्माते, दिग्दर्शक, लेखन, कथा, पटकथा संजीव कुमार राठोड यांची आहे. या चित्रपटात अभिनेत्री उषा नाडकर्णी, मंगेश देसाई, वीणा जामकर, सयाजी शिंदे, नागेश भोसले, ही कलाकार मंडळी महत्त्वपूर्ण भूमिकेत आहेत. चित्रपटाचे संगीत नितीन सावंत, अजित केतकर आणि सिद्धार्थ कश्यप यांनी दिले आहे. ■



### मनोज बाजपेयीच्या 'गव्हर्नर'चा टीझर प्रदर्शित

**मुंबई** : विपुल अमृतलाल शाह निर्मित 'द सायलेंट सेव्हियर गव्हर्नर' या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित केला आहे. हा चित्रपट सत्य घटनांवर आधारित असून, १९९० च्या दशकातील भारतातील सर्वांत मोठ्या आर्थिक संकटाची कहाणी सांगतो. राष्ट्रीय पुरस्कार विजेते अभिनेते मनोज बाजपेयी यांनी आरबीएलच्या (नॅशनल बँक ऑफ इंडिया) गव्हर्नरची भूमिका साकारली आहे. हा चित्रपट सनशाईन पिक्चर्सने सादर केला आहे. याचे दिग्दर्शन चिन्मय मांडलेकरने केले आहे. आशिम ए. शाह हे या चित्रपटाचे सह-निर्माते असून, कथा सुवेंदू भट्टाचार्जी, सौरभ भरत, रवी असरानी आणि विपुल अमृतलाल शाह यांनी लिहिली आहे. जावेद अ'तर यांचे गीत आणि अमित त्रिवेदी यांचे संगीत असलेला हा चित्रपट १२ जून २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. ■



### 'राजा शिवाजी'ने गाठला ५० कोटींचा टप्पा

**मुंबई** : रितेश देशमुख दिग्दर्शित 'राजा शिवाजी' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर ५० कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित हा चित्रपट मराठी आणि हिंदी या दोन्ही भाषांमध्ये प्रदर्शित करण्यात आला. चित्रपटाने आतापर्यंत एकूण नेट कलेक्शन ४४ कोटी रुपये केले आहे. यामध्ये मराठी व्हर्जनचे योगदान सर्वाधिक ३०.५ कोटी रुपये आहे. चित्रपटाचे भारतातील एकूण कलेक्शन आता ५२.६८ कोटी रुपयांच्या पुढे गेले आहे. या कलेक्शनसह 'राजा शिवाजी' आतापर्यंतच्या सर्वाधिक कमाई करणाऱ्या टॉप-५ मराठी चित्रपटांच्या यादीत समाविष्ट झाला आहे. या चित्रपटात रितेश देशमुखने मु'य भूमिकेसह दिग्दर्शनही केले आहे. चित्रपटात संजय दत्त, अभिषेक बच्चन, विद्या बालन, भाग्यश्री आणि जेनेलिया देशमुख यासारखे कलाकार आहेत. ■





विदेश दौऱ्यावर असलेले परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी पारामारिबो येथे सुरीनामच्या राष्ट्राध्यक्ष जेनिफर गिरलिंग्स-सायमन्स यांची भेट घेऊन चर्चा केली

# भारतीय लष्कराचा 'ड्रोन फोर्स' शत्रूचा काळ


## ५० हजार जवानांचे प्रशिक्षण सुरू ● संघर्षात प्रत्युत्तर देण्यास सक्षम

◆ **नवी दिल्ली, ७ मे**

ऑपरेशन सिंदूर, रशिया-युक्रेन आणि अमेरिका-इस्त्रायल-इराण युद्धांनंतर भारतीय संरक्षण संस्थेने एक ड्रोन फोर्स तयार करण्याचा निर्णय घेतला. हा फोर्स कोणत्याही लष्करी कारवाईत फर्स्ट रिस्पाँडर (पहिली प्रत्युत्तर कारवाई) म्हणून तैनात केला जाईल. याला डेटा आणि कॉग्निटिव्ह वॉरफेअर फोर्सचे तांत्रिक समर्थन मिळेल.

एकात्मिक संरक्षण मुख्यालयाच्या माहितीनुसार, या फोर्ससाठी सध्या ५० हजार लष्करी जवानांना प्रशिक्षण दिले जात आहे. पुढील तीन वर्षांत १५ नवीन 'सेंटर ऑफ एक्सलन्स' (उत्कृष्टता केंद्रे) तयार केली जातील. येथे सिम्युलेटर आणि व्हर्च्युअल रिॲलिटीच्या माध्यमातून रिअल-टाईम युद्ध प्रशिक्षण दिले जाईल. भविष्यात बीएसएफ आणि आयटीबीपीसारख्या सुरक्षा दलांनाही या नेटवर्कशी जोडले जाईल. ही फोर्स गुप्तचर, पाळत ठेवणे आणि अचूक हल्ला करण्याची दुहेरी भूमिका बजावेल. या प्रणालीला वायुदलाच्या एकात्मिक हवाई कमांड आणि लष्कराच्या आकाशतीर प्रणालीचे कवच मिळेल. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारताने स्वतःला संरक्षण उत्पादनात खूप मजबूत केले. शत्रूच्या स्वस्त ड्रोनचा सामना करण्यासाठी आता किफायतशीर सॉफ्ट किल (जॅमिंग/स्पूफिंग) आणि हार्ड किल (लेझर-आधारित डायरेक्टेड एनर्जी वेपन) तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे.

◂(*वृत्तसंस्था*)



### प्रत्येक सैनिकाकडे असेल स्वतःचा ड्रोन

ड्रोन फोर्सची कल्पना गेल्यावर्षी पाकिस्तानने हजार ड्रोनने हल्ला केल्यानंतर आली. त्याचा उद्देश महागड्या क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीला स्वस्त ड्रोनद्वारे आर्थिक नुकसान पोहोचवणे आहे. सैन्याची योजना या ड्रोन फोर्समधील प्रत्येक जवानाला ड्रोन चालवण्याचे मूलभूत प्रशिक्षण देण्याची आहे. युद्धभूमीवर प्रत्येक सैनिकाकडे स्वतःचा ड्रोन असावा हे उद्दिष्ट आहे. याशिवाय सैन्याच्या प्रत्येक कोरमध्ये ८,००० ड्रोन समाविष्ट करण्याची योजना आहे. ■

### क्षेपणास्त्रांची देखभाल भारतातच होणार

**युरोपीय संरक्षण क्षेत्रातील दिग्गज कंपनी 'एमबीडीए'सोबत भारतीय वायुदलाचा एक महत्त्वाचा करार झाला आहे. करारानुसार, राफेल लढाऊ विमानात वापरल्या जाणाऱ्या मिका एअर टू एअर क्षेपणास्त्रांची देखभाल आता भारतातच वायुदल करेल. यासाठी देशात त्यांच्या 'देखभाल, दुरुस्ती, मिड लाईफ ओव्हरहॉल'ची सुविधा तयार केली जाईल.** ■

# भारतीय शस्त्रांपुढे पाकिस्तानने टाकली नांगी

## स्वदेशी क्षेपणास्त्रांनी दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त ● चिनी शस्त्रे निष्प्रभ




◆ **नवी दिल्ली, ७ मे**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर हल्ले करत प्रत्युत्तर दिले. भारतीय वायुदलाने एकाच वेळी नऊ दहशतवादी तळांवर अचूक हल्ले केले. या मोहिमेत जैश-ए-मोहम्मद, लश्कर-ए-तोएबा आणि हिजबुल मुजाहिद्दीन यासारख्या दहशतवादी संघटनांशी संबंधित १०० पेक्षा जास्त दहशतवादी, त्यांचे प्रशिक्षक, हॅण्डलर्स मारले गेले. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारतीय शस्त्रांची ताकद जगाने पाहिली आणि याच ताकदीपुढे पाकिस्तान निष्प्रभ ठरला.

पाकिस्तानला तुर्की आणि चीनने शस्त्रांची मदत केली मात्र, भारतीय शस्त्रांपुढे त्यांचा टिकाव लागला नाही.



व्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानातील दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्यासाठी भारताने ७ मे २०२५ रोजी सुरू केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'ला गुरुवारी एक वर्ष पूर्ण झाले आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा सूड घेण्यासाठी सुरू केलेली ही लष्करी मोहीम शत्रूला अद्दल घडवणारी ठरली असे संरक्षण विभागाने 'एक्स'वर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. पाकिस्तानने दहशतवादी तळांचे संरक्षण करण्यासाठी भारतावर लष्करी हल्ले केले, तेव्हा भारताने अणुहल्ल्याचा धोका ओळखून निर्णायक हल्ले केले. यासाठी भारतीय लष्कर आणि वायुदलाने अत्याधुनिक आणि धोकादायक शस्त्रांचा वापर केला, ज्यांनी पाकिस्तानच्या आत अनेक किलोमीटरपर्यंत अचूक हल्ले करून पाकिस्तानचे मोठे नुकसान केल्याचे पोस्टमध्ये म्हटले आहे. ◂(*वृत्तसंस्था*)

### भारताने कोणती शस्त्रे वापरली?

- **ब्रह्मोस**: या ऑपरेशनमध्ये ब्रह्मोस क्षेपणास्त्र हे भारताचे प्रमुख हल्ला करणारे शस्त्र होते, ज्यामुळे भारतीय लष्कराला सामरिक फायदा मिळाला.
- **आत्मघाती ड्रोन्स** : पाकिस्तानी हवाई तळांवर हल्ले करण्यासाठी आणि शत्रूची रडार व क्षेपणास्त्र प्रणाली नष्ट करण्यासाठी आत्मघाती ड्रोन्सचा वापर केला गेला.
- **ड्रोन आणि शस्त्रसामग्री**: पाकिस्तानी लढाऊ विमाने आणि ड्रोनचे लक्ष विचलित करण्यासाठी भारताने इस्रायलकडून खरेदी केलेले हॅरॉन ड्रोनही तैनात केले.
- **एम-७७७ हॉवित्झर तोफ** : अमेरिकेकडून खरेदी केलेल्या एम-७७७ अतिहलक्या हॉवित्झर तोफांचा वापर केला. या तोफा नियंत्रण रेषेपलीकडील दहशतवादी तळांना लक्ष्य करण्यासाठी प्रभावी ठरल्या. ■

### हवाई संरक्षण प्रणालीने रोखले शत्रूचे हल्ले

- **आकाश क्षेपणास्त्र प्रणाली** : या प्रणालीने एकाच वेळी अनेक लक्ष्यांवर मारा करण्याची क्षमता दाखवली आहे.
- **एकात्मिक हवाई कमांड आणि नियंत्रण प्रणाली** : ही आधुनिक नेटवर्क प्रणाली भारतासाठी सुरक्षाकवच ठरली होती.
- **ड्रोनविरोधी प्रणाली आणि काउंटर-यूएएस ग्रिड**: या अभेद्य स्वदेशी प्रणालीने ७-८ मे च्या रात्री पाकिस्तानची क्षेपणास्त्रे शोधून पूर्णपणे निकामी केले.
- **पारंपरिक आणि हवाई संरक्षण शस्त्रे** : शत्रूचे हल्ले हाणून पाडण्यासाठी पेचोरा, ओएसए-एके आणि लो-लेव्हल एअर डिफेन्स गन्सचा (एलएलएडी) वापर करण्यात आला.
- **इलेक्ट्रॉनिक युद्धप्रणाली** : या प्रणालीचा वापर करून, भारतीय वायुदलाने पाकिस्तानला पुरवलेल्या चिनी हवाई संरक्षण प्रणाली पूर्णपणे निकामी केले.
- **उपग्रह तंत्रज्ञान** : भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या १० उपग्रहांनी किनारपट्टीवर आणि उत्तर सीमेवर सतत पाळत ठेवून, संपूर्ण मोहिमेची सुरक्षा सुनिश्चित केली. ■



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# 'हिंसा संस्कृती' ठेचून काढा!

राजकारणात कोणी कोणाचा कायमचा शत्रू नसतो अथवा कायमचा मित्रही नसतो, असे म्हटले जाते. 'राजकारणाची संस्कृती' असा चमकदार मुलामा या विचारास चढविला जातो. या संस्कृतीत विचारांचा मुकाबला विचाराने करावा, असा संकेतही अधोरेखित केला जातो. प्रत्यक्षात देशातील राजकारणाच्या इतिहासात यापैकी बऱ्याच बाबींमध्ये विसंगतीच आढळते आणि विचारांचा मुकाबला संघर्षानेच केला जातो, असेही असंख्य दाखले दिसतात. पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीत ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला जनतेने साफ नाकारल्यानंतरही जनादेशाची कदर न करता राजीनामा न देण्याचा हट्ट धरून त्यांनी घेतलेला पवित्रा राजकारणातील सभ्यतेच्या आणि राजकीय संस्कृतीच्या कोणत्याही निकषात बसत नाहीच; उलट पराभवाच्या नैराश्यातून तेथे सुरू झालेल्या हिंसाचाराने या कथित राजकीय संस्कृतीचा मुलामा मात्र उडून गेला असून वैराच्या संस्कृतीचे पितळ उघडे पडताना दिसू लागले आहे. पश्चिम बंगाल हे राज्य एकेकाळी सांस्कृतिक प्रबोधन, बौद्धिक चळवळी, साहित्य, नाटक, विद्यार्थी आंदोलन आणि राजकीय जागरूकतेचे केंद्र मानले जात होते. रवींद्रनाथ ठाकूर, नेताजी सुभाषचंद्र बोस, ईश्वरचंद्र विद्यासागर, सत्यजित राय यांच्या विचारपरंपरेने समृद्ध असलेल्या या भूमीने भारतीय राजकारणाला वैचारिक दिशा दिली. पश्चिम बंगालमध्ये निवडणूक हा क्वचितच 'मतदानाचा उत्सव' होता. उलट, अनेकदा निवडणूक ही सत्तेकरिता होणारी रस्त्यावरची हिंसक लढाईच ठरली होती. ग्रामपंचायतीपासून विधानसभेपर्यंतच्या अनेक निवडणुकांत विरोधकांना रोखणे, बूथ काबीज करणे, पक्षांतर घडवून आणणे, संघटनांवर नियंत्रण ठेवणे आणि स्थानिक सत्तेवर वर्चस्व प्रस्थापित करणे यासाठी हिंसेचा वापर होत असल्याचे चित्र सातत्याने दिसत आले आहे. स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत या राज्यात काँग्रेस, माकप आणि तृणमूल काँग्रेस अशी सत्तांतरे घडली. या सर्व पक्षांनी दीर्घकाळ राज्यात सरकारे चालविली; पण हिंसेची राजकीय संस्कृती कायम राहिली, असेच या राज्याच्या इतिहासाचे इतिवृत्त सांगते.

स्वातंत्र्यानंतर प्रारंभीच्या दशकांत काँग्रेसचे बंगालमध्ये वर्चस्व होते. याच काळात नक्षलवादी चळवळीचा उदय झाला. चारू मजूमदार यांच्या नेतृत्वाखालील नक्षलबाडी उठावाने बंगालमध्ये सशस्त्र राजकीय संघर्षाची नवी परंपरा सुरू केली. पोलिस, जमीनदार, राजकीय विरोधक यांच्यावर हल्ले झाले; आणि त्यात पोलिसी दडपशाही आणि चकमकींच्या रक्तरंजित वातावरणाची भर पडत गेली. हा इतिहास जुना नाही. १९७० च्या दशकात तर कोलकाता आणि ग्रामीण बंगालमध्ये 'राजकीय हत्या' हा जवळपास दैनंदिन शब्द बनला होता. काँग्रेसला पराभूत करून सत्तेवर आलेल्या माकप-नेतृत्वाखालील डाव्या आघाडीने पुढील ३४ वर्षे बंगालवर राज्य केले. या काळात गावागावांत पक्षनिष्ठेच्या स्पर्धेतून संघर्ष उफाळले . मरीच झापी प्रकरण, सैंबारी हत्याकांड, आनंदमार्गीय साधू-साध्वी हत्या आणि नंतर नंदीग्राम-सिंगूर आंदोलनांनी डाव्या राजवटीची प्रतिमा डागळली. विशेषतः २००७ मधील नंदीग्राम हिंसाचाराने बंगालच्या राजकारणाला निर्णायक वळण दिले. जमिनीच्या अधिग्रहणाविरोधात आंदोलन करणाऱ्यांवर पोलिस आणि कथित माकप समर्थकांनी केलेल्या कारवाईत अनेक जण मारले गेले आणि या संघर्षातूनच ममता बॅनर्जींचा उदय झाला. हिंसाचाराच्या दहशतीतून राज्याला मुक्तता मिळेल, राजकारणात परिवर्तन घडेल, अशी अपेक्षा त्यावेळी व्यक्त होत होती, पण जुन्या राजवटीची पुनरावृत्तीच जनतेस पाहावयास मिळाली. परिवर्तनाची घोषणा देत नंदीग्राम आणि सिंगूरच्या आंदोलनातून ममता बॅनर्जी या ग्रामीण असंतोषाचा चेहरा बनल्या आणि २०११ मध्ये त्या सत्तेवर आल्या. मात्र, काही वर्षांतच वेगळे चित्र समोर आले. केवळ सत्ताबदल झाला; संस्कृती मात्र तीच राहिली. २०१८ च्या पंचायत निवडणुकांपासून २०२१ च्या विधानसभा निवडणुकांपर्यंत बंगाल पुन्हा हिंसाचाराच्या चर्चेत राहिला. राज्यात भाजपा झपाट्याने विस्तारत असल्याने एका नव्या हिंसक संघर्षाने पश्चिम बंगाल काळवंडला. संघ-भाजपाच्या अनेक कार्यकर्त्यांच्या हत्या, घरांची जाळपोळ, महिलांवरील अत्याचार, पक्षांतरासाठी दबाव अशा आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरू झाली. डावे विरुद्ध उजवे, धर्मनिरपेक्षता विरुद्ध हिंदुत्व, ग्रामीण गरीब विरुद्ध उद्योगपती अशा तीव्र आणि हिंसक संघर्षांनी राजकारणाचे ध्रुवीकरण होत गेले. मात्र अशा राजकीय गुन्हेगारीबाबत सत्ताधीशांनी फारशी कठोर भूमिका घेतलीच नाही. उलट, तपासावर राजकीय प्रभाव, साक्षीदार फिरणे, दीर्घकालीन न्यायालयीन प्रक्रिया यामुळे येथील राजकारण हा सामान्यांसाठीदेखील असुरक्षिततेच्या भावनेत भर घालणारा मुद्दा ठरला.

भाजपा नेते आणि पश्चिम बंगालमधील सत्तांतरानंतरचा राज्याच्या नेतृत्वाचा चेहरा ठरलेले सुवेंदु अधिकारी यांचे खाजगी सचिव चंद्रनाथ रथ यांची क्रूर हत्या हा या हिंसक राजकारणाचा कळसाध्याय ठरला आहे. ममता बॅनर्जी यांना भवानीपूर मतदारसंघात पराभूत करण्याच्या भाजपाच्या प्रचारनीतीमध्ये रथ यांचा मोठा वाटा होता. ज्या लोकशाहीचा, संविधानाचा आणि राजकारणाच्या संस्कृतीचा विशेषतः विरोधकांकडून वारंवार उल्लेख केला जातो, लाल रंगाचे वेष्टन असलेली पुस्तिका संविधान म्हणून उंचावत लोकशाहीचे गोडवे गायिले जातात, त्या लोकशाही प्रक्रियेनुसार आणि संविधानाच्या मान्यतेनुसार मतदारांनी दिलेला कौल अमान्य करीत ममता बॅनर्जी आपल्या पदाचा राजीनामा न देण्याचा पवित्रा घेत आक्रमक झाल्या आहेत. तृणमूल काँग्रेसच्या पराभवानंतर उफाळलेल्या हिंसाचाराने लोकशाहीचा आणि संविधानाचा गजर करणाऱ्या विरोधकांच्या राजकारणाची खरी संस्कृती दिसू लागली आहे. ममता बॅनर्जी यांचा सत्ताकाळ हा पश्चिम बंगालमधील जंगलराज होता, असा आरोप केला जातो. आता सत्ता संपुष्टात आल्यानंतरही त्याचे अवशेष अजूनही वळवळताना दिसत आहेत. आज बंगालमध्ये तृणमूल-काँग्रेस आणि भाजपा यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र होत आहे. डावे आणि काँग्रेस यांची पारंपरिक ताकद कमी झाली असली तरी ध्रुवीकरण वाढले आहे. समाजमाध्यमी मंचावरील उलटसुलट प्रचारामुळे राजकारण अधिक आक्रमक झाले आहे. तरीही, काही आशेची किरणे या निवडणुकीतून समोर आली आहेत. शहरी मध्यमवर्ग, तरुण मतदार आणि नागरी समाजात हिंसाचाराबद्दल वाढती अस्वस्थता दिसते. न्यायालये, निवडणूक आयोग आणि राष्ट्रीय माध्यमांचे वाढते लक्ष यामुळे काही प्रमाणात नियंत्रण येत आहे. बंगालमधील नव्या पिढीला रोजगार, उद्योग, शिक्षण आणि गुंतवणूक यांचे प्रश्न अधिक महत्त्वाचे वाटू लागले आहेत. सततच्या संघर्षामुळे उद्योग आणि रोजगाराच्या संधी कमी झाल्याची जाणीवही वाढते आहे. या राज्यातील सत्तापरिवर्तन हा याच जाणिवांचा परिणाम आहे. जनतेने मान्यता दिलेला भारतीय जनता पक्ष हा आता तृणमूल काँग्रेसच्या दृष्टीने पहिल्या क्रमांकाचा शत्रू ठरला आहे. त्यामुळे एका आशादायक भविष्याची अपेक्षा व्यक्त करणारा कौल जरी मतदारांनी दिला असला, तरी पश्चिम बंगालच्या राजकीय संस्कृतीस व्यापून राहिलेला हा हिंसक चेहरा संपूर्णपणे बदलेल, याबद्दल काहीशी शंकाच आहे. हिंसा ही केवळ कायदा-सुव्यवस्थेची समस्या नसून ती राजकीय सत्तेच्या वापराची आजवरची पद्धत बनली आहे आणि तेथील राजकारणास ही पद्धत अंगवळणी पडली आहे. त्यामुळे सरकार बदलल्यानंतर आता राजकारणात भिनलेली ही पद्धत बदलण्याचे मोठे आव्हान भाजपासमोर उभे राहणार आहे. संपूर्ण राजकीय संस्कृती, पोलिस यंत्रणा, न्यायव्यवस्था आणि स्थानिक राजकीय व्यवहार या सर्वच पातळ्यांवर बदल घडविले, तरच पश्चिम बंगालमध्ये जन्मलेली रवींद्रनाथ ठाकूर, नेताजी सुभाषचंद्र बोस, ईश्वरचंद्र विद्यासागर, सत्यजित राय यांच्या विचारपरंपरेने समृद्ध झालेली संस्कृती पुनरुज्जीवित होईल. पश्चिम बंगाल ही भूमी विचारांची आणि संघर्षांचीही आहे. हा संघर्ष लोकशाही पद्धतीने होईल की रक्तरंजित होईल, एवढाच प्रश्न निकाली काढावा लागेल. कारण पश्चिम बंगालमधील हिंसाचार केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नसून राजकीय नियंत्रणाच्या संस्कृतीचा भाग बनला आहे.

## प्रासंगिक

# सोमनाथ आणि भारताचा अजेय विश्वास

**नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

२०२६ च्या सुरुवातीला मी सोमनाथ स्वाभिमान पर्वात सहभागी होण्यासाठी सोमनाथ येथे गेलो. सोमनाथच्या मंदिरावर झालेल्या पहिल्या हल्ल्याला एक हजार वर्षे पूर्ण झाल्याचे स्मरण म्हणून हे पर्व आयोजित करण्यात आले होते. आता येत्या ११ मे रोजी मी पुन्हा सोमनाथला जाणार आहे. भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते सोमनाथच्या पुनरुज्जीवित मंदिराचे उद्घाटन करण्यात आले होते; त्या घटनेला ७५ वर्षे होत असल्याच्या निमित्ताने तिथे उत्सव होणार आहे. अगदी सहा महिन्यांच्या आत सोमनाथ मंदिराशी संबंधित दोन महत्त्वाच्या घटनांचा साक्षीदार होण्याचे भाग्य मला लाभले असून उद्ध्वस्त केलेल्या मंदिराच्या पुनरुज्जीवनाचा प्रवास म्हणजेच ज्याला आपण विध्वंस ते सृजन असे म्हणतो, तसा हा प्रवास आहे.

सोमनाथ आपल्याला एक सांस्कृतिक संदेश देतो. त्याच्यासमोरचा विशाल सागर कालातीत आहे, त्याच्या लाटा आपल्याला सांगतात... वादळे कितीही भयंकर असू देत, लाटा कितीही उंच उसळू दे, आपण त्यातूनही पुन्हा उभे राहू शकतो, सन्मानाने आणि ताकदीने! कितीही संकटे आली तरी लाटा किनाऱ्यापर्यंत पोहोचतात, अगदी तसेच, जनतेच्या आतील चैतन्य आणि विश्वास, कितीही पिढ्या गेल्या तरी तसाच कायम राहतो, त्याला फार काळ दाबून ठेवता येत नाही.

आपल्या प्राचीन ग्रंथात सांगितले आहे : 'प्रभासं च परिक्रम्य पृथिवीक्रमसंभवम्।' याचा अर्थ, या पवित्र प्रभासाची (सोमनाथ) प्रदक्षिणा संपूर्ण पृथ्वी प्रदक्षिणा घालण्याइतकी पवित्र आहे. भाविक येथे प्रार्थना आणि दर्शनासाठी येत असले, तरी त्यांनी येथे एका संस्कृतीच्या कधीही न विझलेल्या ज्योतीचा अनुभव घेतला आहे, त्याची शाश्वतता त्यांनी अनुभवली आहे. साम्राज्ये उभी राहतात आणि लयाला जातात, लाटा बदलतात, युद्ध आणि क्रांतीच्या प्रदेशातून इतिहास आपली वाटचाल करीत होता, तरीही सोमनाथ आपल्या आतील चेतनेमध्ये सदैव कुठेतरी जागे होते.

ही वेळ अशा सगळ्या अनाम अगणित लोकांचे स्मरण करण्याची आहे, जे हुकूमशाही अत्याचारांच्या विरोधात ठामपणे पाय रोवून उभे राहिले. लाकुलिशा आणि सोमा सरमन यांनी या प्रभासाचे रूपांतर तत्त्वज्ञानाच्या एका मोठ्या केंद्रात केले. वल्लभीचे चक्रवर्ती महाराज धरासेन चौथे यांनी, कित्येक शतकांपूर्वी येथे दुसरे मंदिर बांधले. भीमा देवी, जयपाल आणि आनंदपाल यांनीही आक्रमकांविरोधात लढून आपल्या संस्कृतीचे संरक्षण आणि संवर्धन केले. असे म्हटले जाते की, राजा भोजानेदेखील मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी मदत केली. कर्णदेव आणि सिद्धराजा जयसिंह यांनीही गुजरातची राजकीय आणि सांस्कृतिक ताकद पुनरुज्जीवित करण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली. भाव बृहस्पती, कुमारपाल, सोळंकी आणि पशुपात आचार्य यांनी या पवित्र स्थळाची पुनर्बांधणी करून तिथे पूजा अर्चना आणि शिक्षणाचे मोठे केंद्र उभारले. विशालदेव वाघेला आणि त्रिपुरांतक यांनी येथील बौद्धिक आणि आध्यात्मिक परंपरांचे संरक्षण केले. महिपालदेव आणि रा खंगार यांनी विध्वंसानंतर पुन्हा उपासना सुरू करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. सध्या देशात ज्यांची ३०० वी जयंती साजरी केली जात आहे त्या अहिल्यादेवी होळकर यांनी अत्यंत प्रतिकूल काळातही भक्तीची परंपरा अखंड ठेवली. तसेच बडोद्याच्या गायकवाड यांनी यात्रेकरूंच्या हक्कांचे संरक्षण केले. आणि अर्थातच, आपल्या भूमीने हमीरजी गोहिल आणि वेगडाजी भिल्ल यांसारख्या शूर व्यक्तिमत्त्वांना जन्म दिला, ज्यांचे बलिदान आणि शौर्य आजही सोमनाथच्या जिवंत स्मृतीचा भाग बनले आहे. १९४०च्या दशकात, ज्यावेळी संपूर्ण भारतभरात स्वातंत्र्याची भावना जोर धरू लागली होती आणि सरदार पटेल यांच्यासारख्या



उत्तुंग नेत्याच्या नेतृत्वाखाली एका नवीन प्रजासत्ताकाचा पाया रचला जात होता, त्यावेळी सरदार पटेल यांना एक गोष्ट मनापासून अस्वस्थ करीत होती... ती म्हणजे सोमनाथ मंदिराची दुरवस्था. एकदा दिवाळीचा सण असताना १३ नोव्हेंबर १९४७ रोजी, ते मंदिराच्या त्या भग्न अवशेषांजवळ उभे राहिले आणि हाताच्या ओंजळीत समुद्राचे पाणी घेऊन ते म्हणाले होते की, या नववर्षाच्या (गुजराती) शुभदिनी आम्ही सोमनाथ मंदिराची पुनर्बांधणी केली जावी, असा संकल्प केला आहे. तुम्ही सौराष्ट्रातील जनतेने, यासाठी जे शक्य आहे ते केले पाहिजे. हे एक पवित्र कार्य असून यात सर्वांनी सहभागी व्हायला हवे. सरदार पटेल यांच्या त्या एका आवाहनाला केवळ गुजरातच नाही तर संपूर्ण भारतातील जनतेने मोठ्या उत्साहाने प्रतिसाद दिला.

दुर्दैवाने, नियतीने मात्र सरदार पटेल यांना, त्यांनी अत्यंत तळमळीने जोपासलेले हे स्वप्न पूर्ण होताना पाहण्याची संधी दिली नाही. जीर्णोद्धार झालेल्या सोमनाथ मंदिराचे दरवाजे भाविकांसाठी उघडण्यापूर्वीच ते हे जग सोडून निघून गेले होते. असे असले तरी, प्रभास पाटणच्या त्या पवित्र किनाऱ्यावर त्यांचा प्रभाव सातत्याने जाणवत राहिला. के. एम. मुंशी यांनी सरदार पटेलांचा हा संकल्प पुढे नेला. या कार्यात त्यांना नवानगरच्या जामसाहेबांनीही मोलाची साथ दिली. १९५१ मध्ये मंदिराचे काम पूर्ण झाले. त्यावेळी या सोहळ्यासाठी राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांना निमंत्रित करण्याचा निर्णय झाला. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांचा तीव्र विरोध असतानाही डॉ. राजेंद्र प्रसाद या सोहळ्याला उपस्थित राहिले होते. त्यांच्या उपस्थितीमुळे हा सोहळा अधिकच खास आणि ऐतिहासिक ठरला.

आज मागे वळून पाहिल्यावर ऑक्टोबर २००१ मधल्या घडामोडी मला ठळकपणे आठवतात. त्यावेळी मी नुकतीच मुख्यमंत्री म्हणून जबाबदारी स्वीकारली होती. ३१ ऑक्टोबर २००१ रोजी, सरदार पटेल यांच्या जयंतीदिनी, सोमनाथ मंदिराचे दरवाजे उघडल्याच्या घटनेला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त एका सोहळ्याचे आयोजन करण्याचा बहुमान गुजरात सरकारला मिळाला होता. योगायोगाने त्याचवेळी सरदार पटेल यांची १२५ वी जयंतीही साजरी केली जात होती. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी आणि तत्कालीन गृहमंत्री लालकृष्ण अडवाणी त्या सोहळ्याला उपस्थित होते.

डॉ. राजेंद्र प्रसाद ११ मे १९५१ रोजी केलेल्या आपल्या भाषणात म्हणाले होते की, ज्या गोष्टीवर अढळ श्रद्धा आणि प्रेम असते, ती कधीही नष्ट होऊ शकत नाही, हाच संदेश सोमनाथ मंदिर अवघ्या जगाला देत आहे. हे मंदिर सदैव लोकांच्या हृदयात जिवंत राहील, अशी कामनाही त्यांनी व्यक्त केली होती. सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धार म्हणजे सरदार पटेल यांनी पाहिलेल्या स्वप्नाची पूर्ती आहे, पण आता तीच भावना पुढे नेत असताना आपण लोकांच्या जीवनात समृद्धी आणणे तितकेच महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी सांगितले होते. त्यांनी हे अत्यंत महत्त्वाचे आणि प्रेरणादायी संदेश आपल्या भाषणातून दिले होते.

गेल्या एका दशकाहून अधिक काळ आपण याच मार्गावर चालत आहोत. 'विकासही आणि वारसाही' या तत्त्वापासून प्रेरणा घेऊन सोमनाथपासून काशीपर्यंत, कामाख्यापासून केदारनाथपर्यंत, अयोध्येपासून उज्जैनपर्यंत आणि त्र्यंबकेश्वरपासून श्रीशैलमपर्यंत आमच्या चमूला आपल्या आध्यात्मिक केंद्रांचे पारंपरिक स्वरूप टिकवून ठेवत त्यांना अत्याधुनिक सोयीसुविधांनी सज्ज करण्याची संधी मिळाली, हे मी माझे भाग्य मानतो. संपर्क व्यवस्था सुधारण्याच्या प्रयत्नांमुळे अधिक लोकांना या केंद्रांना भेट देणे शक्य होत आहे. यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते, उपजीविकेचे पर्याय सुनिश्चित होतात आणि 'एक भारत, श्रेष्ठ भारत'ची भावना अधिक दृढ होते.

सोमनाथच्या रक्षणासाठी ज्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली आणि ज्यांनी त्याची वारंवार उभारणी केली, त्यांच्या संघर्षाचे आणि बलिदानाचे कधीही विस्मरण होणार नाही. भारताच्या विविध कानाकोपऱ्यांतील असंख्य व्यक्तींनी सोमनाथचे वैभव परत मिळवून देण्यासाठी योगदान दिले आहे. त्यांनी भारताचा प्रत्येक भाग पवित्र मानला आणि भौगोलिक सीमांच्या पलीकडे जाऊन एकात्मतेच्या भावनेने ते एकत्र जोडले गेले. अनेकदा विभाजनांनी चिन्हांकित असलेल्या या जगात, ही एकतेची भावना आज पूर्वीपेक्षा अधिक प्रासंगिक आहे. सोमनाथ आपल्या पूर्ण वैभवासह सदैव ताठ मानेने उभे राहील. कारण एकतेची ही भावना आणि सामायिक सांस्कृतिक चेतना प्रत्येक भारतीयाच्या हृदयात जिवंत आहे. यांना अभिवादन करण्यासाठी आणि एक हजार वर्षांच्या असाधारण शौर्याचे स्मरण म्हणून, सोमनाथमध्ये पुढील एक हजार दिवस विशेष पूजा आयोजित केली जाईल. अनेक लोक या पूजेसाठी देणगी देत आहेत, हे पाहून आनंद होतो.

या विशेष काळात सोमनाथला भेट देण्याचे मी माझ्या देशबांधवांना आवाहन करतो. जेव्हा तुम्ही सोमनाथच्या किनाऱ्यावर उभे राहाल, तेव्हा तेथील प्राचीन प्रतिध्वनींना तुमच्याशी संवाद साधू द्या. तिथे तुम्ही केवळ भक्तीने भारावून जाणार नाही तर कधीही न ओसरणाऱ्या, अभेद्य आणि अढळ अशा सांस्कृतिक चेतनेची प्रबळ स्पंदनेही अनुभवाल. तुम्हाला भारताच्या अजिंक्य वृत्तीचा अनुभव येईल आणि अनेक प्रयत्न होऊनही आपली संस्कृती अपराजित का राहिली, हे उमजेल. तसेच तुम्हाला शाश्वत विजयाचे दर्शन घडण्याची संधी मिळेल. हा अनुभव नक्कीच अविस्मरणीय असेल.

**॥ जय सोमनाथ ॥**

(पंतप्रधान नरेंद्र मोदी हे श्री सोमनाथ ट्रस्टचे अध्यक्षही आहेत.)

## वेध

**प्रफुल्ल व्यास**

# अशी पत्नी, असा मुलगा!

महाराष्ट्राच्या मातीने संतांची परंपरा जोपासली, माणुसकीचे धडे दिले, स्त्रीचा सन्मान हा संस्कार म्हणून रुजवला. पण, कधी कधी एखादी घटना या सगळ्या मूल्यांना हादरा देते. नसरापूर येथे तीन वर्षांच्या निष्पाप मुलीवर अत्याचार करून तिला ठेचून मारण्याची घटना समाजाच्या अंतःकरणाला भेदणारी वेदना आहे. ही घटना ऐकताना शब्द सुचत नाहीत आणि बोलताना आवाज थरथरतो. अशा घटनांनंतर समाजात संताप उसळतो, रस्त्यावर आंदोलने होतात, कठोर शिक्षेची मागणी केली जाते. पण, या सगळ्याच्या पलीकडे जाऊन आपण स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा, आपण कुठे चुकतो आहोत? तीन वर्षांच्या मुलीचं आयुष्य अजून सुरूही झालं नव्हतं. तिच्या जगात खेळणी होती, आईची कूस होती आणि निरागस हास्य होतं. पण, एका विकृत मानसिकतेच्या व्यक्तीने तिच्यावर अत्याचार करून जीवाने संपवून टाकले.

अशा घटना अचानक घडत नाहीत. त्या एका विकृत मानसिकतेच्या, समाजातील काही चुकीच्या प्रवृत्तींच्या आणि आपल्या सामूहिक दुर्लक्षाचा परिणाम आहे. आपण आपल्या मुलांना काय शिकवतो? स्त्री-पुरुष समानता, आदर, सहानुभूती हे केवळ पाठ्यपुस्तकात राहिले आहेत का? नसरापूरमध्ये झालेलं आंदोलन हे जनतेच्या भावनांचं प्रतिबिंब आहे. लोक रस्त्यावर उतरले, न्यायाची मागणी केली. ही भावना योग्यच आहे. पण, आंदोलन हा केवळ तात्पुरता प्रतिसाद असतो. काही दिवसांनी सगळं शांत होतं आणि आपण पुन्हा आपल्या दैनंदिन कामात व्यस्त होतो. प्रश्न असा आहे आपण या घटनांमधून काही शिकलो का? या प्रकरणात आरोपी कांबळेच्या पत्नीने केलेलं वक्तव्य विशेष लक्षवेधी ठरतं. त्याला ठेचून काढा, मला ते सांगू नका, असे प्रसार माध्यमांना सांगितले. तर त्या नराधमाच्या मुलानेही अशा बापाच्या पोटी जन्म घेतल्याची लाज वाटते, असे स्पष्ट शब्दांत म्हटलं. त्या माय-लेकाचं विधान नात्यांपेक्षा माणुसकी मोठी असल्याचं स्पष्ट होतं. कदाचित, ते उद्विग्न होऊन बोलले असतीलही. पण, अशा वेळी त्यांनी त्याची पाठराखण केली नाही. तो मानसिक रुग्ण आहे हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला नाही, हे या ठिकाणी विशेष नोंदवले गेले पाहिजे. गुन्हेगार कोणीही, कोणत्याही वयाचा, कोणत्याही जातीचा, कोणत्याही समाजाचा, कोणत्याही धर्माचा असो त्याचे समर्थन नाही, ही भूमिका समाजाने घ्यायला हवी. हेच त्या माय-लेकाने स्पष्ट केले. अन्यथा समाजात नवऱ्याच्या अनेक वाईट सवयींवर पांघरूण घालणाऱ्या बायका आहेत. मुलाने कितीही वाईट कृत्य केले तरी मुलाला पदराआड घेणारी आईही याच समाजात आहे. अशा घटना रोखायच्या असतील तर सुरुवात घरापासून करावी लागेल. मुलांना लहानपणापासूनच स्त्रियांचा आदर करायला शिकवणं गरजेचं आहे. मुलगा आहे, थोडंफार चालतं ही मानसिकता बदलावी लागेल. पालकांनी मुलांच्या वागणुकीवर लक्ष ठेवणं, त्यांच्याशी संवाद साधणं आणि योग्य-अयोग्य याची जाणीव करून देणं आवश्यक आहे. समाजातील विकृत घटना कायम थांबणाऱ्या नाहीत. कारण प्रत्येक कुप्रवृत्तीला आळा घालण्याचे काम कायदा करू शकत नाही. नसरापूर येथील घटनेतील आरोपीला यापूर्वीच कठोर शिक्षा झाली असती तर कदाचित ही तीन वर्षांची चिमुकली बळी गेली नसती. परंतु, कायद्याचा साक्षीवर फारच भरवसा आहे. ती खोटी साक्ष असली तरी चालेल. पण, साक्षीदार हवा असतो. अशा घटनांमध्ये शिक्षा न होण्याला कायद्याचा मोठा अडसर आहे. हा अडसरच गुन्हेगारी प्रवृत्तीला बळ देते. कठोर कायदे असणं महत्त्वाचं आहे. पण, त्याहून महत्त्वाची आहे त्यांची अंमलबजावणी. अनेक वेळा गुन्हेगारांना शिक्षा होण्यास उशीर होतो किंवा ते सुटून जातात. त्यामुळे समाजात भीती निर्माण होत नाही. फास्ट ट्रॅक कोर्ट, कडक शिक्षा आणि पोलिस यंत्रणेची जबाबदारी हे सगळं प्रभावीपणे केलं पाहिजे. आपण अनेकदा म्हणतो हे सगळं सरकारचं काम आहे. पण समाज म्हणून आपलीही जबाबदारी आहे. संशयास्पद वर्तन दिसल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता योग्य वेळी तक्रार करणं, पीडितांना आधार देणं आणि जागरूकता वाढवणं हे सगळं आपण करू शकतो. स्त्रीसुरक्षा हा केवळ कायद्याचा विषय नाही, तो सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिकतेचा विषय आहे. नसरापूरची घटना आपल्याला हादरवून सोडते. पण हा हादरा केवळ काही दिवसांचा न राहता, तो बदलाचा प्रारंभ व्हायला हवा. प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात केली. तरच समाज बदलू शकतो.

त्या निष्पाप मुलीला आपण परत आणू शकत नाही. पण, तिच्या आठवणीला न्याय देण्यासाठी, अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी आपण प्रयत्न करू शकतो. हे जरी सत्य असले तरी कायदा कठोर करण्याची गरज आहे. तसेच समाजात त्या कांबळेच्या पत्नी आणि मुलासारख्या मुलाचीही गरज आहे तेव्हाच घरातून, समाजातून गुन्हेगारीला आळा बसेल.

९८८१९०३७६५

## अर्थविशेष

# मालमत्ता खरेदीपूर्वी 'ड्यू डिलिजन्स' का आवश्यक आहे?

**हितेश पारसे**

घर हे केवळ चार भिंतींचे बांधकाम नसते. ते प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यभराच्या कष्टांचे, स्वप्नांचे, भावनिक सुरक्षिततेचे आणि भविष्यातील स्थैर्याचे प्रतीक असते. एखाद्यासाठी ते मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी घेतलेली गुंतवणूक असते, तर एखाद्यासाठी निवृत्तीनंतरची शांत आणि सुरक्षित आयुष्याची हमी असते. काही जण व्यवसायासाठी व्यावसायिक जागा खरेदी करतात, तर काही लोक आपल्या आयुष्यभराच्या बचतीचा प्रत्येक रुपया खर्च करून स्वतःचे छोटेसे घर उभे करतात.

आजच्या काळात बहुतांश मालमत्ता व्यवहार हे बँक कर्ज, ई.एम.आय., आर्थिक नियोजन आणि भविष्यातील अपेक्षांशी जोडलेले असतात. त्यामुळे मालमत्ता खरेदी हा केवळ व्यवहार राहत नाही, तर तो संपूर्ण कुटुंबाच्या सुरक्षिततेचा आणि आर्थिक भविष्याचा प्रश्न बनतो. परंतु दुर्दैवाची बाब म्हणजे, अनेक वेळा लोक मालमत्ता खरेदी करताना भावनिक निर्णय घेतात आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट दुर्लक्षित करतात- 'कायदेशीर पडताळणी.'

आकर्षक जाहिराती, कमी किंमत, 'प्री-लाँच ऑफर', 'लिमिटेड पीरियड डिस्काऊंट', 'ताबडतोब पझेशन', 'गुंतवणुकीवर दुप्पट परतावा' अशा मार्केटिंगच्या गोष्टींना भुलून अनेक लोक घाईघाईने व्यवहार करतात. परंतु काही वर्षांनी समोर येते की त्या मालमत्तेवर न्यायालयीन वाद सुरू आहे, बँकेचे तारण आहे, बांधकाम अनधिकृत आहे किंवा प्रकल्पालाच आवश्यक सरकारी मंजुरी नाही. अनेक प्रकरणांमध्ये खरेदीदाराने लाखो रुपये भरलेले असतात, ई.एम.आय. सुरू असतो, परंतु प्रत्यक्षात त्या मालमत्तेवर स्टे ऑर्डर असते किंवा मालकी हक्कच वादग्रस्त असतो. काही जणांना वर्षानुवर्षे न्यायालयात खटले लढावे लागतात, तर काहींची आयुष्यभराची बचत अडकून पडते.

याच सर्व संभाव्य संकटांपासून संरक्षण देणारी आणि सुरक्षित गुंतवणुकीची खात्री देणारी प्रक्रिया म्हणजे- 'ड्यू डिलिजन्स.

**ड्यू डिलिजन्स म्हणजे नेमके काय?** : 'ड्यू डिलिजन्स' म्हणजे मालमत्ता खरेदीपूर्वी त्या मालमत्तेची सर्व बाजूंनी सखोल आणि तांत्रिक तपासणी करणे. ही फक्त काही कागदपत्रे पाहण्याची औपचारिक प्रक्रिया नसून, त्या मालमत्तेचा संपूर्ण कायदेशीर, आर्थिक, प्रशासकीय आणि प्रत्यक्ष वापराचा इतिहास तपासण्याची एक व्यापक प्रक्रिया आहे.

**यामध्ये खालील बाबींचा समावेश होतो** : मालकी हक्क तपासणी, कागदपत्रांची सत्यता, मागील व्यवहारांचा इतिहास, बँक कर्ज किंवा मॉर्गेज, सरकारी मंजुरी, बांधकाम परवानग्या, न्यायालयीन प्रकरणे, कर व थकबाकी, प्रत्यक्ष ताबा आणि वापर, भविष्यातील कायदेशीर आणि आर्थिक जोखीम

म्हणजेच, ड्यू डिलिजन्स ही मालमत्तेच्या 'आरोग्य तपासणी'सारखी प्रक्रिया आहे.

**भारतात ड्यू डिलिजन्स का अधिक महत्त्वाचे आहे?** : भारतामध्ये जमीन आणि मालमत्ता संबंधित कायदे अत्यंत गुंतागुंतीचे आणि बहुपदरी आहेत. एकाच मालमत्तेबाबत अनेक विभागांकडे स्वतंत्र नोंदी असतात आणि त्या सर्व नोंदींची सुसंगती तपासणे अत्यंत आवश्यक असते.

**उदाहरणार्थ** : महसूल विभाग, महानगरपालिका/नगर परिषद, नगररचना विभाग, सब-रजिस्ट्रार कार्यालय, आर.ई.आर.ए., बँका आणि वित्तीय संस्था, न्यायालये, एमआयडीसी/ एनआयटी / म्हाडा / सिडको, यांसारखी प्राधिकरणे.

अनेक वेळा एका विभागात मालमत्ता वैध दिसते, परंतु दुसऱ्या विभागात ती वादग्रस्त किंवा अनधिकृत असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रत्येक स्तरावर स्वतंत्र पडताळणी करणे आवश्यक असते.

**टायटल व्हेरिफिकेशन** - व्यवहाराचा पाया मालमत्तेवरील कायदेशीर मालकी हक्क तपासणे म्हणजे 'शीर्षक पडताळणी'. हा ड्यू डिलिजन्समधील सर्वांत महत्त्वाचा भाग मानला जातो. कारण मालकी हक्क स्पष्ट नसेल, तर संपूर्ण व्यवहार धोक्यात येऊ शकतो. यामध्ये खालील प्रश्नांची उत्तरे शोधली जातात :

विक्रेता खरोखर मालक आहे का?, त्याला विक्रीचा कायदेशीर अधिकार आहे का?, मालमत्ता वारसाहक्कातून आली आहे का?, कोणत्याही तृतीय पक्षाचा दावा आहे का?, मालमत्ता संयुक्त मालकीची आहे का?, पॉवर ऑफ ॲटर्नी वैध आहे का?, मालमत्ता न्यायालयीन वादात आहे का?

अनेक वेळा बनावट कागदपत्रे तयार करून किंवा खोट्या अधिकारांच्या आधारे मालमत्ता विकण्याचे प्रकार घडतात. योग्य कायदेशीर पडताळणी अशा फसवणुकीपासून संरक्षण देते.

**मालमत्तेचा मागील इतिहास का तपासला जातो?** : मालमत्तेचा मागील २० ते ३० वर्षांचा इतिहास तपासणे अत्यंत महत्त्वाचे असते. कारण मालकी हक्काची साखळी स्पष्ट असणे आवश्यक असते. मालमत्ता कोणाकडून कोणाकडे आणि कोणत्या कागदपत्रांच्या आधारे हस्तांतरित झाली हे समजणे गरजेचे असते. यामध्ये खालील कागदपत्रांचा अभ्यास केला जातो :

विक्रीपत्र, दानपत्र, वाटणीपत्र, मुक्ततापत्र, वारसा हक्काची कागदपत्रे, फेरफार नोंदी, न्यायालयाचे आदेश, महसुली नोंदी

जर साखळीमध्ये कुठेही त्रुटी असेल, तर भविष्यात मालकी हक्कावर प्रश्न निर्माण होऊ शकतो. एनकम्ब्रन्स सर्टिफिकेट (ईसी) का महत्त्वाचे? एनकम्ब्रन्स सर्टिफिकेट तपासल्याने मालमत्तेवर कोणतेही : बँक कर्ज, मॉर्गेज, तारण, आर्थिक बोजा, कायदेशीर जबाबदारी आहे का हे समजते. अनेक वेळा विक्रेता मालमत्ता बँकेत गहाण ठेवूनही ती विकण्याचा प्रयत्न करतो. योग्य पडताळणी न केल्यास भविष्यात बँक जप्तीची कारवाई होऊ शकते आणि खरेदीदार अडचणीत येऊ शकतो.

**फ्लॅट किंवा प्रकल्प खरेदी करताना विशेष काळजी?** : फक्त आकर्षक ब्रोशर, नमुना फ्लॅट किंवा जाहिराती पाहून प्रकल्पात गुंतवणूक करणे धोकादायक ठरू शकते. खालील मंजुरी तपासणे अत्यंत आवश्यक असते :

मंजूर नकाशा, प्रारंभ प्रमाणपत्र, पूर्णता प्रमाणपत्र, भोगवटा प्रमाणपत्र, रेरा नोंदणी, अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र, पर्यावरण मंजुरी, लिफ्ट परवानगी, इमारत वापर परवानगी.

ओसी नसलेल्या इमारतींमध्ये भविष्यात पाणी, वीज, मालमत्ता कर आणि कायदेशीर अडचणी निर्माण होऊ शकतात. अनेक वेळा अशा इमारतींना नियमित करण्यासाठी मोठा आर्थिक भार सोसायटी सदस्यांवर पडतो.

प्रत्यक्ष जागेची पाहणी का आवश्यक आहे? कागदपत्रे योग्य असली तरी प्रत्यक्ष स्थिती वेगळी असू शकते. म्हणूनच साईट व्हिजिट हा ड्यू डिलिजन्सचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. यामध्ये खालील बाबी तपासल्या जातात :

सीमारेषा, अतिक्रमण, रस्ता उपलब्धता, प्रत्यक्ष ताबा, परिसरातील विकास, झोनिंग, शेजारील वापर, ड्रेनेज व मूलभूत सुविधा. अनेक वेळा नकाशामध्ये दाखवलेली जागा आणि प्रत्यक्ष जमीन यात मोठा फरक आढळतो.

**न्यायालयीन वाद तपासणे का गरजेचे?** : मालमत्तेवर खालील प्रकारचे वाद सुरू असू शकतात :

वारसा वाद, विभाजन खटले, स्टे ऑर्डर, जमीन अधिग्रहण, सरकारी नोटीस, नागरी किंवा फौजदारी प्रकरणे

जर योग्य वेळी ही माहिती तपासली नाही, तर खरेदीदार अनेक वर्षे कोर्टात अडकू शकतो.

**कर आणि आर्थिक जोखमींचा संबंध**

ड्यू डिलिजन्सचा करदृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचा संबंध आहे.

चुकीच्या व्यवहारामुळे पुढील समस्या निर्माण होऊ शकतात :

भांडवली नफा कर वाद, मुद्रांक शुल्क मूल्यांकन समस्या, बेनामी व्यवहार संशय, प्राप्तिकर नोटीस, जीएसटी संबंधित प्रश्न, टी.डी.एस अनुपालन समस्या. विशेषतः मोठ्या व्यवहारांमध्ये करसल्लागार आणि कायदेशीर तज्ज्ञांचा सल्ला घेणे अत्यंत आवश्यक असते. 'स्वस्तात मिळतेय' म्हणजे सुरक्षित व्यवहार असे नसते. अनेक वेळा बाजारभावापेक्षा अत्यंत कमी किमतीत मालमत्ता उपलब्ध असल्याचे दाखवले जाते. परंतु अशा व्यवहारांमध्ये लपलेली कायदेशीर समस्या असण्याची शक्यता जास्त असते.

**उदाहरणार्थ** : विवादित जमीन, सरकारी आरक्षण, कृषी जमीन रूपांतरण समस्या, अनधिकृत बांधकाम, बँक तारण, अपूर्ण मंजुरी

म्हणूनच किंमत पाहण्यापूर्वी 'कायदेशीर सुरक्षितता' तपासणे आवश्यक आहे. ड्यू डिलिजन्स म्हणजे खर्च नाही ती सुरक्षिततेची गुंतवणूक आहे : काही लोक काही हजार रुपये वाचवण्यासाठी कायदेशीर पडताळणी टाळतात. परंतु त्याच चुकीमुळे भविष्यात लाखो रुपयांचे नुकसान, मानसिक त्रास, कोर्ट केस आणि आर्थिक अस्थिरता निर्माण होऊ शकते. मालमत्ता खरेदी हा केवळ आर्थिक व्यवहार नसून तो कुटुंबाच्या सुरक्षिततेचा, प्रतिष्ठेचा आणि भविष्यातील स्थैर्याचा प्रश्न असतो. म्हणूनच- 'प्रथम पडताळणी करा मगच गुंतवणूक करा.'

कारण स्मार्ट गुंतवणूकदार फक्त मालमत्ता खरेदी करत नाहीत

ते आपल्या गुंतवणुकीची कायदेशीर, आर्थिक आणि भविष्यातील सुरक्षितताही सुनिश्चित करतात.

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वाचक पत्र

### निवडणुकीत होणारी हिंसा अयोग्य

निवडणुका आणि हिंसा हे आपल्या लोकशाहीला नवे नाही. निवडणुकीत हिंसाचार होतोच मग ती ग्रामपंचायतीची निवडणूक असो की विधानसभा, लोकसभेची. हिंसाचार झाल्याशिवाय निवडणुका पार पडत नाहीच असा आपला अनुभव आहे. विशेषतः उत्तर भारतीय हिंदी भाषिक पट्ट्यातील राज्यात तर निवडणुका आणि हिंसाचार हे एकाच नाण्याच्या दोन बाजू ठरल्या आहेत. त्यामानाने महाराष्ट्रात खूप चांगली परिस्थिती आहे. इतर राज्यांत मात्र निवडणुकीआधी किंवा निवडणुकीनंतर मोठ्या प्रमाणावर हिंसाचार होतो. आता पश्चिम बंगालचेच पाहा ना या राज्यात विधानसभा निवडणुकीचा निकाल घोषित होताच मोठा हिंसाचार उसळला. निवडणुकीचा निकाल घोषित होताच राजकीय पक्षातील कार्यकर्त्यांत हाणामारी, मारामारीच्या घटना घडल्या. इतकेच नाही तर तोडफोड आणि जाळपोळीच्या घटनाही घडल्या. भारतीय लोकशाहीसाठी तर ही भयावह अशीच बाब आहे. निवडणुकीत होणारी हिंसा कमी करण्यासाठी निवडणूक आयोगाने ठोस धोरण आखायला हवे. निवडणूक आयोगाने हिंसामुक्त निवडणुकीसाठी कठोर पावले उचलायला हवीत.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






## 'सोलापूर जिल्ह्यात सफाई कर्मचाऱ्यांसाठी मॉडेल स्वरुपात दिशादर्शक काम करणे आवश्यक'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ७ मे -**

सफाई कर्मचाऱ्यांच्या समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र व राज्यशासन मिळून काम करीत आहेत; त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातही सफाई कर्मचाऱ्यांच्या पुर्नवसनाकरिता मॉडेल स्वरुपात दिशादर्शक काम करणे आवश्यक आहे, असे निर्देश महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांनी दिले.

जिल्हा नियोजन भवन येथे सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या व अडीअडचणी निवारणासाठी उपाययोजनांबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी कुशाल जैन, सहायक आयुक्त समाजकल्याण सुलोचना सोनवणे आदी उपस्थित होते.

सफाई कर्मचाऱ्यांच्या कल्याणाकरिता घरकुल, आरोग्य, शिक्षण, रोजगार आदी विषयांशी निगडित कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने भरावयांच्या पदांबाबतची कार्यवाही पूर्ण करावी. नगर विकास विभागाचे निर्णयानुसार ज्या सेवा २५ वर्षे किंवा त्याहून अधिक झाली आहे असे सफाई कामगार आणि २२ ऑक्टोबर २००८ नंतर सेवेत असलेले जे सफाई कामगार मृत्यू झाले आहेत, अशा मृत सफाई कामगारांच्या पात्र वारसांना घरे द्यावीत.

केंद्र व राज्यशासनाच्या योजनांचा लाभ देण्याकरिता शिबीरे घ्या, यावेळी सफाई कामगार क्षेत्रात कार्यरत अधिकृत संघटनांना सोबत घ्यावे. सफाई कर्मचाऱ्यांशी निगडित प्रलंबित मार्गी लावून तसा अहवाल आयोगाकडे सादर करावा, अशा सूचनाही डागोर यांनी दिल्या.

सफाई कर्मचारी आयोगाच्या दिलेल्या निर्देशाप्रमाणे जिल्ह्यात काम करण्यात येईल. यापूर्वीच्या बैठकीतील निर्देशाप्रमाणे सर्व संबंधित विभागाने कार्यवाहीबाबतचा अहवाल लवकरात लवकर आयोगाकडे सादर करावा, असेही जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस.यांनी बैठकीस उपस्थित विविध विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

# पाणीटंचाईवर विरोधक आक्रमक; तीव्र आंदोलनाचा इशारा

## विरोधी पक्षाचे निवेदन, बार्शीकरांना ७ ते ८ दिवस पाण्याविना राहण्याची वेळ

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. ७ मे -**

बार्शी शहरातील विस्कळीत व अनियमित पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी विरोधी पक्षातील नगरसेवकांनी बार्शी नगरपरिषद प्रशासनाला निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.बार्शी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांच्या नावे देण्यात आलेले निवेदन उपमुख्याधिकारी राजाराम नरोटे यांनी स्वीकारले.

निवेदनात म्हटले आहे की, गेल्या काही महिन्यांपासून विशेषतः उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. अनेक भागांमध्ये तब्बल ७ ते ८ दिवस पाणीपुरवठा होत नसल्याने महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे.

विशेष म्हणजे, उजनी व चांदणी या दोन्ही पाणीपुरवठा योजना सुरू असतानाही शहरात पाण्याची तीव्र टंचाई जाणवत आहे. शहरात पुरेशी साठवण क्षमता उपलब्ध असतानाही नियोजनाचा अभाव, वितरण व्यवस्थेतील त्रुटी, वाढलेली नळजोडणी संख्या, अपुरी मनुष्यबळ व्यवस्था, गळती आणि देखभाल दुरुस्तीतील दिरंगाई यामुळे परिस्थिती अधिक गंभीर बनल्याचा आरोप करण्यात आला आहे.

नागरिकांना नियमित वेळापत्रक न देता अचानक पाणी बंद करणे, कमी दाबाने पाणीपुरवठा करणे, काही भागांमध्ये शेवटच्या टोकापर्यंत पाणी न पोहोचणे अशा समस्यांमुळे नागरिकांना टँकर, खाजगी विहिरी व विकतच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच शहरातील अनेक भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणीगळती होत असून त्याची दुरुस्ती वेळेत केली जात नसल्याने लाखो लिटर पाणी वाया जात आहे. उजनी व चांदणी योजनांच्या देखभाल दुरुस्तीची कामे, वॉल ओपनर, हातपंप दुरुस्ती यांसारख्या अत्यावश्यक सेवांची प्रलंबित बिले वेळेत न दिल्याने कामांमध्ये दिरंगाई होत असल्याचीही तक्रार करण्यात आली आहे.

या निवेदनावेळी विरोधी पक्षनेते नागेश अक्कलकोटे, माजी उपनगराध्यक्ष कृष्णराज बारबोले, महेदीमियां लांडगे, बाळासाहेब पवार, नगरसेविका विद्या बंगाळे, सायरा मुल्ला, अमोल मांगडे, सचिन मांगडे,आकाश राऊत उपस्थित होते.



### पाथरी पाणीपुरवठा योजना पुन्हा सुरू करण्याची मागणी

ब्रिटिशकालीन नैसर्गिक उतारावर आधारित वीज खर्चाविना चालणारी पाथरी पाणीपुरवठा योजना रेल्वे ब्रॉडगेज कामावेळी बंद करण्यात आली होती. भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी ही योजना पुन्हा कार्यान्वित करणे अत्यंत आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे. तसेच नगरपरिषदेच्या अधिकृत सोशल मीडिया माध्यमांवरून पाणीपुरवठा वेळापत्रक, व्यत्यय, गळती, दुरुस्ती याबाबत कोणतीही नियमित माहिती प्रसिद्ध होत नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रम आणि नाराजी वाढत असल्याची बाबही निदर्शनास आणून देण्यात आली. पाणीपुरवठा विभागामध्ये आकृतिबंधानुसार आवश्यक अभियंते, तांत्रिक कर्मचारी व इतर पदे रिक्त असल्यामुळे कामकाजावर गंभीर परिणाम होत असून, आगामी संभाव्य सेवानिवृत्ती लक्षात घेऊन कोणतेही दीर्घकालीन नियोजन होत नसल्याची टीकाही करण्यात आली.

# खाकी वर्दीतून अधिकारीपदाकडे झेप!

### पिसेवाडीच्या गणेश वाघ यांचे पहिल्याच प्रयत्नात बनले पीएसआय



**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ७ मे -**

जिद्द, अथक परिश्रम आणि आत्मविश्वास यांच्या बळावर पिसेवाडी (ता. माळशिरस) येथील गणेशवाघ यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात १२० वा क्रमांकांसह यश मिळवले आहे. विशेष म्हणजे पोलीस कॉन्स्टेबल म्हणून सेवा बजावत, कुटुंबाची जबाबदारी सांभाळत आणि कोचिंग न घेता त्यांनी हे यश मिळवले आहे. परिणामी त्यांच्यावर पिसेवाडी व वेळापूर परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

गणेश वाघ यांचे माध्यमिक शिक्षण इंग्लिश स्कूल, वेळापूर येथे झाले. सांगोला येथे बी.एस्सी. (केमिस्ट्री) पदवी पूर्ण केली. त्यांचे वडील शेतकरी असून घरची आर्थिक परिस्थिती मध्यम होती. आर्थिक अडचणींना सामोरे जात असताना त्यांनी सांगोला येथे मामाच्या हॉटेलमध्ये काम करत, पदवी शिक्षण पूर्ण केले. सांगोला येथील राजमाता अकॅडमीत क्रिकेट प्रशिक्षक म्हणून कार्यरत असताना त्यांच्या आयुष्याला वेगळी दिशा मिळाली. मैदानावर पोलीस भरतीसाठी सराव करणाऱ्या युवकांना पाहून त्यांच्या मनातही खाकी वर्दी परिधान करण्याची प्रेरणा जागी झाली. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देत स्वतःचीही तयारी सुरू ठेवली. अखेर २०१८ मध्ये पहिल्याच प्रयत्नात एसआरपी, सोलापूर येथे पोलीस कॉन्स्टेबल पदावर निवड झाली. मात्र, त्यांची स्वप्ने इथेच थांबणारी नव्हती.

पोलीस दलात सात वर्षे प्रामाणिक सेवा बजावताना विवाह, कुटुंब, मुलाचे संगोपन आणि नोकरीच्या जबाबदाऱ्या सांभाळतानाही त्यांच्या मनातील 'पोलीस उपनिरीक्षक' होण्याची जिद्द कायम धगधगत राहिली. आई-वडिल व पत्नीची भक्कम साथ, अभ्यासू वृत्ती आणि कठोर मेहनतीच्या जोरावर त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू ठेवली. २०२३ मध्ये पूर्व परीक्षा, २०२४ मध्ये मुख्य परीक्षा आणि २०२६ मध्ये मैदानी चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण करत अखेर ३० एप्रिल २०२६ रोजी घोषित झालेल्या निकालात पीएसआय पदावर यशाची मोहोर उमटवली.

# आयुष्यमान कार्डधारकांची ईकेवायसी; सोलापूर राज्यात अव्वल

- १२ हजारांहून अधिक आयुष्मान कार्डधारकांची ईकेवायसी
- सलग आठ दिवस प्रथम क्रमांक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मे-**

आयुष्मान भारत योजनेअंतर्गत ई-केवायसी व आयुष्मान कार्ड निर्मिती मोहिमेत सोलापूर जिल्ह्याने सलग आठ दिवस महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागामार्फत ही विशेष मोहीम युद्धपातळीवर राबविण्यात येत आहे.

जिल्ह्यात आयुष्मान भारत योजनेचे काम अपेक्षेपेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आल्यानंतर प्रशासनाने तत्काळ विशेष मोहीम हाती घेतली. आरोग्य यंत्रणा सक्रिय करण्यात आली असून लाभार्थ्यांचे ई-केवायसी पूर्ण करून आयुष्मान कार्ड तयार करण्यावर भर दिला आहे. २८ एप्रिल ते ६ मे २०२६ या कालावधीत सोलापूर जिल्ह्यात तब्बल १२ हजार १६७ आयुष्मान भारत ई-केवायसी व कार्ड निर्मितीची नोंद झाली आहे. या कामगिरीमुळे जिल्ह्याने राज्यात अव्वल स्थान कायम राखले आहे.

ही मोहीम यशस्वी करण्यासाठी सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, आरोग्यमित्र, आशा सेविका तसेच संबंधित कर्मचाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर मेहनत घेतली आहे. गावागावांत जाऊन नागरिकांना योजनेची माहिती देणे, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून घेणे आणि तत्काळ ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे, अशी कार्यवाही सुरू आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी जैन यांनी आरोग्य यंत्रणेला आणखी गतीने काम करण्याच्या सूचना दिल्या आहेत. जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांचे ई-केवायसी पूर्ण करून आयुष्मान कार्ड तयार करण्यावर भर देण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान, जिल्ह्यातील नागरिकांनीही या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपले आयुष्मान भारत कार्ड तातडीने तयार करून घ्यावे, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. आयुष्मान भारत योजनेमुळे गरीब व गरजू नागरिकांना मोफत आरोग्यसेवेचा लाभ मिळणार असल्याने ही मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.



**सोलापूर : शहरातील मुख्य बाजारपेठेत मधला मारुती ते सराफ कट्टा परिसरात बेशिस्तपणे पार्किंग केली. त्यामुळे वाहतुकीची कोंडी सर्रास दिसून येते. प्रशासन या गोष्टीकडे लक्ष देणार का? यामुळे पादचाऱ्यांना विनाकारण त्रास सहन करावा लागतो. (छायाचित्र : केवल तिवारी)**





# पालखी मार्गावरील झाडे आगीने होरपळली

## नगर पंचायतकडून टँकरने पाणी

**सदाशिवनगर, दि. ७ मे-**

पालखी मुक्कामाच्या नजीक पालखी मार्गावरील झाडे अज्ञाताने पेटवलेल्या कचऱ्यामुळे १ कि मी अंतरावरील झाडे होरपळून गेली असून याबाबत नगर पंचायतीला माहिती मिळताच मुख्याधिकारी सुमित जाधव यांनी त्या झाडांना टँकरने पाणी घालण्याच्या सूचना दिल्या त्यानुसार या झाडांना रात्री पाणी देण्यात आले.

माळशिरस शहरालगत श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा मुक्कामी असतो. या पालखी मार्गावर काही वर्षापूर्वी झाडे लावण्यात आली आहेत ही झाडे मोठी झाली आहेत. अज्ञाताने कचरा पेटवला झाडाखाली वाळला पाला पाचोळा असल्याने उन्हाच्या तडाख्यात ही आग सर्वत्र पसरून बाजार तळापासून पालखी मैदानापर्यंत गेली. या रस्त्याच्या कडेला लावलेली झाडे होरपळून गेली आहेत. सदरची बाब नगरपंचायतीचे मुख्याधिकारी सुमित जाधव यांना समजताच त्यांनी या झाडांना तत्काळ पाणी देण्याच्या सूचना दिल्या त्यानुसार पाणी पुरवठा विभागाचे मदने यांनी तात्काळ टँकरने झाडांना पाणी दिले असून सलग तीन चार दिवस या झाडांना पाणी सोडणार असल्याचे सांगितले. झाडे मोठी असल्यामुळे या झाडांना पाणी दिल्यास पुन्हा पालवी फुटू शकते ही जळून जाणार नाहीत .परंतु तीन चार वेळा पाणी देणे आवशक असल्याचे माळशिरस वनक्षेत्रपाल आवटे यांनी सांगितले.


### मध्य रेल्वे

**सोलापूर विभाग**

**डॉक्टरांसाठी थेट मुलाखत (वॉक-इन इंटरव्ह्यू)**

अधिसूचना क्रमांक SUR/P/GAZ/CMP/KWW/II/2026, दिनांक 29.04.2026 अन्वये, मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील उपविभागीय रेल्वे रुग्णालय (CMP)/कुर्डूवाडी SDH/KWW येथे, नमूद केलेल्या ठिकाणी, आवश्यकता संपेपर्यंत, यापैकी जे आधी असेल तोपर्यंत, नमूद केलेल्या अटी व शर्तींनुसार कंत्राटी वैद्यकीय व्यावसायिक (CMPs) यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मध्य रेल्वे, सोलापूर विभाग, कुर्डूवाडी येथील उपविभागीय रेल्वे रुग्णालयात एका कंत्राटी वैद्यकीय व्यावसायिकाच्या (CMPs) नियुक्तीसाठी अधिसूचना. खुल्या बाजारातील / सेवानिवृत्त शासकीय इच्छुक उमदवार. डॉक्टर 18.05.2026 रोजी सकाळी 11.00 वाजता होणाऱ्या वॉक-इन मुलाखतीसाठी अर्ज, मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे, प्रयत्नांचे प्रमाणपत्र आणि संबंधित कागदपत्रांसह विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, कार्मिक शाखा, सोलापूर. 413 001 येथे उपस्थित राहू शकतात. वॉक-इन मुलाखत समितीद्वारे 18.05.2026 रोजी सकाळी 11.00 वाजल्यापासून घेतली जाईल. इच्छुक उमेदवारांनी / सेवानिवृत्त व्यक्तींनी अर्ज, संबंधित कागदपत्रे आणि प्रयत्नांच्या प्रमाणपत्रासह . srdposur@gmail.com या ईमेल आयडीवर अर्ज करावा. उमेदवारांनी मुलाखतीसाठी स्वतःच्या खर्चाने उपस्थित राहावे. सविस्तर अधिसूचनेसाठी कृपया www.cr.indianrailways.gov.in या वेबसाइटला भेट द्या. Under Tab-About us - Division - Solapur - personnel - Notification आमच्याबद्दल विभाग सोलापूर कार्मिक अधिसूचना.

**- वरिष्ठ डी.पी.ओ, सोलापूर**

**आपल्या पाळीव प्राण्यांना रेल्वे रुळांपासून दूर ठेवा.**



## IDFC FIRST Bank Limited

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली असून **सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेले सुरक्षित कर्ज घेतले आहे. खाली नमूद केलेल्या कर्जदारांच्या आणि सहकर्जदारांच्या कर्जासाठी त्यांच्या संबंधित मालमत्ता गहाण ठेवून सुरक्षितता देण्यात आली आहे. ते संबंधित कर्ज करारातील अटी व शर्तींचे पालन करण्यास अपयशी ठरल्यामुळे आणि कर्जाचे हप्ते अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज 'एनपीए' (अनुत्पादक मालमत्ता) म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. त्यांच्याकडून **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली असून **सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) देय असलेली रक्कम संबंधित नोटिशीनुसार खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे नमूद केली आहे. तसेच सदर रकमेवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून करारानुसार दराने आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 138982448 | मालमत्तेवर कर्ज | 1. सिध्देश्वर दशरथ घोडके<br>2. परमेश्वर दशरथ घोडके | 02/04/2026 | INR 9,54,818.07/- |

**मालमत्तेचा पत्ता :** मालमत्तेचा पत्ता: ग्रामपंचायत मिळकत क्र. ८५४ चा सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण मोजमाप २१७८ चौ. फूट., मौजे गावात स्थित: कुरुळ, ग्रामपंचायतीच्या हद्दीत: कुरुळ, तालुका: मोहोळ, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३२१३, आणि सीमा: पूर्व: बाबासाहेब घोडके पश्चिम: संताजी घोडके उत्तर : रस्ता, दक्षिण : स्व

तुम्हाला याद्वारे कळविण्यात येते की, वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली असून **सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) देय असलेली रक्कम, संबंधित तारखांपासून लागणारे करारानुसार व्याज आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींसह, या प्रसिद्धीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत अदा करावी. असे करण्यात अयशस्वी ठरल्यास, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडची** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली असून **सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) देय रक्कम वसूल करण्यासाठी, निम्न स्वाक्षरीकार सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अन्वये वरील नमूद गहाण ठेवलेल्या मालमत्तांविरुद्ध कार्यवाही करण्यास बांधील असतील. पुढे, तुम्हाला उक्त कायद्याच्या कलम १३ (१३) अन्वये सदर सुरक्षित मालमत्तांची विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करण्यास मनाई करण्यात आली आहे.

**सही/-**
**अधिकृत अधिकारी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**

दिनांक : **08/05/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**



### ग्रामपंचायत वडशिंगे तालुका माढा जिल्हा सोलापूर

**टेंडर नोटीस**

ग्रामपंचायत वडशिंगे तालुका माढा यांचेकडून खालील काम करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदार पुरवठादाराकडून बंद लखोट्यात निविदा मागविण्यात येत आहे.

**लेखाशिर्ष : १५ वा वित्त आयोग, ग्रामनिधी व जनसुविधा**

| क्र. | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत महिन्यामध्ये | ठेकेदार | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे वडशिंगे येथे वडर समाज चावडी दुरुस्ती करणे | १.४० हजार | | १०० | ३ महिने | सु.बे.अ | १५ वा वित्त आयोग |
| २ | मौजे वडशिंगे येथील मुस्लीम स्मशानभूमीत पाणीपुरवठा सोय करणे | १.६० हजार | | १०० | ३ महिने | सु.बे.अ | १५ वा वित्त आयोग |
| ३ | मौजे वडशिंगे येथे रोहिदास कदम घर ते मारुती मंदिर भूमिगत गटार करणे | ३.०० लाख | | १०० | ३ महिने | सु.बे.अ | १५ वा वित्त आयोग |
| ४ | मौजे वडशिंगे येथील प्राथमिक शाळा, अंगणवाडीमध्ये हँड वॉश स्टेशन, शौचालय दुरुस्ती व साहित्य खरेदी करणे | १.६२ हजार | | १०० | ३ महिने | सु.बे.अ | १५ वा वित्त आयोग |
| ५ | मौजे वडशिंगे येथे वडर समाज चावडी दुरुस्ती करणे | ७८ हजार | | १०० | ३ महिने | सु.बे.अ | ग्रामनिधी |
| ६ | मौजे वडशिंगे येथील मुस्लीम स्मशानभूमीत पाणीपुरवठा सोय करणे | १०.०० लाख | | १०० | ३ महिने | सु.बे.अ | जन सुविधा |

**टीप -** १) कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि. ०८/०५/२०२६ सकाळी १०:०० पासून.
२) भरलेल्या निविदा स्वीकारण्याचा दि. १४/०५/२०२६ पर्यंत सकाळी १०:०० ते ६:०० वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय, वडशिंगे
३) निविदा उघडण्याचा दि. १५/०५/२०२६ रोजी सकाळी ठीक ११:०० वाजता.
४) निविदा संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रं. ०१ व ०२ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल.
५) निविदा मंजूर/ना मंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

**जा.क्र. ग्रा-प-वडशिंगे/२६९/७१५/२०२६**

**सही/-**
**ग्रामपंचायत अधिकारी**
ग्रामपंचायत वडशिंगे
ता. माढा जि. सोलापूर

**सही/-**
**सरपंच**
**ग्रा. पं. वडशिंगे, ता. माढा**



### जाहीर प्रसिद्धीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. २२/२०२६
नि. नं. ५

**बार्शी येथील मा. अप्पर जिल्हा व सत्र न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात**

१) **अदित्य सुदर्शन पंके,** वय- १४ वर्षे,
धंदा - शिक्षण, अ.पा.क वडिल, अर्जदार नं. ३
२) **आर्यन सुदर्शन पंके,** वय- ११ वर्षे, **-- अर्जदार**
धंदा - शिक्षण, अ.पा.क वडिल, अर्जदार नं. ३
३) **सुदर्शन महादेव पंके,** वय- ४२ वर्षे,
धंदा - शेती, रा. राळेरास, ता. बार्शी, जि. सोलापूर
(अर्जदार नं. १, २ चे आ.क. म्हणून अर्जदार नं. ३)

**विरुद्ध**

**महाराष्ट्र शासन तर्फे**
**मा. कलेक्टर साहेब सोलापूर** **-- सा.वाला**

ज्या अर्थी,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी मौजे राळेरास येथील जमीन गट नं. २८५ क्षेत्र ०३ हे. ०४ आर, पो.ख. ०० हे. ०२ आर, एकूण क्षेत्र ०३ हे. ०६ आर, आकार ०६ रु. ६९ पैसे यापैकी ०१ हे. ४० आर, आकार ०३ रु. ०८ पैसे यापैकी संपादीत क्षेत्र ०० हे. २० आर क्षेत्र संपादीत झालेले आहे. सदरचे क्षेत्र अर्जदाराचे भूसंपादन प्रकरणी दर निश्चितीसाठी मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली व जिल्हास्तरीय समितीने दि. २८/०२/२०२२ रोजी भूसंपादन जमीनी, मुल्यांकन प्रकरणी मान्यता दिली आहे. ह्या अनुषंगाने उपविभागीय माढा विभाग कुर्डूवाडी यांचेकडील पत्र क्र. २०२२ उभूसं. /३/कावि - २/आरआर/२५३/सन २०२२ दि. १९/५/२०२२ नुसार संपादन क्षेत्राची व त्यामधील इतर घटकांच्या मुल्यांकन परिगणना असलेल्या प्रपत्र ड विवरणपत्रास मंजुरी दिली आहे. व सरकारने सदर अर्जदार नं. १, २ चे जमीनीपैकी भूसंपादन क्षेत्र २० आर यांची मोबदल्याची किंमत रु. ४,१८,१०३/- ठरविण्यात आलेली असून, ती रक्कम अज्ञान अर्जदार नं. १, २ यांना मिळणार आहे. परंतु सदर अर्जदार नं. १, २ हे अज्ञान असल्यामुळे सदर रक्कमेचा धनादेश त्यांचे अ.पा.क. अर्जदार नं. ३ वडिल यांना मिळणे जरुरीचे आहे. सदरची रक्कम मिळाल्यानंतर वडील हे अज्ञान अर्जदार नं. १, २ यांचे उच्च शिक्षणासाठी, आर्थिक अडचणीचे निवारण करणेसाठी व शैक्षणिक फी भरणेकामी करणार आहेत. त्यामुळे अज्ञान अर्जदार नं. १, २ यांचा फायदा होणार आहे. त्यासाठी वर क. १ मधील अज्ञान अर्जदार नं. १, २ चे नांवे असलेल्या सरकारने संपादीत केलेले २० आर क्षेत्राचे त्यांचेतर्फे अ.पा.क. म्हणून वडिल अर्जदार नं. ३ यांना सरकारचे नांवे खरेदीखत लिहून देणे जरुरीचे आहे. परंतु त्यासाठी मे. कोर्टाची पूर्ण परवानगी मिळणे जरुरीचे आहे. अन्यथा अज्ञान अर्जदार नं. १, २ यांचे कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. अशा परिस्थितीत वर कलम १ मधील मिळकत २० आर याचे खरेदीखत / विक्री देणेस अज्ञान अर्जदार नं. १, २ यांचेतर्फे अ.पा.क. वडिल अर्जदार नं. ३ यांना मे. कोर्टाची परवानगी मिळणे जरुरीचे आहे व त्यासाठी अर्जदारांचा हा अर्ज आहे.

त्या अर्थी,

वरील मिळकतीचे अज्ञान अर्जदार नं. १, २ यांचे मालकी हक्काबाबत अगर विक्री हस्तांतरण करणेचे व्यवहारास कोणाची काहीही हरकत अडथळा असल्यास त्यांनी सदर प्रसिद्धीकरणापासून ३० दिवसाचे आत किंवा पुढील नेमली ता. ११/६/२०२६ रोजी सदर अर्जाचे कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वाजता स्वतः अगर त्यांचे तर्फे मुखत्यार वकील यांनी हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे. मुदतीत कोणाची हरकत अडथळा न आल्यास कोणाचे काहीही म्हणणे नाही असे समजून अर्जाप्रमाणे अर्जदाराची मागणी मंजूर करणेत येईल.

कळावे हे प्रसिद्धीकरण दिले. ता. ०४/०५/२०२६

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधीक्षक**
**मा. अप्पर जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी**




## महत्त्वाचे

### अर्जुन एरिगसी आघाडीवर



**माल्मो** : येथे सिगेमन अँड को कंपनी बुद्धिबळ स्पर्धेच्या उपांत्य फेरीत अर्जुन एरिगसीने झू जिनरचा पराभव करीत स्पर्धेत एकमेव आघाडी घेतली. अंतिम फेरीच्या आधीच्या फेरीत आघाडी मिळविल्यामुळे भारतीय ग्रॅण्डमास्टरसाठी विजेतेपद पटकावण्याची संधी उपलब्ध आहे. त्याला अंतिम फेरीत नॉर्वेच्या ॲण्डी वुडवर्डशी सामना करावा लागणार आहे. जिनरची बचावात्मक खेळी गुंतागुंतीची होती, परंतु ६७ चालींनंतर खेळाच्या अंतिम टप्प्यात अर्जुनने आपला विजय निश्चित केला. सहा फेऱ्यांनंतर साडेचार गुणांसह अर्जुन गुणतालिकेत अव्वल स्थानी आहे; त्याच्या पाठोपाठ यागिझ कान एर्दोगमुस आणि मॅग्नस कार्लसेन हे चार गुणांसह संयुक्त दुसऱ्या स्थानी आहेत. संपूर्ण स्पर्धेत अजिंक्य राहिलेल्या केवळ दोन खेळाडूंपैकी अर्जुन हा एक आहे; नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्ह हा असा कामगिरी करणारा दुसरा खेळाडू आहे.

### भारतीय स्क्वॅशपटू आव्हानासाठी सज्ज

**नवी दिल्ली** : इजिप्तमधील गिझा येथे शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या जागतिक स्क्वॅश अजिंक्यपद स्पर्धेत भारताचे चार सदस्यीय पुरुष पथक आपली छाप पाडण्याचे उद्दिष्ट बाळगून मैदानात उतरणार आहे. प्रोफेशनल स्क्वॅश संघटनेद्वारे आयोजित या प्रतिष्ठित स्पर्धेत अभय सिंग हा भारतीय आव्हानाचे नेतृत्व करेल; त्याला वीर चोत्रानी, रामित टंडन आणि वेलवन सेंथिलकुमार यांची साथ लाभेल. गिझा येथील पाम हिल्स क्लब आणि गोल्फ सेंट्रल मॉल येथे ८ ते १६ मे या कालावधीत होणाऱ्या या अजिंक्यपद स्पर्धेत, या खेळातील अनेक अव्वल दर्जाचे खेळाडू सहभागी होणार आहेत. यामध्ये सध्याचा जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेला पुरुष खेळाडू मुस्तफा असल आणि महिलांच्या क्रमवारीत अव्वल स्थानी असलेली स्टार खेळाडू हानिया अल हम्मामी यांचा समावेश आहे. पुरुष एकेरीच्या गटात भारताचा अव्वल मानांकित खेळाडू असलेल्या अभय सिंगला स्पर्धेची सुरुवातच कठीण आव्हानाने करावी लागणार आहे. त्याची पहिल्या फेरीत त्याचाच देशबांधव असलेल्या वीर चोत्रानीशी गाठ पडणार आहे.

### क्रीडा महासंघांची परिषद ऑलिम्पिक तयारीच्या दिशेने टाकलेले पाऊल : मांडविया

**नवी दिल्ली** : राष्ट्रीय क्रीडा महासंघ परिषद म्हणजे भारताच्या आगामी जागतिक क्रीडा स्पर्धांच्या तयारीच्या दिशेने टाकलेले एक समन्वित पाऊल आहे, असे प्रतिपादन केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी केले. ते राष्ट्रीय क्रीडा महासंघ परिषदेच्या बैठकीला प्रामुख्याने उपस्थित होते. या परिषदेत भारतीय ऑलिम्पिक संघटनेसह ३७ राष्ट्रीय क्रीडा महासंघांचे प्रतिनिधी एकत्र आले होते. भारताचे क्रीडा भविष्य हे खेळाडू, क्रीडा महासंघ आणि सरकार यांच्यातील अधिक भक्कम समन्वयावर अवलंबून आहे, असेही ते म्हणाले. भारताचा भविष्यातील क्रीडा आराखडा आणि राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा (२०२६), आशियाई क्रीडा स्पर्धा (२०२६) व उन्हाळी ऑलिम्पिक (२०२८) यांसारख्या प्रमुख आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या तयारीवर चर्चा करणे हा या परिषदेचा उद्देश होता. क्रीडा मंत्र्यांनी सरकारच्या व्यापक दृष्टीकोनावरही प्रकाश टाकला. दीर्घकालीन नियोजन, वैज्ञानिक प्रशिक्षण, अधिक भक्कम क्रीडा पायाभूत सुविधा आणि प्रमुख आंतरराष्ट्रीय स्पर्धांची तयारी करणाऱ्या खेळाडूंना सातत्यपूर्ण पाठिंबा देऊन भारताला एक अग्रगण्य क्रीडा राष्ट्र म्हणून घडवणे, हे या दृष्टीकोनाचे मुख्य उद्दिष्ट आहे.



### कोहलीचा माजी सहकारी अमनप्रीत गिल यांचे निधन

**नवी दिल्ली** : भारताचा दिग्गज फलंदाज विराट कोहली याने आपला भारतीय १९ वर्षांखालील संघातील माजी सहकारी अमनप्रीत सिंग गिल याच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. अमनप्रीतचे बुधवारी चंदीगड येथे वयाच्या ३६ व्या वर्षी निधन झाले. त्यामुळे क्रिकेट विश्वावर शोककळा पसरली आहे. कोहलीने सोशल मीडियाच्या माध्यमातून गिलला श्रद्धांजली वाहिली आणि त्याच्या कुटुंबियांना व प्रियजनांना सांत्वन दिले. भारताच्या १९ वर्षांखालील संघात असताना, आपल्या क्रिकेट कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात या दोघांनी ड्रेसिंग रूम सामायिक केली होती. अमनप्रीत गिलच्या निधनाची बातमी ऐकून मी स्तब्ध आणि अत्यंत दुःखी झालो आहे. त्याच्या कुटुंबियांना आणि प्रियजनांना मी प्रार्थना आणि मानसिक बळ पाठवत आहे. आत्म्यास शांती लाभो. ओम शांती, असे कोहलीने आपल्या भावपूर्ण संदेशात म्हटले आहे. पंजाब क्रिकेट संघटनेनेही त्याच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला.

# दिल्लीविरुद्ध कोलकाता झेप मारण्यास उत्सुक

◆ **नवी दिल्ली, ७ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२६ हंगामात शुक्रवारी अरुण जेटली स्टेडियमवर संघर्षाचा सामना करणाऱ्या दिल्ली कॅपिटल्सचा सामना, पुन्हा बहरात आलेल्या कोलकाता नाईट रायडर्सशी होणार आहे. सध्या सुरू असलेल्या आयपीएल २०२६ स्पर्धेतील हा ५१वा सामना असेल.


अक्षर पटेल


अजिंक्य रहाणे

अक्षर पटेलच्या नेतृत्वाखालील दिल्ली कॅपिटल्स गुणतालिकेत ७व्या क्रमांकावर आहे; त्यांनी १० सामन्यांपैकी ४ सामने जिंकले असून ६ सामन्यांत त्यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे. दुसरीकडे, अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखालील कोलकाता नाईट रायडर्सने ९ सामन्यांत ३ विजय आणि ५ पराभव नोंदविले आहेत. तीन वेळा विजेतेपद पटकावलेला हा संघ सध्या गुणतालिकेत ८व्या क्रमांकावर आहे; मात्र, जर त्यांनी आपली विजयाची मालिका सलग चार सामन्यांपर्यंत वाढवली, तर ते ७व्या क्रमांकावर झेप घेऊ शकतात.

दिल्ली कॅपिटल्सने आपल्या मागील आठ सामन्यांपैकी केवळ दोनच सामने जिंकले आहेत. आपल्या सर्वात अलीकडील सामन्यात, त्यांना घरच्या मैदानावरच चेन्नई सुपर किंग्जकडून दारुण पराभव पत्करावा लागला होता. दुसरीकडे, कोलकाता नाईट रायडर्सचा संघ सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या अवे सामन्यात (प्रतिस्पर्ध्याच्या मैदानावर) ७ गडी राखून मिळवलेल्या विजयाच्या जोरावर या सामन्यासाठी सज्ज झाला आहे. (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**दिल्ली कॅपिटल्स वि. कोलकाता नाईट रायडर्सशी**

**स्थळ** : अरुण जेटली स्टेडियम, नवी दिल्ली

**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून

**थेट प्रसारण : स्टार स्पोर्ट्‌सवर**

### खेळपट्टी फलंदाजीसाठी अनुकूल

अरुण जेटली स्टेडियम हे साधारणपणे फलंदाजीसाठी अत्यंत अनुकूल खेळपट्टी म्हणून ओळखले जाते, विशेषतः अलीकडील हंगामांमध्ये. तथापि, गत काही सामन्यांमध्ये गोलंदाजांना आणि त्यातही प्रामुख्याने वेगवान गोलंदाजांना (सीमर्स) खेळपट्टीकडून चांगली मदत मिळाली आहे. याच मैदानावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या सामन्यात, जेव्हा भुवनेश्वर कुमार व जोश हेझलवूडने गोलंदाजीत कहर केला होता, तेव्हा कॅपिटल्सचा संपूर्ण संघ अवघ्या ७५ धावांत गारद झाला होता.


गत सामन्यात चेन्नई सुपर किंग्सच्या गोलंदाजांनीही उत्कृष्ट कामगिरी केली होती; विशेषतः नूर अहमद व अकील हुसेनने अप्रतिम गोलंदाजी केली होती. या मैदानावर नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेणे हा एक अत्यंत सोपा आणि निर्विवाद पर्याय मानला जातो. या हंगामात खेळल्या गेलेल्या पाच सामन्यांपैकी चार सामने, लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या संघांनीच जिंकले आहेत.

# पहिली विश्व योगासन स्पर्धा अहमदाबादमध्ये

**४ ते ८ जून दरम्यान होणार आयोजन**

◆ **अहमदाबाद, ७ मे**

भारत ४ ते ८ जून दरम्यान येथील ट्रान्सस्टेडियामध्ये जागतिक योगासन स्पर्धेच्या पहिल्या आवृत्तीचे आयोजन करण्यास सज्ज आहे. या जागतिक योगासन स्पर्धेत ४० हून अधिक देश सहभागी होणार आहेत. वर्ल्ड योगासनच्या अधिपत्याखाली आयोजित ही स्पर्धा, जगभरातील आघाडीच्या खेळाडूंना एकत्र आणण्यासाठी योगासन भारतद्वारे आयोजित केली जाईल.




भारतीय राष्ट्रीय योगासन संघासाठी अधिकृत निवड चाचण्या १ आणि २ मे रोजी हरयाणातील सोनिपत येथील भारतीय क्रीडा प्राधिकरण (साई) केंद्रात घेण्यात आल्या. खेळाडूंनी पारंपरिक, कलात्मक, लयबद्ध आणि ॲथ्लेटिक योगासन यांसारख्या प्रकारांमध्ये स्पर्धा केली. निवडलेले खेळाडू आता १० मे ते २ जून या कालावधीत अहमदाबाद येथील नारनपुरा क्रीडा संकुलात आयोजित राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिरात सहभागी होतील.

**योगासन जगभरातील तरुणांपर्यंत पोहोचवण्याचे ध्येय**

पहिल्या-वहिल्या जागतिक योगासन क्रीडा स्पर्धेचे आयोजन करणे हा या खेळासाठी एक निर्णायक क्षण आहे. आमचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, योगासन या खेळाच्या माध्यमातून योगाला जगभरातील तरुणांपर्यंत पोहोचवणे हे भारताचे ध्येय आहे, जेणेकरून त्याचा जागतिक स्तरावरील अनेक बहु-क्रीडा स्पर्धांमध्ये प्रभाव पडेल आणि त्याला ऑलिम्पिक खेळ बनण्याची दाट शक्यता निर्माण होईल, असे योगासन भारतचे अध्यक्ष उदित शेठ म्हणाले.

आम्ही एक मजबूत स्पर्धात्मक परिसंस्था निर्माण केली आहे व आता योगासन जागतिक स्तरासाठी सज्ज आहे. या चळवळीचे नेतृत्व करताना भारताला अभिमान वाटतो. योगासन हे योगमय जीवनशैलीचे प्रवेशद्वार आहे, असे ते म्हणाले.

सोनीपत येथे झालेल्या राष्ट्रीय चाचण्यांमध्ये दिसून आलेला सहभाग आणि प्रतिभा, संपूर्ण भारतात योगासनाच्या प्रचंड वाढीवर प्रकाश टाकते. ही स्पर्धा खेळाडूंना एक आंतरराष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध करून देईल, तसेच या खेळाची जागतिक ओळख आणि विकासाला अधिक गती देईल, असे वर्ल्ड योगासन आणि योगासन भारतचे महासचिव जयदीप आर्य म्हणाले.

वर्ल्ड योगासनद्वारे जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त व नियंत्रित असलेला हा खेळ, योगाच्या शिस्तीला खेळाडूंच्या स्पर्धेच्या भावनेशी जोडतो. प्रमाणित नियमांनुसार अचूकता, संतुलन, लवचिकता, नियंत्रण, स्थिरता आणि काठिण्य पातळी या निकषांवर कामगिरीचे मूल्यांकन केले जाते. या जूनमध्ये जगभरातील खेळाडू, अधिकारी आणि महासंघ अहमदाबादमध्ये एकत्र येत असल्याने, ही जागतिक योगासन अजिंक्यपद स्पर्धा क्रीडा नैपुण्य व भारताच्या योग-वारशाचा एक ऐतिहासिक सोहळा ठरेल, अशी अपेक्षा आहे. (वृत्तसंस्था)

# महिला तिरंदाजी संघ सुवर्णपदकासाठी लढणार

### पुरुष संघाचे आव्हान संपुष्टात

◆ **शांघाय, ७ मे**

येथे सुरू असलेल्या तिरंदाजी विश्वचषक (दुसरे चरण) स्पर्धेत भारतासाठी गुरुवारचा दिवस संमिश्र ठरला. एका बाजूला, महिलांच्या रिकर्व्ह संघाने उपांत्य फेरीत १० वेळा ऑलिम्पिक विजेत्या ठरलेल्या दक्षिण कोरियाचा जबरदस्त पराभव करीत भारताचे पहिले पदक निश्चित केले; तर दुसऱ्या बाजूला, बांगलादेशकडून अनपेक्षित पराभव झाल्यामुळे पुरुष संघाला स्पर्धेबाहेर पडावे लागले.

मिश्र संघ प्रकारातही भारताची मोहीम संपुष्टात आली. या प्रकारात धीरज बोम्मादेवरा व अंकिता भगत या जोडीला दुसऱ्या फेरीत ब्राझीलकडून पराभव पत्करावा लागला.


लक्ष्य साधताना भारतीय महिला तिरंदाज

अनुभवी दीपिका कुमारी, अंकिता भगत व किशोरवयीन कुमकुम मोहदचा समावेश असलेल्या भारतीय महिला संघाने उपांत्य फेरीत कोरियाच्या एका नवीन संघाचा ५-१ ने पराभव केला. या विजयासह, रविवारी होणाऱ्या सुवर्णपदकाच्या लढतीसाठी भारतीय संघाने दुसऱ्या मानांकित चीन संघाविरुद्धची जागा निश्चित केली.

मात्र, पुरुष रिकर्व्ह संघाला काहीसा मानहानीकारक अनुभव आला. अनुभवी तिरंदाज तरूणदीप राय, धीरज बोम्मादेवरा आणि यशदीप भोगेला बांगलादेशकडून २-६ अशा सुमार कामगिरीसह झालेल्या पराभवात एकही सेट जिंकता आला नाही.

**महिला संघाचा विजय**

दिवसभर अत्यंत कठीण परिस्थितीचा सामना करीत महिला संघाने आपला संयम कायम राखला व सलग तीन सामने जिंकले.

चौथे मानांकन असलेल्या भारतीय संघाने उपांत्य फेरीत दमदार सुरुवात केली. सहा बाणांपैकी चार बाणांवर त्यांनी १० गुण मिळवले आणि केवळ दोन गुण गमावत, ५८ गुणांच्या उत्कृष्ट कामगिरीसह पहिला सेट आपल्या नावावर केला. कोरियन संघ काहीसा विचलित झालेला दिसला व त्यांना केवळ ५५ गुण मिळविता आले.

दुसऱ्या सेटमध्ये भारताकडून एक ८ गुणांचा बाण लागल्यामुळे थोडी घसरण झाली; तरीही त्यांनी ५६-५६ अशी बरोबरी साधली आणि ३-१ अशी आघाडी घेतली.

सामना जिंकण्यासाठी केवळ दोन गुणांची गरज असताना, भारतीय संघाने तिसऱ्या सेटमध्ये पुन्हा ५८ गुण मिळवले. याउलट, कोरियन संघ दबावाखाली गडबडला आणि त्यांना ५६ गुणच मिळवता आले; परिणामी भारताला सलग सेटमध्ये एक संस्मरणीय विजय मिळाला.

मात्र, हा विजय कोरियाच्या एका तुलनेने अननुभवी संघाविरुद्ध मिळाला होता. चार महिन्यांपेक्षाही कमी कालावधीवर येऊन ठेपलेल्या जपानमधील आशियाई क्रीडा स्पर्धेच्या तयारीचा एक भाग म्हणून कोरियाने या नवीन संघाला मैदानात उतरवले होते. (वृत्तसंस्था)

# डी. गुकेशची आगेकूच

### ग्रॅण्ड चेस टूर

◆ **वॉर्सा, ७ मे**

येथे आयोजित प्रतिष्ठित ग्रॅण्ड चेस टूर स्पर्धेत भारतीय ग्रॅंडमास्टर डी. गुकेशने जावोखिर सिंदारोव्हचा पराभव करून आणि वेस्ली सो सोबतचा सामना बरोबरीत सोडवून, जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेसाठी आपली सज्जता सिद्ध केली.

डी. गुकेशने या स्पर्धेत आपली छाप पाडली. पाचव्या फेरीत आपलाच संभाव्य प्रतिस्पर्धी जावोखिर सिंदारोव्हचा पराभव करून आणि त्यानंतर ग्रॅण्ड चेस टूरच्या सुपर रॅपिड आणि ब्लिट्झ प्रकारात अमेरिकन ग्रॅण्डमास्टर वेस्ली सो सोबत सामना बरोबरीत सोडवून, त्याने जागतिक अजिंक्यपद स्पर्धेची आपली तयारी योग्य दिशेने सुरू असल्याचे संकेत दिले.

उझबेकिस्तानच्या सिंदारोव्हचा पराभव केल्यानंतर, गुकेशने वेस्ली सो सोबत जलद गतीने सामना बरोबरीत सोडविला.



यामुळे रॅपिड प्रकारात आणखी तीन फेऱ्या शिल्लक असतानाच, गुकेशचे गुण सहावर पोहोचले. सिंदारोव्हविरुद्धच्या विजयामुळे या भारतीय खेळाडूला दोन गुण मिळाले, तर बरोबरीमुळे त्याच्या खात्यात एका गुणाची भर पडली.वेस्ली सो हा त्याचाच सहकारी अमेरिकन खेळाडू हॅन्स निमन याच्यासह नऊ गुणांवर संयुक्त आघाडीवर आहे. या दोघांच्या पाठोपाठ व्लादिमीर फेडोसीव्ह असून, तो त्यांच्यापेक्षा एका गुणाने मागे आहे. दुसरीकडे, गुकेश हा फॅबियानो कारुआना, जान-क्रिस्टोफ दुदा आणि मॅक्सिम वाशियर-लाग्राव्ह यांच्यासह सहा गुणांवर बरोबरीत आहे; (वृत्तसंस्था)

## १८ वर्षांखालील हॉकी संघ ऑस्ट्रेलिया मालिकेसाठी सज्ज

◆ **नवी दिल्ली, ७ मे**

हॉकी इंडियाने गुरुवारी आगामी १५ ते २० मे दरम्यान ऑस्ट्रेलियाविरुद्ध मायदेशात होणाऱ्या आगामी हॉकी मालिकेसाठी २४ सदस्यांच्या भारतीय १८ वर्षांखालील पुरुष आणि महिला संघांची घोषणा केली.

भोपाळ येथे खेळली जाणारी ही चार सामन्यांची मालिका, २९ मे ते ६ जून दरम्यान जपानमधील काकामिगाहारा येथे होणाऱ्या पुरुष आणि महिलांच्या १८ वर्षांखालील आशिया चषक स्पर्धेच्या तयारीचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे.

राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिरादरम्यान एका आठवड्याभराच्या कठोर मूल्यमापनानंतर या संघातील सदस्यांची निवड करण्यात आली. या शिबिरात ४२ खेळाडूंच्या सुरुवातीच्या गटातून सामन्यासाठीची शारीरिक तंदुरुस्ती व रणनीतिक लवचिकता या निकषांवर आधारित अंतिम संघाची निवड करण्यात आली. भारतीय १८ वर्षांखालील पुरुष हॉकी संघाच्या कर्णधारपदी आक्रमक खेळाडू केतन कुशवाह याची निवड करण्यात आली आहे, तर भारतीय १८ वर्षांखालील महिला संघाचे नेतृत्व स्वीटी कुजूर करणार आहे.

**मुलांचा हॉकी संघ : गोलरक्षक:** सावन कुमार, आयुष राजक, विशाल बडा; बचावपटू: अंश बहुत्रा, आशिष तानी पुर्ती, अरमान सोरेंग, दीपकप्राकाश टोप्पो, करण गौतम, करण धनुक; मध्यरक्षक: प्रेमचंद सोय, राहुल यादव, वरिंदर सिंग, रोमित पाल, अर्जनदीप सिंग, गुरसिमरनप्रीत सिंग, अर्शदीप सिंग, अवि माणिकपुरी; आघाडीचे खेळाडू: आकाश दीप, केतन कुशवाह (कर्णधार), शाहरुख अली, गाझी खान, प्रल्हाद राजभर, सिद्धार्थ बेन, जेसन कांडुलना

**मुलींचा हॉकी संघ :गोलरक्षक** : महक परिहार, हॅरी, खिली कुमारी; बचावपटू : सुगन संगा, निलम टोपनो, रुबिना बक्सला, किरण एक्का, दिव्या यादव, सुलोचनी; मिडफिल्डर: श्रुती कुमारी, दिया, हर्षिता, रश्मीन कौर, लमिंगनबी अकोइजाम, नॅन्सी सारोहा, टोंगब्रम लांचेनबी देवी, स्नेहा दवडे; फॉरवर्ड्स: नौशीन नाझ, स्वीटी कुजूर (कर्णधार), प्रियांका मिंज, संदीपा कुमारी, नम्मी गीताश्री, राजकुमारी प्रिया एक्का, पुष्पा मांझी. (वृत्तसंस्था)

## भारत इतिहास घडवण्याच्या तयारीत

◆ **सुझोऊ, ७ मे**

१७ वर्षांखालील महिला आशियाई चषक फुटबॉल स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवण्याची भारताच्या १७ महिला संघासाठी ही शेवटची संधी असून त्याकरिता संघ सज्ज झाला आहे. शुक्रवारी सुझोऊ ताईहू फुटबॉल क्रीडा केंद्राच्या मैदानावर होणाऱ्या गट ब मधील शेवटच्या सामन्यात हा संघ लेबनॉनचा सामना करेल. स्पर्धेच्या पुढील टप्प्यात प्रवेश करण्यासाठी भारताला हा सामना जिंकणे अनिवार्य आहे.

गटातील दोन बलाढ्य संघ - ऑस्ट्रेलिया आणि जपान - यांचा सामना केल्यानंतर १७ वर्षांखालील महिला आशियाई चषक स्पर्धेतील भारताचे पुढील समीकरण आता स्पष्ट झाले आहे. (वृत्तसंस्था)

# मार्शचे झंझावाती शतक

### सामन्यात पावसाचा व्यत्यय

◆ **लखनौ, ७ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात गुरुवारी येथे पावसाच्या अडथळ्यात खेळल्या जात असलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या आयपीएल सामन्यात यजमान लखनौ सुपर जायंट्‌सचा सलामीवीर मिचेल मार्शने धावांचा पाऊस पाडला. मार्शने झळकावलेल्या नाबाद शतकाच्या आधारावर लखनौ सुपर जायंट्‌सने शेवटचे वृत्त आले तोपर्यंत १४ षटकांत १ ब ाद १४५ धावा केल्या, त्यावेळी मार्श नाबाद १०७, तर निकोलस पूरन नाबाद १४ धावांवर खेळत होते.




बंगळुरूचा कर्णधार रजत पाटीदारने नाणेफेक जिंकून लखनौला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. लखनौने आपल्या सलामी जोडीमध्ये बदल केला. मिचेल मार्शने अर्शिन कुळकर्णीच्या साथीने लखनौच्या डावाला सुरुवात केली. डावाच्या सुरुवातीला पावसाच्या हलक्याशा सरीने आपली हजेरी लावली होती. पाऊस थांबल्यानंतर पुन्हा खेळाला सुरुवात झाली. अर्शिनने उत्तम साथ दिल्यामुळे मार्शने जोरदार फटकेबाजी केली, त्याच्या साथीने मार्शने आपले अर्धशतकही पूर्ण केले. मार्शने अवघ्या २० चेंडूंत ३ चौकार व ६ षट्‌कारांच्या मदतीने ५० धावा पूर्ण केले. मार्श व अर्शिन या दोघांनीही बंगळुरूच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेत ९ षटकांत बिनबाद ९५ धावा केल्या असता पुन्हा पावसाने हजेरी लावली. त्यामुळे बराच वेळ खेळ थांबला आणि पावसामुळे मार्शची तुफान फटकेबाजी थांबली. तोपर्यंत लखनौने ९ षटकांत बिनबाद ९५ धावांची नोंद केली होती. पाऊस थांबल्यानंतर पुन्हा खेळाला सुरुवात होताच कृणाल पांड्याने अर्शिनला पाटीदारकडून झेलबाद केले. अर्शिनने २४ चेंडूंत एका चौकारासह १७ धावांची भर घातली. पुढे मार्श आणि निकोलस पूरनने लखनौच्या धावसंख्येला आकार देण्यास सुरुवात केली, दरम्यान मिचेल मार्शने आपले शतकही साजरे केले. मार्शने अवघ्या ४९ चेंडूंत ९ चौकार व ८ षट्‌कारांच्या मदतीने आपल्या नाबाद १०० धावा पूर्ण केल्या. (वृत्तसंस्था)


कुदळ मारून भूमिपूजन करताना मान्यवर

# विदर्भातील पहिल्या ॲस्ट्रोटर्फ हॉकी मैदानाचे भूमिपूजन

◆ **यवतमाळ, ७ मे**

जिल्ह्यातील खेळाडू व क्रीडांगणाच्या विकासासाठी विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून दिला जाईल. खेळाडूंना चांगले तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी शासन नेहमी तत्पर राहील, अशी ग्वाही पालकमंत्री संजय राठोड यांनी दिली. ९ कोटी रुपये खर्चून तयार करण्यात येणाऱ्या विदर्भातील पहिल्या ॲस्ट्रोटर्फ हॉकी मैदानाचे भूमिपूजन व सिंथेटिक हॅण्डबॉल कोर्टच्या लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते.

यावेळी मंचावर आमदार किसन वानखेडे, यवतमाळ नगर परिषद अध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके, जिल्हाधिकारी डॉ. विकास मीना, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की व जिल्हा क्रीडाधिकारी शिल्पा चाबुकस्वार उपस्थित होत्या. विशेष अतिथी म्हणून उपस्थित असलेले जिल्हाधिकारी डॉ. विकास मीना यांनीही यावेळी जिल्हा क्रीडा संकुल समितीच्या माध्यमातून जिल्ह्यात सुरू असलेल्या विविध क्रीडांगणांच्या विकासाची माहिती देत जिल्हा प्रशासन सदैव खेळाडूंच्या पाठीशी राहील, अशी ग्वाही दिली.

हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. आंतरराष्ट्रीय हॉकी खेळाडू आकाश चिकटे, जिल्हा हॉकी संघटनेच्या सचिव मनीषा आकरे, मयूर निंबाळकर, चैताली लोखंडे, सचिन हरणे, आरती काळे व मंगेश गुडदे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. जिल्हा क्रीडा अधिकारी शिल्पा चाबुकस्वार यांनी प्रास्ताविक करताना, जिल्हा क्रीडा संकुलात असलेल्या विविध क्रीडा सुविधांची माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन व आभारप्रदर्शन अनंत पांडे यांनी केले.

या कार्यक्रमाला सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता विक्रांत शिरभाते, हॅण्डबॉल क्रीडांगणाचे कंत्राटदार मनीष कासलीकर, यवतमाळच्या क्रीडा क्षेत्रातील मान्यवर राजू जॉन, पराग पिंगळे, नीलेश भगत, अविनाश जोशी, अविनाश लोखंडे, विकास शेळके, संजय कोल्हे, जितेंद्र सातपुते, डॉ. संतोषी साऊळकर, गौरव निंभोरकर तसेच हॉकी व हॅण्डबॉल खेळाडू उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर लैंगिक अत्याचार; मोहोळच्या तरुणावर गुन्हा

**सोलापूर, दि. ७ मे-**

लग्नाचे आमिष दाखवून सोलापुरातील एका १९ वर्षाच्या तरुणीवर वेळोवेळी लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी मोहोळ तालुक्यातील चिंचोली काटी येथील एका तरुणावर फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पियुष प्रताप पवार (रा. चिंचोली काटी, मोहोळ) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत पीडित तरुणीने खुद्द फिर्याद दिली आहे.



यातील आरोपी पियुष याने यातील फिर्यादी तरुणीला ४ मार्च ते २ एप्रिल दरम्यान लग्नाचे आमिष दाखवून केगाव येथील लॉजवर नेऊन तिच्यावर वारंवार अत्याचार केले. शिवाय त्यावेळचे फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली. तसेच आपण कोर्टात जाऊन साखरपुडा करून लग्न करण्याबाबतची नोटरी करण्याचे अश्वासन ही दिले. मात्र आश्वासना प्रमाणे न वागता आपली फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सुरुवातीस याप्रकरणी मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र सदरचा गुन्हा तेथून येथील फौजदार चावडी पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर पाटील हे करीत आहेत.

### मंगळवेढ्यात एटीएम फोडले; पावणे आठ लाखांची रक्कम घेऊन चोरटे फरार

**मंगळवेढा दि. ७ मे -**

मंगळवेढा शहरातील स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेच्या एटीएम वर चोरट्यांनी दरोडा टाकून ७ लाख ७२ हजार ९०० रुपये रक्कम चोरुन नेली. दरम्यान रक्कम चोरल्यावर चोरटे फरार झाले आहेत. या प्रकरणी चोरट्यांविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान मागील १५ दिवसात माचणूर,रहाटेवाडी,सिध्दापूर, बोराळे व दामाजीनगर या भागात चोरट्यांनी घरफोड्या केल्या.मात्र या मधील एकाही चोराला पकडण्यात पोलीसांना यश न आल्यामुळेच चोरट्यांचे बळ वाढत असून दिवसेंदिवस चोर्यांच्या घटनेत वाढ होत असल्याचे विदारक चित्र पहावयास मिळत आहे.




आज दि.७ मे च्या पहाटे ३ वाजता शहरातील शनिवार पेठेत असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियातील एटीएम मशीन चोरट्याने गॅस कटरच्या सहाय्याने तोडून फोडले. मशीनच्या ट्रे मध्ये ठेवलेले ७ लाख ७२ हजार ९०० रुपये चोरुन घेवून फरार झाले. या दरम्यान कटरच्या सहाय्याने मशीन तोडताना एटीएम मशीन,एसी.सी.सी.टी.व्ही कॅमेरे यांना आग लागून नुकसान झाल्याचे असिस्टंट बँक मॅनेजर भिकाजी बिमकर यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत. दरम्यान मंगळवेढा शहरातील दामाजीनगर हद्दीत, बोराळे, माचणूर, रहाटेवाडी, सिध्दापूर आदी ठिकाणी चोरटयांनी घरफोड्या करुन रोख रक्कम व सोन्याचे दागिने चोरुन नेल्याच्या घटना घडल्या आहेत. शेतकऱ्यांच्या शेळ्याही चोरीला गेल्या आहेत. या घटनामधील चोर पकडण्यात आत्तापर्यंत पोलीसांना अपयश आल्याने चोरट्यांची हिंमत दिवसेंदिवस वाढत आहे.

**नागरिकांनी रात्र जागून काढली**

पोलीसांनी सदर घटनेनंतर ग्रामसुरक्षा यंत्रणेवरुन मंगळवेढ्यात दरोडेखोर आले असून ते सोलापूर रोडने वाहनातून गेले आहेत. नागरिकांनी जागरुक रहावे असे आवाहन केल्यामुळे नागरिकांनी रात्र अक्षरश: जागून काढली.

### घरगुती वादातून विवाहितेचा स्वत:वर चाकूने वार

**सोलापूर, दि. ७ मे-**

घरगुती वादातून विवाहितेने स्वत:वर चाकूने वार करीत आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मुबीना शोएब खान (वय २३, रा. अक्कलकोट) हिने घरगुती वादातून राहत्या घरी स्वतः डाव्या हातावर चाकूने वार करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. तिला उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### गॅसचा पाईप उघडताना भडका; एक जखमी

**सोलापूर, दि. ७ मे-**

गॅसचा पाईप उघडताना अचानक भडका उडून एकजण जखमी झाला. ही घटना बुधवारी सायंकाळी मोदी भागात घडली. शंकर हणुमंतू म्हेत्रे (वय ३२, रा. जगजीवनराम झोपडपट्टी, मोदी, सोलापूर) हा बुधवारी (दि.६) सायंकाळी राहत्या घरी गॅसचा पाईप उघडत होता. यावेळी चालू गॅसचा अचानक भडका उडाल्याने तो गंभीर भाजला. त्याला उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## निधन वृत्त...

### मंगल जाधव



**सोलापूर, दि.७ मे-**

मंगल अशोक जाधव (वय-६५) रा. राळेरास, ता. उत्तर सोलापूर यांचे आज दि. ७ मे रोजी दीर्घ आजाराने निधन झाले.त्यांच्या पश्चात पती, मुलगी, तीन मुलं, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### अन्नपूर्णा बऱ्हाणपुरे



**सोलापूर, दि.७ मे-**

अन्नपूर्णा मल्लिकार्जुन ब-हाणपुरे, वय ९२ यांचे वृध्दापकाळाने ६ मे रोजी पहाटे ३ च्या सुमारासल निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात, दोन मुले, दोन मुली, सूना, जावई व नातवंडे,पतवंडे, असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर बुधवार (दि.६) सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. कै.मल्लिकार्जून झेड. बऱ्हाणपुरे यांच्या त्या पत्नी होत.

# ‘महावितरण’च्या महिला खो-खो संघास विजेतेपद

## विद्युत कंपन्यांची राष्ट्रीय स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. ७ मे -**

अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या ४७व्या राष्ट्रीय स्पर्धेत महावितरणने सलग दुसऱ्या दिवशीही दबदबा ठेवत अजिंक्यपदाकडे वाटचाल सुरु केली आहे. यामध्ये महावितरणच्या खो-खोच्या महिला संघाने विजेतेपद पटकाविले. कबड्डीमध्ये उपांत्य फेरीत तर खो-खो व बास्केटबॉलमध्ये पूर्वउपांत्य फेरीत महावितरणच्या संघाने प्रवेश केला आहे.

बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात एमएसईबी होल्डिंग कंपनीद्वारे आयोजित या राष्ट्रीय स्पर्धेत गुरुवारी (दि. ७) खो-खोच्या महिला गटात महावितरण विरुद्ध राजस्थान असा अंतिम फेरीचा सामना झाला. यात महावितरणच्या कर्णधार भाग्यश्री फडतरे, सारिका जाधव, श्रेया जाधव, मोनिका भोसले यांनी आक्रमण व संरक्षणामध्ये दमदार कामगिरी करीत सामन्यावरील वर्चस्व कायम ठेवले. पहिल्या डावात १२ विरुद्ध ५ गुणांची आघाडी घेत दुसऱ्या डावात महावितरण संघाने सहा मिनिटे राखून खो-खोचे राष्ट्रीय विजेतेपद पटकावले. तर राजस्थानला



उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

खो-खोच्या पुरुष गटामध्ये महावितरण संघाने (१५) हरियाणा संघाचा (४) ११ गुणांनी सहज पराभव करीत उपांत्य फेरीत प्रवेश केला. मात्र राजस्थान (६) विरुद्ध महापारेषण (५) संघात तुल्यबळ लढत झाली व राजस्थानने एक गुणाने निसटता विजय मिळवला. आता महावितरण विरुद्ध महापारेषण आणि हरियाणा विरुद्ध राजस्थान अशी अंतिम फेरीसाठी लढत होणार आहे. भारतीय खो-खो संघाचा कर्णधार प्रतिक वाईकर याच्यासह निशिकांत शिंदे, विराज कोटमकर, महेंद्र पाटील यांनी आक्रमण व संरक्षणामध्ये सातत्य कायम ठेवले असून सर्व साखळी सामन्यांत वर्चस्व मिळवले आहे. महापारेषणचा उत्कृष्ट खेळाडू विशाल सावंत व इतर सहकाऱ्यांवर आता बलाढ्य महावितरण संघाचा पराभव करण्याचे आव्हान आहे.

कबड्डीच्या पुरुष गटामध्ये पूर्वउपांत्य फेरीत बीएसईएस राजधानी दिल्ली संघ (४९) विरुद्ध महापारेषण (३९) यांच्या अतिशय अटीतटीची लढत झाली. केवळ तीन गुणांनी महापारेषणला पराभव पत्कारावा लागला. दिल्लीच्या संजीव छिकारा, हरदेव शर्मा, रवी प्रकाश व अनिल यांनी आक्रमक पवित्रा घेत महापारेषणचे शेवट्या मिनिटापर्यंत सुरु असलेले आक्रमण थोपवून धरले. यानंतर हिमाचल प्रदेश संघाने (३२) मध्यप्रदेश पॉवर मॅनेजमेंट संघाचा (७) सहज पराभव करून उपांत्य फेरी गाठली. तर महावितरण संघातील (३०) दीपक माने, अमित जाधव, नीलेश ठाकूर, अभिषेक नर, अजय शिंदे यांच्या आक्रमक पवित्र्याने तेलंगणा ट्रान्समिशन संघाचा (११) १९ गुणांनी आणि हरियाणा संघाने (४८) टाटा पॉवर मुंबई संघाचा (१७) पराभव करीत उपांत्य फेरीत प्रवेश केला.

बास्केटबॉलच्या साखळी सामन्यांनी या स्पर्धेत दुसऱ्या दिवशी रंगत वाढली. यात महावितरण (३४) विरुद्ध तेलंगणा (२४) लढतीत महावितरणच्या पंकज गेडे, शिवछत्रपती पुरस्कार विजेता शत्रुघ्न गोखले, आशिष खानापुरे यांनी सामन्यावर नियंत्रण ठेवत विजय मिळवला. यासोबतच सुरजितसिंग, हरप्रितसिंग, सतेंदरसिंग यांच्या आक्रमणामुळे पंजाब संघाने (२१) उत्तराखंड संघाचा (८) पराभव केला. तर हरियाणा संघ (५४) विरुद्ध महापारेषण (६) लढतीत हरियाणाने एकतर्फी विजय मिळवला.

## सोलापूर जिल्हा वरिष्ठ गट मैदानी स्पर्धा रविवारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मे-**

सोलापूर जिल्हा वरिष्ठ गटाची मैदानी स्पर्धा रविवार १७ मे रोजी सकाळी ८ वाजल्यापासून नेहरूनगर येथील सुशीलकुमार शिंदे बी.पी.एड. कॉलेजच्या मैदानावर आयोजिली आहे. या स्पर्धेसाठी प्रवेशिका स्पर्धा स्थळी सकाळी ७ वाजल्यापासून स्वीकारण्यात येणार आहेत. या स्पर्धेतून निवड झालेल्या खेळाडूंची निवड ३१ मे ते २ जून दरम्यान येथे होणाऱ्या महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी करण्यात येणार आहे. स्पर्धेचे तांत्रिक पंच प्रमुख म्हणून प्रकाश गायकवाड , चेतन धनवडे, श्रीरंग खांडेकर, सुनील चव्हाण, सुर्याजी लिंगडे, रवी राठोड, जिलन इंगळे व लियाकत शेख हे कार्य पाहणार आहेत. अधिक माहितीसाठी प्राचार्य राजू प्याटी (मो. ९३२६०५५९४०) अथवा दशरथ गुरव (मो. ९६८९२८३८५९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुरेश पवार यांनी केले आहे.

## राष्ट्रीय हँडबॉल स्पर्धेसाठी ‘सिंहगड’चे तीन संघ गोव्याकडे रवाना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मे-**

क्रीडा क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज केगाव येथील हँडबॉल संघाने राष्ट्रीय पातळीवर दमदार झेप घेतली असून गोवा राज्यातील मडगाव येथे होणाऱ्या राष्ट्रीय हँडबॉल स्पर्धेसाठी संघ रवाना झाला आहे. या यशामुळे परिसरात अभिमानाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



या राष्ट्रीय स्पर्धेत शाळेचे १२ वर्षांखालील मुली आणि १७ वर्षांखालील मुले व मुली असे तीन संघ सहभागी होणार आहेत. या स्पर्धेसाठी खेळाडूंनी गेल्या काही महिन्यांपासून कठोर सराव केला आहे. क्रीडा शिक्षक राजू ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने राज्य स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत या संघांनी राष्ट्रीय स्पर्धेत स्थान मिळवले आहे. संघास सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव तसेच येथील कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, मुख्याध्यापिका शाहीन शेख, उपमुख्याध्यापक प्रकाश नवले व उपमुख्याध्यापिका निकहत शेख यांनी शुभेच्छा दिल्या.

# श्रीरंग बनसोडे व सुनील चव्हाण यांचा सन्मान

## ■ राज्य खो-खो निवड समितीवर व प्रशिक्षक म्हणून निवड ■




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ मे-**

महाराष्ट्र खो-खो कुमार संघ निवडण्यासाठी निवड समिती सदस्य म्हणून निवड झालेले सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे खजिनदार श्रीरंग बनसोडे व सहाय्यक प्रशिक्षक म्हणून निवड झालेले असोसिएशनचे उपाध्यक्ष सुनील चव्हाण यांचा सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर व सरचिटणीस उमाकांत गायकवाड यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

असोसिएशनच्या कार्यकारिणीच्या बैठकीत हा सन्मान करण्यात आला. यावेळी असोसिएशनचे उपाध्यक्ष श्रीकांत ढेपे, अजितकुमार संगवे, सहसचिव मोहन रजपूत, राजाराम शितोळे, सुरेश खुर्द, गुलाम मुजावर, शरद व्हनकडे, धोंडीराम पाटील, जावेद मुलाणी, सोमनाथ बनसोडे, अजित शिंदे, पुंडलीक कलखांबकर व अजित बनकर आदी कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

## अशोक चौकातील पती-पत्नी लहान मुलीला घेऊन वीस दिवसांपासून बेपत्ता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मे-**


अशोक चौक भागातील एक पती पत्नी आपल्या लहान मुलीला सोबत घेऊन मागील वीस दिवसापासून घरातून बेपत्ता झाले आहेत. भिमाशंकर शिवलिंगप्पा पुराणिक (वय ४५), त्याची पत्नी सपना भिमाशंकर पुराणिक (वय ३५) व मुलगी सृष्टी भिमाशंकर पुराणिक (वय ८, सर्व रा. अशोक चौक, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर) हे तिघेही १७ एप्रिल रोजी सायंकाळी सात वाजता कोणालाही न सांगता घरामधून निघून गेले. त्यांचा नातेवाईकांकडे तसेच इतरत्र शोध घेऊनही ते सापडले नाहीत. त्यामुळे भिमाशंकर यांची पहिली पत्नी शांतला भिमाशंकर पुराणिक (वय ४०) हिने जेलरोड पोलिसात बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली आहे.

# हृदय शस्त्रक्रियागृहातील तो ‘अदृश्य’ प्राणदाता : परफ्युजनिस्ट ‘हृदयसंजिवन शास्त्रज्ञ’

**वैद्यकीय क्षेत्रात कितीही प्रगती झाली असली तरी हार्ट-लंग मशीनला भावना नसतात, पण ते हार्ट-लंग मशीन चालवणाऱ्या सारथीच्या मनात मात्र माणुसकीची ऊब असते. परफ्युजनिस्ट हा एकप्रकारे रथाचा सारथी असतो, महाभारतात रथाचा वेग, दिशा आणि योध्दा सुरक्षित राहील; याची सर्व जबाबदारी सारथी (श्रीकृष्ण) यांच्यावर होती, अगदी तशीच भूमिका परफ्युजनिस्टची असते.**

आजच्या धावपळीच्या युगात हृदय विकाराचे प्रमाण चिंताजनक रीतीने वाढत आहे. जेव्हा एखाद्या रुग्णाला हृदयशस्त्रक्रिया सांगितली जाते तेव्हा संपूर्ण कुटुंब हादरुन जाते. आपण देवाचा धावा करतो. पण शस्त्रक्रियागृहात लख्ख प्रकाश असतो, मॉनिटर्सचे बीप-बीप आवाज येत असतात आणि अचानक सर्जन म्हणतात 'Cross-clam{ on' त्याच क्षणी हृदयाची स्पंदने स्तब्ध होतात, तेव्हा त्या विसावलेल्या हृदयाचा श्वास बनून परफ्युजनिस्ट उभा असतो. निसर्गदत्त धडधड थांबलेली असताना यंत्राच्या साहाय्याने 'कृत्रिम धडधड' निर्माण करणारा तो एक कुशल सारथीच आहे. इथे एका सारथीचे काम खऱ्या अर्थाने सुरू होते. तो सारथी म्हणजे 'परफ्युजनिस्ट' ऑपरेशन थिएटरच्या त्या शस्त्रक्रियागृहातील एसीच्या गारव्यातही परफ्युजनिस्टच्या कपाळावर घामाचे थेंब असतात. कारण, रक्तातील प्राणवायूचा (Oxygen) एक टक्का बदल किंवा रक्तदाबातील किंचित चढ-उतारही मोठ्या संकटाचे संकेत देऊ शकतात. तिथे डोळ्यांची पापणी लवणेही परवडणारे नसते. इथे तांत्रिक, अचूकता आणि मानवी संवेदनांचा संगम होतो, तिथे एक असा योध्दा असतो ज्याचे नाव सामान्य माणसाला क्वचितच ठाऊक असते.

हृदय शस्त्रक्रिया हे एखाद्या युध्दापेक्षा कमी नसते. सर्जन हे त्या युद्धातील योद्धे असतात,जे रोगाशी लढून रुग्णाला वाचवण्याचा प्रयत्न करतात. पण या युद्धात परफ्युजनिस्ट हा 'रथाचा सारथी' असतो. ज्याप्रमाणे युद्धभूमीवर योद्धा लढत असताना,रथाचा वेग किती असावा, रथाने कोणत्या दिशेला जावे आणि योद्धा कधीही जमिनीवर कोसळणार नाही याची पूर्ण जबाबदारी सारथी घेतो,अगदी तसेच,सर्जन जेव्हा हृदयावर शस्त्रक्रिया करण्यात मग्न असतात,तेव्हा रुग्णाच्या शरीराचा 'जीवन-रथ' परफ्युजनिस्ट चालवत असतो. हार्ट-लंग मशीनच्या माध्यमातून रक्ताचा प्रवाह नियंत्रित करणे, प्राणवायूचा पुरवठा करणे आणि रुग्णाचे अवयव जिवंत ठेवणे हे काम म्हणजे एखादा कुशल सारथी रथाचे घोडे (रुग्णाचे प्राण) काबूत ठेवतो तसेच आहे.



रणांगणात सारथी शांत असेल तरच योद्धा निर्भयपणे लढू शकतो, त्याचप्रमाणे परफ्युजनिस्ट जेव्हा यंत्रणेवर पूर्ण नियंत्रण ठेवतो, तेव्हाच सर्जन आत्मविश्वासाने शस्त्रक्रिया पूर्ण करू शकतात. शस्त्रक्रियेच्या त्या ४-५ तासांत परफ्युजनिस्टचे डोळे स्क्रीनवरून ढळत नाहीत. रक्तातील ऑक्सिजन,शरीराचे तापमान आणि रक्तदाब यांचा समतोल राखणे म्हणजे तारेवरची कसरत असते. सर्जन शस्त्रक्रिया करत असताना रुग्णाच्या शरीरातील प्रत्येक पेशीला जिवंत ठेवण्याची जबाबदारी या पडद्यामागच्या नायकाची असते.

परफ्युजनिस्ट आणि रुग्ण यांच नात म्हणजे आईच्या आणि बाळाच्या नाळे सारखे असते. निसर्गाने गर्भात आई आणि बाळाच्या मध्ये एक नाळ जोडून दिलेली आहे. बाळ जेव्हा आईच्या गर्भात असते. तेव्हा त्याचे स्वतःचे हृदय किंवा फुफ्फुस काम करत नसते.तेव्हा ते आईच्या नाळेतून जीवन जगण्यासाठी लागणारा प्राणवायू आणि रक्त पुरवले जाते. अगदी तसेच काहीसे हृदय शस्त्रक्रिया वेळी घडते. जेव्हा सर्जन हृदयावर शस्त्रक्रिया करण्यासाठी ते काही काळासाठी हृदयाची स्पंदने स्तब्ध केली जातात, तेव्हा तो रुग्ण गर्भात असलेल्या बाळासारखा असतो जो स्व:ताचा श्वास स्वतः घेऊ शकत नाही. अश्या वेळी परफ्युजनिस्ट हा त्या रुग्णांसाठी आईची नाळ बनतात.

जशी आईची नाळ नऊ महिने मायेने त्या बाळाला जीवंत ठेवते,तसेच परफ्युजनिस्ट त्या काही तासांच्या हृदय शस्त्रक्रिया दरम्यान आपल्या हार्ट-लंग मशीनद्वारे रुग्णांच्या शरीराला रक्ताचा आणि श्वासाचा पुरवठा करून शरीरातील प्रत्येक पेशी जिवंत ठेवतो. आईची नाळ नेसर्गिक असते. परंतु परफ्युजनिस्टने जोडलेली ही नाळ तांत्रिक जीवनवाहिनी असते परंतु या दोन्ही मागची आत्मभावना एकसारखीच असते. त्याचा हातामध्ये माणुसकीची ऊब असते. भावना एकच असते दुसऱ्याला जीवन देणे.

हृदय शस्त्रक्रिया संपते तेव्हा हळूवार पणे रुग्णांचे हृदय पुन्हा स्पंदित होऊ लागले की कृत्रिम नाळ सन्मानाणे वेगळी केली जाते. ही प्रक्रिया म्हणजे त्या रुग्णांचा एक प्रकारे पुनर्जन्म असतो. ज्याचा जन्मदाता हा परफ्युजनिस्ट असतो. शस्त्रक्रिया यशस्वी होते,रुग्ण घरी जातो. तो देवाचे आणि सर्जनचे आभार मानतो. या सगळ्यात शांतपणे आपले काम संपवणारा तो 'परफ्युजनिस्ट' निनावी राहतो,पण एका घराचा आधार जपल्याचे समाधान घेऊन तो घरी जातो. खरोखर, ते हृदय शस्त्रक्रियागृहातील एक 'निनावी श्वास'च आहेत!

परफ्युजनिस्टच्या कामाचे कौतुक करण्यासाठी कधी टाळ्या नसत्तात. जेव्हा बंद असलेले हृदय पुन्हा नव्याने हृदय पुन्हा स्पंदित होते आणि स्क्रीन वर हृदयाचे चैतन्य दिसायला लागतात तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर जे समाधान आणि स्मितहास्य असते. हाच त्याचा कामाचा सर्वात मोठा कौतुकाचा वर्षाव असतो. परफ्युजनिस्ट हा फक्त एक मेडिकल प्रोफेसन्ल नसून रुग्णांना तो प्रत्यक्ष पुनर्जन्मच्या गूढ अनुभूती देणारा असतो. आज जागतिक परफ्युजनिस्ट दिवस. माझ्याकडून जगातील सर्व परफ्युजनिस्ट आणि वाचकांना मनापासून हार्दिक शुभेच्छा!

**- लहु विश्वंभर सुपेकर**
**मो.नं.९८५०२१८५०१**
lahusupekar0187@gmail.com

## महत्वाचे...



### सेवानिवृत्तीनिमित्त सरकारी अभियोक्ता अल्पना कुलकर्णी यांचा सत्कार

**सोलापूर, दि.७ मे-**

सेशन्स कोर्टातील सरकारी अभियोक्ता अल्पना गिरीष कुलकर्णी या २६ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाल्या. त्यानिमित्त त्यांचा निरोप समारंभ व सत्कार करण्यात आला. सहाय्यक संचालक तथा सरकारी अभियोक्ता विकास देशपांडे हे अध्यक्षस्थानी होते. कुलकर्णी यांची सन २००० मध्ये सरकारी अभियोक्ता म्हणून नेमणूक झाली होती. मंगळवेढा, इंदापूर, जत, सोलापूर, बारामती येथे त्यांनी सरकारी वकील म्हणून काम पाहिले. सन २०२१ मध्ये त्यांची अतिरिक्त सरकारी अभियोक्ता म्हणून पदोन्नती झाली. सोलापूर पोलिस आयुक्तांलयाकडून सन २०१८ व २०१९ असा दोनवेळा रणरागिणी पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला होता. याप्रसंगी ज्येष्ठ विधीज्ज्ञ धनंजय माने, महाराष्ट्र आणि गोवा बार असोसिएशनचे ॲड.मिलींद थोबडे, सरकारी वकील प्रदीपसिंह रजपूत, गिरीष कुलकर्णी, गौरव कुलकर्णी, मानसी कुलकर्णी, ॲड.शशी कुलकर्णी, ॲड.विद्यावंत पांढरे, ॲड.अजमोद्दीन शेख, ॲड.सार्थक चिवरी, संतोष पाटील, तुषार निमन आदी उपस्थित होते. सरकारी वकील पल्लवी भोळा यांनी सूत्रसंचालन केले.

### जेसीबी देण्याच्या कारणावरुन मारहाण

**सोलापूर, दि.७ मे-**

तू जेसीबी आम्हाला का देत नाहीस असे म्हणून एका तरुणाला कोयता, रॉड व लाथाबुक्क्याने मारहाण करुन जखमी करण्यात आल्याची घटना अकलूज येथे घडली. सचिन गोपाळ राठोड (वय-२८, रा.निळेगाव, ता.तुळजापूर, जि.धाराशिव) असे जखमी तरुणाचे नाव आहे. तो बुधवारी संध्याकाळी अकलूज येथे असताना त्याला चेतन कोरस्कर, आकाश बनसोडे व इतर पाच जणांनी मिळून जेसीबी आम्हाला का देत नाहीस म्हणून मारहाण केली. यात डोक्याला जखम व सर्व अंगाला मुकामार लागल्याने त्याला अकलूज येथील खासगी दवाखान्यात प्राथमिक उपचार करुन सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात भाऊ पवन राठोड याने गुरुवारी दाखल केले.

### शेतजमिनीच्या वादातून वृध्दास दगड, फावड्याने मारहाण

**सोलापूर, दि.७ मे-**

शेतजमिनीच्या वादावरुन वृध्दास दगड, फावडा व लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याची घटना माढा तालुक्यातील अंजनगाव येथे घडली. सुरेश अप्पा वाघमोडे (वय-७०) असे त्या शेतकऱ्याचे नाव आहे. ते गुरुवारी सकाळी घरासमोर असताना शेतजमिनीच्या वादावरुन बाबासाहेब वाघमोडे व इतर दोन जणांनी मिळून मारहाण केली. यात कानाला जखम व सर्व अंगाला मुकामार लागल्याने त्यांना माढा येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन मुलगा रविंद्र वाघमोडे यांनी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.


### चारचाकीची धडक; दुचाकीस्वाराचा उपचारादरम्यान मृत्यू

**सोलापूर, दि.७ मे-**

चारचाकी वाहनाच्या धडकेत तुळजापूर तालुक्यातील पिंपळा खुर्द येथील ६७ वर्षीय वृध्द दुचाकीस्वार जखमी झाला होता. सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान गुरुवारी त्यांचा मृत्यू झाला. बाळू सुग्रीव कदम असे त्यांचे नाव आहे. यातील मयत हे दि.३१ मार्च २०२६ रोजी संध्याकाळी सोलापूरकडून तुळजापूरकडे निघाले असता सुरतगाव येथील ब्रिजखाली अज्ञात चारचाकी वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली होती. यात ते जखमी झाल्याने एका खासगी दवाखान्यात उपचार करून येथील रुग्णालयात मुलगी राणी साठे हिने ६ मे रोजी दाखल केले होते. उपचारादरम्यान गुरुवारी सकाळी त्यांचा मृत्यू झाला.

# घाण वासयुक्त, गढूळ पाणीपुरवठा संदर्भात तक्रार; महापालिका प्रशासन तत्परतेने लागले कामाला

- रहिवाशांना पोटदुखीसह जुलाबचा त्रास
- 'त्या' कर्मचाऱ्याने दिला अजब सल्ला







**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मे-**

जुना विडी घरकुल, संजय गांधी झोपडपट्टी नंबर २ यांसह सोलापूर शहरातील काही भागात घाण वासयुक्त, गढूळ पाणीपुरवठा झाल्यासंदर्भात तक्रारी प्राप्त होताच महापालिका प्रशासन खडबडून जागे होत तत्परतेने कामाला लागत त्या-त्या भागात भेटी देऊन पाहणी केल्याचे प्रत्यक्षदर्शी दिसून आले. दरम्यान, महापालिकेने दाखविलेल्या या तत्परतेमुळे नागरिकांतून समाधान व्यक्त करण्यात आले.

बुधवार, दि.६ मे २०२६ रोजी जुना विडी घरकुल भागातील आय वन ग्रुपसह अन्य भागात पाणीपुरवठा करण्यात आला. मात्र, पाणीपुरवठा सुरु होताच पाण्याला घाण वास आणि गढूळयुक्त येत असल्याने काही वेळानंतर का होईना स्वच्छ पाणीपुरवठा होईल; या आशेने या भागातील नागरिक अर्धा ते पाऊण तास वाट पाहिली. तरीपण, शेवटपर्यंत घाण वास आणि गढूळयुक्त पाणीपुरवठा झाला. आधीच चार ते पाच दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याने घाण वासयुक्त आणि गढूळ पाणी भरुन घेण्याशिवाय नागरिकांसमोर पर्याय नव्हता. परंतु हे पाणी पिल्याने अनेकांना पोटदुखीसह जुलाबाचा त्रास होत असल्याच्या तक्रारी येत राहिल्या. दरम्यान, काही सुज्ञ नागरिकांनी महापालिका प्रशासनाकडे ऑनलाईन स्वरुपात आणि संबंधित लोकप्रतिनिधींकडे समाजमाध्यमद्वारे माहिती दिली.

घाण वासयुक्त व गढूळ पाणीपुरवठासंदर्भात समाजमाध्यमांमध्ये 'पोस्ट-पे-पोस्ट' पडत होते. काहींनी पाण्यातील गढूळपणा गेल्यानंतर पाणी भरण्याबाबत सल्ला दिले. तर काहींनी महापालिकेच्या हलगर्जीपणा संताप व्यक्त केले. दरम्यान, नगरसेविका दीपिका यलदंडी यांचे पती वासुदेव यलदंडी यांनी ही बाब लक्षात घेऊन लागलीच संबंधित अधिकाऱ्यांना त्या भागात पाचारण केले.

गुरुवार, दि.७ मे २०२६ रोजी घाण वासयुक्त व गढूळ पाणीपुरवठा झालेल्या भागात महापालिकेचे कर्मचारी प्रत्यक्ष भेटी देऊन पाहणी केली आणि पाण्याचे नमुने घेतले. बुधवारी दोन ते तीन वेळा वीजपुरवठा खंडित झाल्याने हा प्रकार घडला आहे. त्यामुळे या भागातील पाणीपुरवठ्याच्या पुढील रोटेशनपर्यंत 'जार'मधील पाणी प्या, असा अजब सल्ला कर्मचाऱ्यांकडून देण्यात आल्याचे सांगण्यात आले.

## उन्साळा...



**'अवकाळी'ने सुखावले सोलापूरकर...**
जुळे सोलापूरसह शहरातील काही भागात गुरुवारी सायंकाळच्या सुमारास अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. उन्हाच्या काहिलीने हैराण झालेले सोलापूरकर या पावसामुळे सुखावले होते. जुळे सोलापूर परिसरात टिपलेले छायाचित्र.

# ढाब्यावर जेवण करुन येताना अपघात; तीन ठार, अन्य दोघे गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मे-**

सोलापूर-पुणे महामार्गावरील एका ढाब्यावर जेवण करुन चारचाकीतून सोलापूरकडे परतत असताना सोलापूर-हैद्राबाद महामार्गावरील पर्ल गार्डनसमोर झालेल्या भीषण अपघातात तीन जण ठार तर दोघे गंभीर जखमी झाल्याची घटना गुरुवारी पहाटेच्या सुमारास घडली.

भरवेगात असलेल्या ईरटीगा हे चारचाकी वाहन रस्त्यावर थांबलेल्या आयशर वाहनाला पाठीमागून जोरात धडकली. यात दोघे जण जागीच तर एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अन्य दोघा जणांवर उपचार सुरु आहेत. अमोल धैर्यशील येरटे (वय-४०, रा.दाळगे प्लॉट, भवानी पेठ, सोलापूर), शेखर सुरेकर (वय-३३, रा.कुमठा नाका,सोलापूर), कादर सैदू हांडे (वय-३३, रा.कुमठा नाका, सोलापूर) असे यातील ठार झालेल्यांची नावे आहेत.

स्वरुप कोथींबीरे (वय-२७, रा.जुनी मिल चाळ, सोलापूर), अमित राजेश जाधव (वय-३०, रा.पांडुरंग वस्ती, शास्त्री नगर, सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. वरील पाचही मित्र पुना नाका येथील एका ढाब्यावर जेवण करून ईरटीका कार (क्रमांक १३ ७२०१) मधून घराकडे परतत असताना त्यांची कार हैदराबाद बायपास रस्त्यावरील डी मार्ट-पर्ल गार्डन जवळ उभ्या असलेल्या आयशर (क्रमांक १३ ८६९९) या वाहनावर पाठीमागून जोरात आदळली. अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की ईरटीगा कार तब्बल दीडशे मीटर फरपटत जाऊन त्यावरील पत्र्याचे छत पूर्ण कापले जाऊन बाजूला पडले.

अपघाताची खबर समजताच जोडभावी पेठ पोलिस ठाण्याचे पथक घटनास्थळी पोहोचून मृतदेह विच्छेदनासाठी रुग्णालयात दाखल केले. यातील मयत शेखर सुरेकर हा अविवाहित असून तो एका खासगी फायनान्स कंपनीत कामास होता. त्याच्या पश्चात आई आणि दोन विवाहित बहिणी असा परिवार आहे.

दुसरा मयत अमोल येरटे हा अक्कलकोट रोडवरील आदर्श सुझुकीमध्ये सिनिअर मॅनेजर म्हणून कामाला होता. त्याच्या पश्चात आई, वडील, पत्नी आणि दोन मुले असा परिवार आहे. तिसरा मयत कादर हांडे हा देखील आदर्श सुझुकीमध्ये मॅनेजर म्हणून काम करत होते. त्याच्या पश्चात आई-वडील, पत्नी, दोन मुली आणि एक मुलगा असा परिवार असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

## मित्राला वाचवताना तरुणाचा मृत्यू

**सदाशिवनगर, दि. ७ मे-**

मित्रांसोबत पोहण्यासाठी गेलेल्या पानीव (ता. माळशिरस) येथील युवकाचा नीरा उजवा कालव्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. आकाश सतीश मदने (वय २२) असे मृत युवकाचे नाव असून, बुडणाऱ्या मित्राला वाचवताना त्याने स्वतःचा जीव गमावला.



आकाश मदने व त्याचे चार मित्र बुधवार, दि. ६ मे रोजी दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास निकमवाडी (खुड्स) येथील नीरा उजवा कालवा येथे पोहण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांच्या मित्रांपैकी एक जण पाण्याच्या जोरदार प्रवाहात बुडू लागला. प्रसंगावधान राखत आकाशने तत्काळ पाण्यात उडी घेत मित्राला सुरक्षितपणे तटावर आणले. मात्र, त्यानंतर स्वतः दमल्यामुळे तो पाण्यात बुडाला. ही घटना लक्षात येताच पानीव परिसरातील तसेच आजूबाजूच्या ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. रात्री उशिरापर्यंत शोधमोहीम राबविण्यात आली; मात्र आकाशचा शोध लागला नाही. अखेर गुरुवारी त्याचा मृतदेह आढळून आला.

# दळणवळणाच्या सुविधांसाठी ७४० कोटींची मंजुरी

**आ.सुभाष देशमुख यांनी गडकरींचे मानले आभार**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मे-**

सोलापूर जिल्ह्याच्या दळणवळण व पायाभूत सुविधांच्या सर्वांगीण विकासाला मोठी चालना देणाऱ्या -४६५ अंतर्गत मोहोळ बसवनगर (तेरा मैल) वळसंग या ८१.३७ कि.मी. मार्गासाठी ७४०.३८ कोटींच्या निधीस मंजुरी दिल्याबद्दल केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची सोलापूरचे आमदार सुभाष देशमुख यांनी सदिच्छा भेट घेऊन मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

यावेळी गडकरी यांनी सोलापूरच्या विकासासाठी केंद्र सरकार कायम कटिबद्ध असून, आवश्यकतेनुसार आणखी निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागांमधील दळणवळण अधिक सुरक्षित, वेगवान व सक्षम होणार आहे. औद्योगिक गुंतवणूक, कृषी म ालवाहतूक आणि व्यापारी हालचालींना मोठी गती मिळून स्थानिक अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळणार आहे.

सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी पायाभूत सुविधांचे बळकटीकरण अत्यावश्यक असून, हा प्रकल्प जिल्ह्याच्या प्रगतीतील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे, असा विश्वास आमदार देशमुख यांनी व्यक्त केला.

# मोहोळ-वळसंग राष्ट्रीय महामार्गासाठी निधी आमच्या दोघांमुळेच

- आ.कल्याणशेट्टींचा खा.शिंदेंवर पलटवार; ७४० कोटींच्या महामार्गावरून श्रेयवाद पेटला
- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून आम्हाला पत्रही प्राप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मे -**

मोहोळ-वळसंग राष्ट्रीय महामार्गासाठी ७४० कोटींचा निधी हा आमदार सुभाष देशमुख व मी अशा आम्हा दोघांच्या प्रयत्नांमुळेच मिळाला असल्याचा दावा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केला आहे. सदर निधी मंजुरीबाबत खासदार प्रणिती शिंदे यांनी केलेल्या दाव्यावर त्यांनी पलटवार केला आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजित पवार व मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांची गुरुवारी भेट घेऊन विविध विषयावर चर्चा केली. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना ते पुढे म्हणाले, जिल्हा नियोजन समितीच्या निधीसाठी खासदार प्रणिती शिंदे यांच्यावर आंदोलन करण्याची वेळ आली असताना मोहोळ-वळसंग राष्ट्रीय महामार्गासाठी ७४० कोटींचा निधी त्यांच्या पाठपुराव्यामुळे मंजूर झाला, हा त्यांचा दावा हास्यास्पद आहे.

या कामाचा आराखडा मंजूर झाल्यानंतर केंद्रीय रस्ते व वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांना पत्र लिहून खासदार शिंदे यांनी राष्ट्रीय महामार्गाच्या कामाचे श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न चालविला. मोहोळ-वळसंग राष्ट्रीय महामार्गासाठी ७४० कोटी रुपये मंजूर झाले. यासाठी आमदार देशमुख यांच्यासोबत आपणही प्रयत्न केले.



त्यामुळे या कामाचे श्रेय सुभाषबापूंसह मलाही आहे. केंद्रीय मंत्री गडकरी यांच्याकडून या कामाला मंजुरी मिळाल्यानंतर आमदार देशमुख व मलाही पत्र प्राप्त झाले.

आमदार सुभाष देशमुख हे आमचे ज्येष्ठ नेते आहेत. त्यांचे व केंद्रीय मंत्री गडकरी यांचे जिव्हाळ्याचे संबंध जगजाहीर आहेत, असे सांगायलाही ते विसरले नाहीत. स्थानिक नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी नेत्यांनी सतत दिल्ली-मुंबई न करता मतदारसंघात थांबणे गरजेचे आहे. मात्र खासदार शिंदे मतदारसंघाच्या विकासाऐवजी कायम दिल्ली-मुंबई वारीवर असतात.

देशात काँग्रेस नेते राहुल गांधी तर सोलापुरात खासदार शिंदे यांच्या भूमिकेने काँग्रेस पक्षाचा सुपडा साफ होत आहे. त्यामुळे अप्रत्यक्षरीत्या भारतीय जनता पक्षाला त्या बळच देत आहेत, असा उपरोधिक टोलाही त्यांनी लगाविला.

**ना.गडकरी सोलापुरात**



अक्कलकोट तालुक्यातील विविध रस्त्यांच्या लोकार्पण व उद्घाटन कार्यक्रमासाठी केंद्रीय रस्ते व वाहतूकमंत्री नितीन गडकरी हे १४ मे रोजी अक्कलकोट दौऱ्यावर येत आहेत, असे आ.कल्याणशेट्टी यांनी सांगितले.



# वरुण राजाच्या साक्षीने जुळल्या १० जोडप्यांच्या रेशीमगाठी

- नरेंद्र काळे मित्र परिवारातर्फे सामुदायिक विवाह सोहळा
- सजवलेल्या बग्गीतून वधूवरांची वरात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मे-**

सायंकाळची अल्हाददायक वेळ.... वऱ्हाडी मंडळींची लगबग... मान्यवरांची उपस्थिती आणि सुस्वर मंगलाष्टके अन् वरुणराजाची उपस्थिती अशा वातावरणात १० जोडप्यांच्या रेशीमगाठी जुळल्या. निमित्त होते नरेंद्र काळे मित्र परिवारातर्फे आयोजित सामुदायिक विवाह सोहळ्याचे.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त सोलापूर महानगरपालिकेचे सभागृह नेते नरेंद्र काळे आणि मित्र परिवारातर्फे गुरुवारी सायंकाळी गोरज मुहूर्तावर टाकळीकर मंगल कार्यालयात सामुदायिक विवाह सोहळा झाला. विवाहाप्रसंगी पावसाच्या हलक्या सरींची बरसात करून जणू वरुण राजानेही नवदाम्पत्यांना आशीर्वाद दिले.

याप्रसंगी व्यासपीठावर पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, माजी आमदार दिलीप माने, सोमलिंग घुली महाराज, सिद्धलिंग महाराज, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, मनोरमा परिवाराचे प्रमुख श्रीकांत मोरे, महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, उपायुक्त वीणा पवार, स्थायी समितीच्या सभापती रंजिता चाकोते, भाजप शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, उद्योगवर्धिनीच्या संस्थापिका चंद्रिका चौहान, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमर पाटील, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, गोविंद काळे, सुमन काळे, संयोजक आणि सोलापूर महानगरपालिकेचे सभागृह नेते नरेंद्र काळे, रजनी काळे यांची प्रमुख उपस्थित होती.

गुरुवारी सकाळी टाकळीकर मंगल कार्यालयात वधू-वरांच्या देव अक्षता झाल्या. यावेळी वधू-वरांना सफारी, शालू, मणी मंगळसूत्र, जोडवे, चप्पल, बूट, संसारोपयोगी भांडी, पुस्तके देण्यात आली. यावेळी शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, राम तडवळकर, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंग राजपूत, चंद्रिका चौहान, सिद्धेश्वर पाटील, राजेंद्र हजारे, बाळासाहेब शेळके, अर्जुन सलगर, डॉ. योगेश राठोड, गोविंद काळे, सुमन काळे, संयोजक नरेंद्र काळे, रजनी काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. किट वाटपानंतर सर्व विवाह विधी करण्यात आले. विवाह विधीनंतर सर्व वऱ्हाडिंनी सुग्रास भोजनाचा आस्वाद घेतला.

सायंकाळी हजारो सोलापूरकरांच्या उपस्थितीत गोरज मुहूर्तावर अक्षता सोहळा झाला. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे,आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी संबोधित केले. सभागृह नेते नरेंद्र काळे यांचा वाढदिवसानिमित्त पालकमंत्र्यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक तर मंगेश लामकाने यांनी सूत्रसंचालन केले.

**सुग्रास भोजनाचा आस्वाद**

पुरी, चपाती, पापड, गुलाब जामुन, जीरा राईस, दाल तडका, बटाटा रस्सा भाजी, दही चटणी असा सुरुची भोजनाचा बेत होता. सायंकाळी वधू-वरांची सजवलेल्या बग्गीतून जुळे सोलापूर परिसरातून वरात काढण्यात आली.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर | शुक्रवार, ८ मे २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


# बोगस डॉक्टरांचा उच्छाद; १३ वर्षात केवळ ८७ गुन्हे दाखल

- ग्रामीण जनतेचे जीव धोक्यात
- कारवाईच्या फाईली धुळखात पडून
- समित्या राहिल्या कागदावरच



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मे-**

सोलापूर जिल्ह्यात बोगस डॉक्टरांनी उच्छाद मांडला असून यामुळे ग्रामीण जनतेचे जीव धोक्यात आल्याचे दिसून येत आहे. मुंबई नर्सिंग होम अॅक्ट अंतर्गत कोणतीही अधिकृत नोंदणी नसताना वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या कथित डॉक्टरांविरोधात गेल्या १३ वर्षात केवळ ८७ गुन्हे दाखल करण्यात आले. कारवाईच्या फाईली धुळखात पडून असल्याचे सांगण्यात येते. विशेष म्हणजे, दाखल करण्यात आलेल्या ८७ गुन्ह्यांपैकी ३७ कारवाया एकट्या २०१५-१६ या वर्षात तत्कालीन जिल्हाधिकारी तुकाराम मुंढे यांच्या कार्यकाळात झाल्या होत्या. त्यानंतरची मोहीम मात्र अक्षरशः थंड बासनात गेल्याचे चित्र आहे.

बार्शी तालुक्यातील उपळाई ठोंगे येथे कथित बोगस डॉक्टरांच्या उपचारादरम्यान तानाजी नरहरी सुतार यांचा मृत्यू झाल्यानंतर हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

ग्रामीण भागात मूळव्याध, भगेंद्र, गुप्तरोग आणि विविध आजारांवर उपचाराच्या नावाखाली 'बंगाली बाबू' आणि पूर्वाश्रमीचे कंपाउंडर खुलेआम दवाखाने चालवत असल्याचे वास्तव समोर येत आहे. वैद्यकीय शिक्षणाचा कोणताही अधिकृत आधार नसतानाही हे लोक इंजेक्शन, सलाईन, औषधोपचार आणि अगदी किरकोळ शस्त्रक्रियाही करत असल्याचे बोलले जात आहे. अनधिकृत वैद्यकीय व्यवसाय रोखण्यासाठी राज्य शासनाने ७ फेब्रुवारी २००० रोजी जिल्हा, तालुका, महानगरपालिका आणि नगरपालिका स्तरावर स्वतंत्र समित्या स्थापन करण्याचे आदेश दिले होते. जिल्हाधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्याधिकारी यांच्यासह विविध अधिकाऱ्यांचा या समित्यांमध्ये समावेश करण्यात आला. मात्र या समित्या केवळ कागदावरच राहिल्याची टीका होऊ लागली आहे.

**प्रशासनाचा ढिसाळ कारभार**

सन २०१४-१५ मध्ये ७, २०१५-१६ मध्ये ३७, २०१६-१७ मध्ये ५ तर २०१७-१८ मध्ये एकही गुन्हा दाखल झाला नव्हता. त्यानंतरही कारवाईची संख्या अत्यल्प राहिली. २०२५-२६ मध्ये १३ कारवाया झाल्या. यावरुन प्रशासनाचा ढिसाळ कारभार असल्याचे स्पष्ट होते.

**दक्षिण सोलापूर तालुक्यात सर्वाधिक कारवाई**

सोलापूर जिल्ह्यातील तालुकानिहाय कारवाईचा विचार केला असता, दक्षिण सोलापूरमध्ये सर्वाधिक १४, अक्कलकोट व बार्शीत प्रत्येकी १२, सांगोल्यात १०, पंढरपूर आणि करमाळ्यात ९ अशा कारवाया झाल्या आहेत.

**संयुक्त मोहिमेचे देण्यात आले निर्देश**

उपळाई ठोंगे येथील घटनेनंतर जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आरोग्य, महसूल आणि पोलिस प्रशासनाच्या संयुक्त मोहिमेचे निर्देश दिले आहेत. संशयास्पद डॉक्टरांविषयी नागरिकांनी तहसीलदार, गटविकास अधिकारी किंवा तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बदली प्रक्रियेवर राहणार कॅमेऱ्याची नजर



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मे-**

सोलापूर जिल्हा परिषदेत गेल्या अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना अखेर वेग आला आहे. दि.१२ व १३ मे २०२६ रोजी जिल्हास्तरीय बदली प्रक्रिया पार पडणार आहे. यंदा बदल्यांमध्ये पारदर्शकता राखण्यासाठी संपूर्ण प्रक्रियेचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. यावरुन या प्रक्रियेवर कॅमेऱ्याची नजर राहणार असल्याचे स्पष्ट होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी सन २०२६ मधील प्रशासकीय, विनंती व आपसी बदल्यांचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात ही प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) स्मिता पाटील यांनी याबाबत माहिती दिली. दि.१२ मे रोजी सकाळी १० वाजल्यापासून प्रशासन विभागातील सहायक व कनिष्ठ प्रशासन अधिकारी, वरिष्ठ-कनिष्ठ सहाय्यक, परिचर व वाहनचालक यांच्या बदल्यांना सुरुवात होणार आहे. त्यानंतर महिला व बालविकास विभाग, शिक्षण विभागातील विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांच्या बदल्या होणार आहेत. दि.१३ मे रोजी अर्थ, कृषी, बांधकाम, जलसंधारण, पाणीपुरवठा आणि पशुसंवर्धन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची बदली प्रक्रिया पार पडणार आहे.

यंदा प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र वेळ निश्चित करण्यात आल्याने प्रक्रिया अधिक शिस्तबध्दरित्या होणार आहे. तालुकास्तरीय बदल्यांसाठी स्वतंत्र वेळापत्रक नंतर जाहीर केले जाणार आहे, असे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले. दरम्यान, जुन्या वेळापत्रकात प्रशासकीय कारणास्तव बदल करण्यात आल्याने अनेक कर्मचाऱ्यांची उत्सुकता आणखी वाढली आहे.

## ११ वर्षाच्या मुलावर अनैसर्गिक अत्याचार

- आरोपीस तीन दिवसाची पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मे-**

घरासमोर खेळणाऱ्या एका अकरा वर्षाच्या अल्पवयीन मुलावर अनैसर्गिक अत्याचार केल्याप्रकरणी अटकेत असलेला आरोपी सिध्दाराम उर्फ सिध्दय्या देवप्रभू सलगर (रा. सोलापूर) यास गुरुवार, दि.७ मे २०२६ रोजी न्यायालयात हजर केले असता त्याला तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

बुधवार, दि.६ मे २०२६ रोजी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात वरील आरोपीवर भारतीय न्याय संहिता कलम ३५२, ३५१ (२) आणि पोक्सो कायद्याच्या कलम ४, ८, १२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येऊन त्याला अटक करण्यात आली होती. याबाबत पीडित मुलाच्या आईने दिलेल्या फिर्यादीत नमूद आहे आहे की, पीडित मुलगा हा दि. ४ मे २०२६ रोजी घरासमोर खेळत होता. तेव्हा आरोपीने त्याला जबरदस्तीने आपल्या घरात नेऊन त्याच्यावर अत्याचार केला. शेजारील एका महिलेने घडलेल्या प्रकाराबाबत माहिती दिली. त्यानुसार मुलाला विश्वासात घेऊन विचारणा केली असता, त्याने रडत रडत सर्व आपबिती सांगितली.

## द्वारकाधीश मंदिरात सामुदायिक मुंजी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मे-**

येथील विजापूर रोडवरील द्वारकाधीश मंदिरात गुरुवारी बहुभाषिक ब्राह्मण समाजातील पाच बटूंचे सामुदायिक मौजीबंधन अर्थात सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा पार पडला. द्वारकाधीश मंदिरचे व्यवस्थापक दत्तात्रय पाठक, लता पाठक यांच्यातर्फे हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.




प्रारंभी द्वारकाधीश मंदिरातील गोमातेचे पूजन करण्यात आले. मातृभोजन विधी होऊन बटूंची वरात काढून त्यांना देवदर्शनासाठी नेण्यात आले. बटूंवर अक्षतांचा वर्षाव करून आणि गुलाब पाकळ्यांची ऊधळण करण्यात आले. वैभव शिरसीकर, कुमार शिरशीकर, ऋषिकेश भावार्थी, कौस्तुभ जोशी यांनी पौरोहित्य केले.

ओजस पेशवे, अनुज गिरवलकर, प्रणव खंडेलवाल, आश्रय दायमा, प्रियेश दायमा या बटूंवर उपनयन संस्कार झाले.

दरम्यान, विजय कुलकर्णी यांची ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल नगरसेविकाद्वय संगीता जाधव, रोहिणी तळवळकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात. याप्रसंगी द्वारकाधीश मंदिराचे ट्रस्टी जयेश पटेल, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेचे उपाध्यक्ष दत्ता आराध्ये, कोषाध्यक्ष सतीश पाटील, राम तडवळकर, निशिकांत खेडकर, श्रीपाद दीक्षित, आश्लेषा निपुणगे, स्वाती कुलकर्णी, चंद्रकला मंगळवेढेकर, सुनिता बोदले आदी उपस्थित होते.



## बोरामणी येथील राखीव वन जमिनीवरील अनधिकृत अतिक्रमण हटविण्यात आले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मे-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी येथील दावल मलिकबाबा पीर परिसरातील राखीव वन जमिनीवर करण्यात आलेले अनधिकृत अतिक्रमण वन विभागाने पोलिस बंदोबस्तात हटवले आहे. या कारवाई अंतर्गत येथील अनधिकृत पक्की बांधकामे, शेड्स जमीनदोस्त करण्यात आली. दरम्यान, या कारवाईमुळे वन जमिनी बळकावणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

बोरामणी येथील गट नं. ७६९ (जुना सर्व्हे नं. ३३८, क्षेत्र १५०.९१ हे.) ही जमीन भारतीय वन अधिनियम १८७८ नुसार १८८४ मध्येच राखीव वन म्हणून घोषित करण्यात आली आहे. या जमिनीवर जून २०२५ मध्ये पत्राशेड, टपऱ्या, पक्की बांधकामे आणि पाण्याच्या टाक्या असे अनधिकृत अतिक्रमण निदर्शनास आले होते.

वनरक्षक गंगाधर कणबस यांनी याप्रकरणी भारतीय वन अधिनियम १९२७ च्या विविध कलमांनुसार वनगुन्हा (क्र.-०१/२०२५) दाखल केला होता. या अतिक्रमणाबाबत विधिमंडळाच्या २०२५ च्या पावसाळी अधिवेशनातही लक्षवेधी सूचना मांडण्यात आली होती. याप्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकारी आणि सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो) सोलापूर यांनी १५ अतिक्रमणधारकांना वेळोवेळी नोटिसा बजावल्या होत्या. अतिक्रमणधारकांच्या वतीने दावल मलिक दर्गा ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी आपली बाजू मांडली, मात्र त्यांना जमिनीवर हक्क सांगणारा कोणताही ठोस पुरावा सादर करता आला नाही. अखेर २६ फेब्रुवारी २०२६ रोजी सहाय्यक वनसंरक्षकांनी हे अतिक्रमण निष्कासित करण्याचे आदेश दिले होते.

पुण्याचे वनसंरक्षक (प्रा.) आशिष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. यामध्ये सोलापूरचे उपवनसंरक्षक कुलराज सिंह, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, सहाय्यक वनसंरक्षक अजित शिंदे, ऐश्वर्या शिंदे आदी सहभागी झाले होते. आर.ए. गांगर्डे (सोलापूर), आर.एस. आटोळे (माळशिरस), योगेश घोडके (मोहोळ), एस. व्ही. मगर (सांगोला), एस.बी. चाटे (पंढरपूर), ए.एन. करे (बार्शी) यांच्या पथकाने ही कामगिरी बजाविली.



## गाड्या फोडताना मध्ये गेल्याने महिलेसह दोघांना मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मे-**

घराजवळील गाड्या फोडताना सोडविण्यासाठी मध्ये गेले असताना एका महिलेसह दोघा जणांना लाथाबुक्क्या व लाकडाने मारहाण करण्यात आल्याची घटना शेळगी परिसरातील दहिटणे येथे घडली. प्रदीपसिंग राजारामसिंग दिकित (वय-४५), पल्लवी मनोजसिंग राजपूत (वय-४५, दोघेही रा.दहिटणे, शेळगी, सोलापूर) असे मारहाण झालेल्यांची नावे आहेत.

ते दोघे बुधवारी रात्री घराजवळ बसले असताना महेश लोहार हा तेथे थांबलेल्या गाड्या फोडत होता. ते सोडविण्यासाठी हे दोघे गेले असता त्यांना लोहार यांनी मारहाण केली. त्यात सर्व अंगाला मुका मार लागल्याने गुल्फाम पठाण याने त्या दोघांना येथील रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले.

**जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेकडे जिल्ह्याचे लक्ष**

## विकास, निधी, राजकीय रणनीतींची रंगणार कसोटी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मे-**

सोलापूर जिल्हा परिषदेची १५ मे रोजी होणारी सर्वसाधारण सभा केवळ नियमित काम काजापुरती मर्यादित राहणार नसून, आगामी राजकीय समीकरणांची दिशा ठरविणारी ठरणार असल्याची चर्चा जिल्हा परिषद वर्तुळात रंगू लागली आहे. विकासकामे, निधी वाटप, सामाजिक कल्याण योजना आणि ग्रामीण भागातील प्रलंबित प्रश्नांवरून प्रशासनाला धारेवर धरण्याची चिन्हे दिसत आहेत.

दुपारी २ वाजता होणाऱ्या या सभेत जिल्हा परिषदेचे सन २०२५-२६ चे सुधारित आणि २०२६-२७ चे मूळ अंदाजपत्रक सादर होणार आहे. त्यामुळे कोणत्या विभागाला किती निधी, कोणत्या तालुक्याला किती प्राधान्य आणि कोणत्या कामांना हिरवा कंदील मिळणार याकडे सदस्यांचे लक्ष लागले आहे. ग्रामीण भागातील रस्ते, अंगणवाड्या आणि सामाजिक योजनांसाठीच्या तरतुदींवरून राजकीय आरोप-प्रत्यारोप रंगण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

समाजकल्याण विभागाकडून सादर होणाऱ्या शेळीगट योजना आणि दिव्यांगांसाठी ई-बाईक योजनेलाही विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. ग्रामीण भागातील मागासवर्गीय आणि दिव्यांग मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी या योजनांचा वापर 'राजकीय संदेश' म्हणून केला जात असल्याची चर्चा सुरू आहे. योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता राखली जाईल का, लाभार्थी निवडीत स्थानिक दबाव गटांचा प्रभाव राहणार का, यावर विरोधकांकडून प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता आहे. माढा, अक्कलकोट आणि मोहोळ तालुक्यातील धोकादायक इमारती पाडण्याचा प्रस्तावही चर्चेचा विषय ठरणार आहे. अनेक ठिकाणी निष्काळजीपणामुळे दुर्घटनांचा धोका निर्माण झाला असून प्रशासनाने उशिरा का होईना कारवाईचा मार्ग स्वीकारल्याचे बोलले जात आहे. पंढरपूर, माळशिरससह जिल्ह्यातील अवर्गीकृत रस्त्यांना ग्रामीण मार्ग म्हणून दर्जोन्नती देण्याचा प्रस्ताव स्थानिक राजकारणाच्या केंद्रस्थानी राहणार आहे.

महिला व बालकल्याण विभागाकडून अंगणवाड्यांसाठी साहित्य खरेदी आणि इमारत दुरुस्ती आराखडा सादर होणार असून, प्रत्यक्ष कामांपेक्षा कागदोपत्री मंजुरीवरच भर राहतो का, यावरही चर्चा रंगण्याची चिन्हे आहेत. १५ मेची जिल्हा परिषद सभा ही केवळ प्रशासकीय बैठक न राहता विकासाच्या मुद्द्यांवरून राजकीय ताकद आजमावण्याचे व्यासपीठ ठरणार असल्याचे चित्र दिसत आहे.

## तीन महिन्यात कार्यवाही न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणार : डागोर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मे-**

सोलापूर महापालिकेतील लाड-पागे कमिटी अंतर्गत वारसांना ३० दिवसात नियुक्ती आदेश देणे बंधनकारक आहे. सफाई कामगारांना सुरक्षा साधने घेण्यासाठी थेट त्यांच्या खात्यावर पैसे जमा करावेत. पाच लाखांचा कॅशलेस विमा उतरवण्याची कार्यवाही करावी यांसह विविध सूचनांची येत्या तीन महिन्यात कार्यवाही करावी. अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, इशारा महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी पत्रकार परिषदेत दिला.



दरम्यान, सोलापूर महापालिका येथे त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली. यावेळी अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, संदीप कारंजे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, मुख्य लेखा अधिकारी डॉ.रत्नराज जवळगेकर आदी उपस्थित होते.

सफाई कामगारांसाठीच्या आवास योजनेची शासन आदेशानुसार अंमलबजावणी करण्यात आली नाही त्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या बैठकीत दोन महिन्याचा वेळ दिला आहे. बुधवार पेठ येथील सफाई कामगारांच्या वसाहतीची थेट पाहणी केली. या वसाहतीची दुर्दशा झाली आहे. येथील सफाई कामगारांचे तातडीने इतरत्र पुनर्वसन करून ही वसाहत पुन्हा उभा करावी, अशा सूचना दिल्या आहेत. कॅशलेस विमा तातडीने राबविण्याची सूचनाही केली आहे. प्रतिपूर्ती रक्कमही दोन दोन वर्ष मिळत नाही. ही गंभीर बाब आहे. याचा लाभ मिळावा यासाठी आरोग्याधिकारी डॉ.राखी माने यांची नोडल अधिकारी म्हणूनही नियुक्ती करण्याच्या सूचना दिल्या आहेत, असेही त्यांनी सांगितले.

सफाई कामगारांसाठी सामाजिक न्याय विभागाअंतर्गत विविध योजना लागू आहेत मात्र या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचल्या जात नाहीत. कागदावरच राहतात. शिष्यवृत्ती, सायकल, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण यासह विविध योजनांचा लाभ त्यांना मिळावा याकरिता महापालिका प्रशासनाने तातडीने शिबिर घेऊन त्या योजनाची अंमलबजावणी करावी, असे स्पष्ट केले. लोकसंख्येच्या आधारावर सफाई कर्मचारी आवश्यक असतात. दर १ हजार लोकसंख्येमागे एक कर्मचारी असे प्रमाण आहे. नव्या जनगणनेनुसार त्याची रचना करणे आता गरजेचे आहे. त्याचा प्रस्तावही नगर विकास विभागाकडे पाठविण्यात येणार आहे, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

सद्यस्थितीत सोलापूर महापालिका प्रशासनात अधिकचे ६१ कर्मचारी कार्यरत आहेत. यावेळी लाड पागे कमिटी अंतर्गत सोलापूर महापालिकेतील ३७ वारसांना नियुक्ती आदेश अध्यक्ष शेरसिंग डागोर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. शैक्षणिक अर्हतेनुसार या नियुक्त्या दिल्या आहेत. यामध्ये १३ कनिष्ठ लिपिक आणि दोन अभियंता पदी नियुक्ती दिली आहे. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक रजाक पेंढारी यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

**सुरक्षा साहित्यासाठीची रक्कम थेट कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा करावी**

सफाई कर्मचाऱ्यांना सुरक्षा साहित्य देणे आवश्यक आहे. ड्रेस, गम बूट यासह इतर सुरक्षा साहित्य त्यांना वेळेत देण्यात यावे. या साहित्य खरेदीसाठी विलंब होतो तेव्हा महापालिका प्रशासनाने हे साहित्यसाठीची रक्कम डीबीटी द्वारे थेट संबंधित कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा करावे, असेही स्पष्ट आदेश अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी दिले आहेत.

**समिती गठीत करून लाड अंतर्गत प्रकरणे मार्गी लावावी**

लाड-पागे कमिटी अंतर्गत वारसांना अर्ज दिल्यानंतर तीस दिवसाच्या आत नियुक्ती आदेश देणे बंधनकारक आहे. प्रशासनाने अर्ज दिल्याच्या तारखेपासून ३० दिवसात या नियुक्ती आदेश द्याव्यात. विलंब झाले तरीही ४५ ही वयोमर्यादा ग्राह्य न धरता त्यांना नियुक्ती आदेश द्यावेत, असे सूचित केले. लाड कमिटी अंतर्गत सद्यस्थितीत सोलापूर महापालिकेत ९३१ प्रकरणे प्रलंबित आहेत. समिती गठीत करुन त्याचीही कार्यवाही करण्यात यावी, असेही त्यांनी सांगितले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १४३४

**कोठें न दिसे पाहतां ।**
**उडी घाली अवचिता ।।**

ज्याला स्वत:चा खरा शोध लागला नाही, त्याला देवाचा शोध लागण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. हे सत्य असले तरी अनेक लोक स्वत:चा शोध घेत देवाचा शोध घेण्याचा प्रयत्न करीत असतात. मुळात स्वत:च्या शोधाची पहिली व अत्यावश्यक पायरीच ओलांडली नाही तर ईश्वराच्या अस्तित्वाची दुसरी पायरी ओलांडता येणे किंवा जाणता येणे अशक्य असते. स्वत:चा खरा परिचय होणाऱ्याला ईश्वराच्या अस्तित्वाचा सहज शोध लागतो, त्याची अनुभूतीही येते. ईश्वर हा शोधायला गेल्याने सापडणारा नाही. त्याचा शोध कर्तृत्वातून लागतो. आपले कर्तृत्व अहंकाररहित व नीती नियमाला अनुसरुन असेल तर ईश्वर दूर नाही. आपण अहंकार, ईर्षा, द्वेष, मत्सर, काम, क्रोध, स्वार्थ आदिचा नायनाट करून वागत असलो तर आपल्या कोणत्याही कार्यात आपणाला यश आल्याचे दिसून येईल. आपल्या सत्कार्यात, सकारात्मक दृष्टीत आपोआप भर पडल्याचेही आपणाला जाणवू लागेल. अर्थात हे सर्व आपल्या वृत्ती, स्वभावावर अवलंबून आहे. आपली सकारात्मक दृष्टी, कष्टाळू वृत्ती, अहंकार व स्वार्थरहितता आपल्या कार्यात ईश्वराला मदतीला उभी करते. पाहूनही न दिसणारा भगवंत आपले कार्य पूर्णत्वास नेत असल्याची आपणास जाणीव होते. आपले कर्तव्य हाच ईश्वर असल्याने कर्तव्याच्या पूर्ततेत कसलीही बाधा येत नाही. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, कोठें न दिसे पाहतां । उडी घाली अवचिता ।।



आपल्या कार्यावर आपला विश्वास असायला हवा. आपण जे करतो आहोत किंवा करणार आहोत त्यात कसलाही अहंकार, ईर्षा, द्वेष नसावा. अशा कार्याला सकारात्मक दृष्टीची जोड असावी. आपला विश्वास, आपली सकारात्मक दृष्टी व अहंकाररहितता यांची गोळाबेरीज म्हणजेच आपल्या कार्याला ईश्वराचा पाठिंबा होय. आपण कर्मच करायचे नाही किंवा चुकीचे कर्म करायचे आणि ईश्वराने मदत करावी अशी अपेक्षा करायची म्हणजे निव्वळ वेडेपणा होय. आपण स्वत:च आपले ईश्वर होऊ शकतो. आपले कर्तृत्व आपणाला ईश्वराचे स्थान मिळवून देऊ शकते. आपल्या कर्तृत्वातून आपण चांगते बोलते ईश्वर होऊ शकतो. कर्तव्याकडे पाठ फिरवून केवळ नामस्मरण केल्याने किंवा उपवास, व्रत केल्याने ईश्वराच्या अस्तित्वाची प्रचिती येत नाही. आपल्या वाट्याला आलेल्या कर्माला लाथाडणे किंवा त्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे ईश्वराकडे दुर्लक्ष करणे होय. आपल्या कर्तव्याची सुरुवात आपण आपल्या घरातून करायला हवी. आई-वडीलांची सेवा करणे, वडीलधाऱ्यांशी नीट वागणे, नागरिक म्हणून कर्तव्य पार पाडणे, पावलो-पावली निती-नियमाचे पालन करणे इत्यादी कर्तव्य पार पाडणाऱ्याला न दिसणारा ईश्वर मदत करीत असल्याचे जाणवल्याशिवाय राहत नाही. कारण त्याचे चालते-बोलते कार्य हेच ईश्वरस्वरुप असते. जय जय राम कृष्ण हरी.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शुक्रवार,**
**दि. ८ मे २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - वैशाख, कृ. चतुर्थी**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- उत्तराषाढा (२१.१९)**
**योग - शुभ (२६.२९)**
**करण - विष्टी (२५.१५)**
**राहू काल : शुक्रवार**
**१.३० ते ३.००**

**दिनविशेष :**
**१९६२: पश्चिम बंगाल येथील कोलकाता रवींद्र भारती विद्यापिठाची स्थापना.**
**१९४५: दुसरे महायुद्ध युरोप विजय दिन - जर्मनीची दोस्त राष्ट्रांसमोर बिनशर्त शरणागती, युरोपमधील युद्ध समाप्त.**
**१९३३: महात्मा गांधी यांनी ब्रिटिश राजवटीविरुद्ध आपले २१ दिवसांचे उपोषण सुरू केले.**

# विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे १४ मे पासून आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मे-**

प्रलंबित मागण्यासाठी राज्यातील विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी १४ मे पासून आंदोल करण्याचे महाराष्ट्र राज्य विद्यापीठ व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीने ठरविले. त्यानुसार त्यांनी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री आणि शिक्षण संचालक यांनी निवेदन दिले असल्याचे समितीचे अध्यक्ष अजय देशमुख यांनी कळविले आहे.



त्यांनी दिलेल्या निवेदनात असे नमूद आहे की, जिव्हाळ्याचे व अत्यंत महत्त्वाचे प्रश्न अनेक महिन्यांपासून वित्त विभागाकडे प्रलंबित आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही वित्त विभागाला जाग येत नाही. ज्या पालक विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत आहोत, तो विभागदेखील हे प्रश्न मार्गी लावण्यात असमर्थ ठरत आहे. त्यामुळे आपल्या न्याय्य व हक्काच्या मागण्यांसाठी आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याची वेळ आली आहे. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगांतर्गत लागू असलेल्या सुविधा मिळतात; मात्र त्याच सुविधा मिळविण्यासाठी विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रत्येक वेळी संघर्ष करावा लागतो. शासनाच्या या सख्ख्या-सावत्र भूमिकेचा आम्ही तीव्र निषेध करीत आहोत. वाढती महागाई, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि आर्थिक ताण यांचा ताळमेळ साधताना शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना किती मोठी कसरत करावी लागते, याची जाणीव मंत्रालयातील अधिकाऱ्यांना नसावी, असेच दुर्दैवाने वाटते. आपल्या प्रामाणिक सेवेला न्याय मिळावा, कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांना आर्थिक स्थैर्य मिळावे आणि समान न्यायाच्या तत्त्वानुसार शासनाने निर्णय घ्यावा, हीच आपल्या आंदोलनामागील प्रमुख भावना आहे.

यासाठी सोलापूर विभागातील सर्व महाविद्यालय व विद्यापीठ शिक्षकेतर सेवक आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठ कर्मचारी संघटनेच सुनील थोरात. अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघ संघटक राजाराम माने, अध्यक्ष भीमा मस्के यांनी केले आहे.

### आंदोलनाचे टप्पे

१४ ते १६ मे : काळ्या फिती लावून काम करणे, १८ ते २० मे : दुपारच्या सुट्टीत धरणे, निषेध व घोषणाबाजी करणे, २५ मे: लेखणी बंद, २९मे : विभागीय सहसंचालक कार्यालयासमोर धरणे, १ जून : एक दिवस काम बंद करणे (अत्यावश्यक सेवा वगळून), ८ जूनपासून : बेमुदत संपावर.



# आदर्श शिक्षिका कुदसिया मणियार यांचा सेवानिवृत्तीनिमित्त गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मे-**

सोशल असोसिएशन उर्दू प्राथमिक शाळेतील ३५ वर्षे सहशिक्षिका म्हणून सेवा बजावलेल्या शिक्षिका कुदसिया मनियार यांचा सेवानिवृत्ती निमित्त मौलाना आझाद उर्दू हायस्कूलचे मुख्याध्यापक इरफान केरूल यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेली मुख्याध्यापक डॉ. आसिफ इक्बाल, शिक्षिका कुदसिया मनियार, शरीफ भागनगरी आदी उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात केरूल यांनी मनियार यांच्या सेवेला प्रेरणादायी असल्याचे नमूद केले.

प्रास्ताविकात मुख्याध्यापक डॉ. आसिफ इक्बाल यांच्यावर स्वतः रचलेले गीत तालबद्ध सादर करून उपस्थितांची मने जिंकली.यावेळी गुलशन खान, रिजवाना प्यारे, शबाना काझी, रेहाना शेख तसेच मनीयार यांचे भाऊ अमीर खुसरो, शरीफ भागनगरी आदींनीही मनोगत व्यक्त केले. शहजादी महसूलदार यांनी नात सादर केली तर शबाना काझी यांनी हम्द पठण केले. सूत्रसंचालन मोईज अहमद तर आभार अनीसा नालबंद यांनी मानले.




# शंकरसेठ साबळे नेत्र रुग्णालय येथे ६५१० रुग्णांना मिळाली नवसंजीवनी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मे-**

पुणे अंधजन मंडळाचे शंकर सेठ साबळे नेत्र रुग्णालय, सोलापूर, प्रकल्प एच व्ही देसाई नेत्र रुग्णालययांनी नेत्रसेवेच्या क्षेत्रात आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला असून रुग्णालयात आतापर्यंत ६५१० यशस्वी नेत्रशस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या आहेत. सोलापूर जिल्ह्यासह लातूर, धाराशिव आणि आसपासच्या ग्रामीण भागातील हजारो गरजू रुग्णांना या सेवांचा लाभ मिळत आहे.

लहान गावांमधून येणारे शेतकरी, कामगार, मजूर तसेच विविध आर्थिक परिस्थितीतील रुग्णांवर अत्याधुनिक सुविधांद्वारे डोळ्यांचे उपचार करण्यात आले आहेत. रुग्णालयामध्ये सर्व प्रकारच्या नेत्ररोगांवर उपचार उपलब्ध असून सर्वसामान्य नागरिकांसाठी परवडणाऱ्या दरात उत्कृष्ट सेवा दिली जाते. रुग्णालयात आधुनिक मॉड्युलर ऑपरेशन थिएटर्स, उच्च दर्जाची नेत्र तपासणी सुविधा तसेच अनुभवी व उच्चशिक्षित डॉक्टरांची टीम कार्यरत आहे. रुग्णांच्या सोयीसाठी सर्वसमावेशक नेत्र तपासणी व गुणवत्तापूर्ण उपचार सेवा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

यावेळी असोसिएट डायरेक्टर सुधीर सुधाळ यांनी सांगितले की, ''डोळ्यांच्या कोणत्याही समस्येकडे दुर्लक्ष करू नका. शंकर सेठ साबळे नेत्र रुग्णालय, सोलापूर येथे आधुनिक तंत्रज्ञानासह विश्वासार्ह व परवडणाऱ्या उपचार सुविधा उपलब्ध आहेत. अधिकाधिक नागरिकांनी या सेवांचा लाभ घ्यावा. मोतीबिंदू मुक्त गाव करण्यासाठी अभियान राबविण्यात येत आहे. त्यासाठी लागणारी संपूर्ण यंत्रणा उपलब्ध असून ग्रामपंचायत, विविध सामाजिक संस्था यांनी सहकार्य करावे.''

# काव्यप्रेमी शिक्षक मंचचे विविध पुरस्कार जाहीर

## रविवारी सोलापुरात पुरस्कार वितरण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मे-**

काव्यप्रेमी शिक्षक मंचच्या वतीने काव्यप्रेमी साहित्य संस्था प्रेरणा व शीघ्र कवी बादशाह पुरस्कार वितरण सोहळा रविवार दि. १० मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता लोकमान्य टिळक सभागृह, हिराचंद नेमचंद वाचनालय, किल्ला बागेसमोर आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती राज्य सचिव कालिदास चवडेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुहास पुजारी तर अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. इ.जा. तांबोळी हे राहणार आहेत. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मसाप पुणेचे राज्य प्रतिनिधी पद्माकर कुलकर्णी हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी राज्य अध्यक्ष आनंद घोडके, राज्यसचिव कालिदास चवडेकर , कृष्णा शिंदे यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. याप्रसंगी सकाळी १० वाजता राज्यस्तरीय कवी संमेलन होणार आहे. गटशिक्षणाधिकारी जयश्री सुतार या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. यावेळी निमंत्रित कवी उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर सकाळी ११ वाजता राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. या निमित्ताने विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभही होणार आहे तसेच प्रमोद बाविस्कर लिखित ''पाची बोटं सारखी नसतात'' या कविता संग्रहाचे प्रकाशन होणार आहे.

या पत्रकार परिषदेस नरेंद्र गुंडेली, कृष्णा शिंदे, आनंद घोडके, श्रीमंत कोळी, महेश रायखेलकर आदी उपस्थित होते.

# दुसरे महायुध्द लाभार्थ्यांनी हयातीचे दाखले जमा करावेत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ७ मे-**




जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे सोलापूर जिल्ह्यातील दुसरे महायुद्ध लाभार्थ्यांनी शासनाच्या प्रचलित नियमानुसार माहे मे २०२६ अखेरपर्यंत आपले हयातीचे दाखले जमा करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने लाभार्थ्यांनी आपला हयातीचा दाखला तसेच आधार कार्ड, पॅन कार्ड, ओळखपत्र व बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाद्वारे ३१ मे २०२६ पर्यंत जमा करावीत. अन्यथा त्यांचे अनुदान माहे मे २०२६ पासून बंद करण्यात येणार असून, हयातीचे दाखले प्राप्त झाल्यानंतर फरकासह अनुदान अदा करण्यात येईल. तसेच ज्या लाभार्थ्यांचे निधन झाले आहे, अशा लाभार्थ्यांच्या अवलंबितांनी मृत्यूचा दाखला अर्जासह लवकरात लवकर कार्यालयात जमा करावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार यांनी केले आहे.



# डब्ल्यूआयटी-सँडविक कराराने खुलली नवी दारे

## अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या करिअरला मिळाली यशाची झेप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मे-**

वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि सँडविक यांच्यात झालेला सामंजस्य करार हा केवळ शैक्षणिक उपक्रम न राहता विद्यार्थ्यांच्या भविष्यास आकार देणारा परिवर्तनाचा नवा अध्याय ठरत आहे.

उद्योगविश्वाशी थेट नाळ जोडत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा परिचय, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रकल्पांमध्ये सहभाग, तसेच प्रतिष्ठित कंपन्यांमध्ये करिअर घडविण्याची संधी उपलब्ध करून देणारा हा उपक्रम डब्ल्यू.आय.टी.च्या दूरदृष्टीचा ठोस प्रत्यय देणारा आहे. या करारामुळे विद्यार्थी केवळ पदवीधर न राहता आत्मविश्वासपूर्ण, कौशल्यसंपन्न आणि जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यास सक्षम अभियंते म्हणून घडणार आहेत. डब्ल्यू.आय.टी.ने अभ्यासक्रमात मास्टरकॅम या जागतिक दर्जाच्या सॉफ्टवेअरचा समावेश करून विद्यार्थ्यांसाठी ज्ञान आणि कौशल्य यांचा प्रभावी संगम घडवून आणला आहे. 'डिझाईन ते मॅन्युफॅक्चरिंग' या संपूर्ण प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव घेताना विद्यार्थ्यांना उत्पादन क्षेत्रातील सूक्ष्म बारकावे समजून घेता येत आहेत. 'मास्टरकॅम युनिव्हर्सिटी सर्टिफिकेशन'मुळे विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता प्राप्त प्रमाणपत्र मिळवण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली असून, त्यांच्या रोजगारक्षमतेत लक्षणीय वाढ होत आहे. याशिवाय 'ट्रेन-द-ट्रेनर' उपक्रमाद्वारे प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना २ऊ/३ऊ मॉडेलिंग, मल्टी-क्सिस मशिनिंग, हाय-स्पीड मशिनिंग आणि सिम्युलेशन यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास उंचावून ते बदलत्या तंत्रज्ञानाशी सुसंगत राहण्यास सक्षम होत आहेत.


संस्थेमध्ये स्थापन करण्यात आलेले 'सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर ॲडव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंग' हे आधुनिक तंत्रज्ञानाचे केंद्रबिंदू ठरत असून, डिजिटल मॅन्युफॅक्चरिंग, प्रिसिजन इंजिनिअरिंग, सीएनसी प्रोग्रामिंग आणि इंडस्ट्री ४.० यांसारख्या प्रगत संकल्पनांवर आधारित प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना उद्योगांच्या अपेक्षांनुसार स्वतःला घडविण्याची आणि करिअरचा स्पष्ट मार्ग निश्चित करण्याची संधी मिळत आहे.

या उपक्रमामुळे लाईव्ह प्रोजेक्ट्स, इंटर्नशिप आणि तज्ज्ञ मार्गदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची विश्लेषणक्षमता, नवोन्मेषी विचारशक्ती आणि समस्या सोडवण्याची क्षमता अधिक सक्षम होत आहे. परिणामी, ते 'इंडस्ट्री-रेडी' बनून रोजगाराच्या संधी अधिक प्रभावीपणे साध्य करू शकतात. या उपक्रमासाठी वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त वैभव गांधी, भूषण शहा, पराग शहा, प्राचार्य डॉ. विजय आठवले आणि विभागप्रमुख डॉ. भाग्येश देशमुख यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# महापालिका शाळांना नवसंजीवनी देण्याची हीच योग्य वेळ !

## गुणवत्ता, सुरक्षितता, आधुनिक सुविधा आणि समर्पित शिक्षक यांचा संगम आवश्यक

सोलापूर महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाने आगामी शैक्षणिक वर्षासाठी घेतलेले निर्णय हे केवळ प्रशासकीय घोषणांपुरते मर्यादित नसून महापालिका शिक्षण व्यवस्थेला नवसंजीवनी देण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल ठरू शकते. १७ टक्के पटसंख्या वाढीचे उद्दिष्ट, 'मिशन स्कॉलरशिप'च्या माध्यमातून गुणवत्तावाढ, इयत्ता पहिलीसाठी उत्कृष्ट शिक्षकांची नियुक्ती आणि सप्टेंबर २०२६ पर्यंत सर्व विद्यार्थ्यांना वाचन, लेखन व संख्याज्ञान सक्षम करण्याचा निर्धार ही निश्चितच सकारात्मक बाब आहे.



सोलापूर महापालिका शिक्षण मंडळाचे ६२.८५ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक मंजूर झाले असून त्यामध्ये शिक्षकांचे वेतन, सातव्या वेतन आयोगाची थकबाकी, नवीन इमारती, वर्गखोल्या व दुरुस्ती यासाठी मोठी तरतूद करण्यात आली आहे. विशेष म्हणजे नवीन वर्गखोल्या व इमारतींसाठी ३ कोटी ३६ लाख रुपये आणि दुरुस्तीसाठी १ कोटी ७१ लाख रुपयांची तरतूद ही विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा देण्याच्या दृष्टीने आशादायी आहे. महापालिकेने भरीव तरतूद केली आहे. दरम्यान, आगामी शैक्षणिक वर्षाच्या पूर्वतयारीसाठी महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या सर्व शिक्षकांची सहविचार सभा उत्साहात पार पडली. या सभेस महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे नियंत्रण अधिकारी तथा मुख्य लेखा अधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर, प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांच्या मार्गदर्शनाखाली विविध शैक्षणिक विषयांचा आढावा घेतला. ही महत्वपूर्ण घटना आहे.




आज महापालिकेच्या ६३ शाळांमध्ये सुमारे ५ हजार १७० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र पूर्वी मंजूर ७२२ शिक्षक पदांपैकी केवळ २२० शिक्षक कार्यरत असल्याची वस्तुस्थिती चिंताजनक आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शिक्षकांची संख्या वाढविणे ही काळाची गरज आहे. शिक्षकांवर अतिरिक्त ताण राहिल्यास शैक्षणिक गुणवत्ता टिकविणे कठीण होणार आहे.

महापालिका शाळांविषयी पालकांचा दृष्टिकोन अद्याप सकारात्मक झालेला नाही, ही वस्तुस्थिती स्वीकारावी लागेल. त्यामागे अस्वच्छ परिसर, अपुऱ्या भौतिक सुविधा, शाळा परिसरातील असुरक्षित वातावरण आणि वाढती खाजगी शाळांची स्पर्धा ही कारणे आहेत. काही शाळा परिसरात रात्री होणारे अनावश्यक प्रकार, दारू व सिगारेट सेवन करणाऱ्यांचा वावर, उघड्यावर लघुशंका यामुळे पालकांमध्ये नकारात्मक भावना निर्माण होते. त्यामुळे प्रत्येक शाळेत सीसीटीव्ही, सुरक्षा रक्षक आणि स्वच्छ, सुरक्षित परिसर निर्माण करणे अत्यावश्यक आहे.

बालवर्गातील विद्यार्थ्यांसाठी गणवेश, खेळणी आणि आकर्षक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. गेल्या तीन वर्षांपासून गणवेश न मिळणे ही बाब प्रशासनाने गांभीर्याने घ्यायला हवी. लहान मुलांसाठी शाळेचे वातावरण आनंददायी आणि आकर्षक असेल तरच पालकांचा विश्वास वाढेल.महापालिका शिक्षण मंडळाने इंग्रजी अध्यापनासाठी विशेष उपक्रम राबविण्याचा घेतलेला निर्णयही योग्य दिशेने टाकलेले पाऊल आहे. आज इंग्रजी माध्यमाकडे वाढणारा कल लक्षात घेता मराठीबरोबर प्रभावी इंग्रजी शिक्षण देणे आवश्यक बनले आहे.

यासोबतच शिक्षक बदली धोरणाची काटेकोर अंमलबजावणीही गरजेची आहे. सन २०२३ मध्ये निश्चित केलेले दहा वर्षांचे धोरण प्रत्यक्षात राबविले गेले तर प्रशासनात गतिमानता येईल आणि शिक्षकांमध्येही सकारात्मकता निर्माण होईल. महापालिका शाळा म्हणजे गरीबांची शाळा हा समाजातील गैरसमज मोडून काढण्याची वेळ आता आली आहे. गुणवत्ता, सुरक्षितता, आधुनिक सुविधा आणि समर्पित शिक्षक यांचा संगम घडवून आणला तर महापालिका शाळा पुन्हा एकदा पालकांच्या पहिल्या पसंतीचा पर्याय ठरू शकतात. आता गरज आहे ती केवळ घोषणांची नाही, तर लोक सहभाग, आमदार - नगरसेवकांचे पाठबळ, सातत्यपूर्ण आणि प्रामाणिक अंमलबजावणीची आहे.

## महत्वाचे...



### ‘उत्कर्ष’च्या वाणिज्य १०० तर विज्ञान विभागाचा ९५ टक्के निकाल

**सांगोला,दि.७ मे -**

उत्कर्ष उच्च माध्यमिक विद्यालय, सांगोला मधील बारावी वाणिज्य विभागाने शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली. शास्त्र विभागाचा निकाल ९५ टक्के लागला. शास्त्र विभागातील स्वप्नाली पिसे ९१.३३, जुई केळकर ८६.६७, हिर्णय जाधव ८१.३३ तसेच वाणिज्य विभागातून प्रथमेश कंठीमठ ६८.८३, स्वप्निल तानगावडे ६३.६७, अनिकेत जगदाळे ६१.३३ टक्के गुण मिळवून अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केला. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थापिका डॉ.संजीवनी केळकर, संस्थाध्यक्षा प्रा. निलिमा कुलकर्णी, सचिव वसुंधरा कुलकर्णी, कोशाध्यक्ष डॉ. शालिनी कुलकर्णी, सहसचिव डॉ.केतकी देशपांडे, प्राचार्य सुनील कुलकर्णी यांनी अभिनंदन केले.

### पिलीव येथील शेतातील पंधरा सोलर प्लेटची चोरी

**पिलीव दि. ७ मे -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील सदाशिव गबाले व त्यांच्या आई कमल गबाले या दोघांच्याही शेतात बसविलेल्या सोलर पॅनलमधील पंधरा प्लेटची चोरी झाली आहे. सुमारे १ लाख ८७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. चोरीस गेलेल्या एकाची प्लेटची किंमत जवळपास १२ हजार ५०० रुपये आहे. एकुण १५ प्लेट मिळून १ लाख ८७ हजार रुपयांच्या मालाची चोरी झाली आहे. नव्याने मोठा खर्च करुन सदरचा सोलर पॅनल बसवला होता, पण याची चोरी झाल्यामुळे मोठी अडचण झाली आहे. चोरीची तक्रार पिलीव पोलीस ठाण्यात दिली आहे.

### कुसमोड येथील डिपीमधील ऑईलची चोरी; ऐन उन्हाळ्यात शेतकरी हतबल

**पिलीव दि. ७ मे -**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील शंकर लेंगरे डिपीमधील जवळपास १५० लिटर ऑईलची बुधवारी रात्री चोरी झाली. बाजारभावानूसार सुमारे अठरा हजाराचे नुकसान झाले आहे. हा डिपी चांदापुरी-कुसमोड रस्त्यालगत ओढ्याजवळ आहे. ऐन उन्हाळ्यात सदरच्या ऑईलची चोरी झाल्यामुळे या डिपीवरील वीजपुरवठा खंडीत झाला आहे. परिणामी शेतकरी हतबल झाला आहे. उन्हाळ्यात




पिकांना पाण्याची प्रचंड गरज असते, पण सध्या वीजपुरवठा खंडीत झाल्यामुळे पिके जळून चालली आहेत. याबाबत पिलीव पोलीस दूरक्षेत्र तसेच महावितरण पिलीव यांच्याकडे शेतकऱ्यांनी तक्रार दिली आहे. यावर कुसमोडचे सरपंच शहाजी लेंगरे, प्रा. सुग्रीव लेंगरे, नबाजी मदने, सूर्यकांत वाघमोडे, अंकुश लेंगरे, सुभाष काळे, महेश लेंगरे यांच्यासह अनेक शेतकऱ्यांच्या या निवेदनावर सह्या आहेत. महावितरणकडून सदरच्या डिपीमध्ये ऑईल भरुन देण्याची मागणी होत आहे.

### सांगोल्यात आज छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराचे आयोजन

**सांगोला,दि.७ मे -**

जिल्हाधिकारी सोलापूर, उपविभागीय अधिकारी मंगळवेढा यांचे मार्गदर्शनाखाली आज शुक्रवार दि.८ मे रोजी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मृतिभवन, सांगोला येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराचे आयोजन करण्यात आली असल्याची माहिती तहसिलदार बाळु भागवत यांनी दिली. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अंतर्गत ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसुल प्रभागांशी संबंधीत दैनंदिनी प्रश्नांचे निराकरण करण्यात येणार असून जनतेच्या तक्रारी जलद निकाली काढण्यात येणार आहेत. तरी सांगोला तालुक्यातील नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन तहसिलदार भागवत यांनी केले आहे.

# अखेर ‘कर्मवीर’ विद्यालयासमोरील अनधिकृत होर्डिंग्ज हटवली

**दैनिक ‘तरुण भारत’च्या वृताचा दणका**

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ७ मे -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयासमोर अनधिकृत होर्डिंग्जमुळे शाळाच दिसत नव्हती. याबाबत दैनिक ‘तरुण भारत’ने वृत्त प्रसिद्ध केल्यानंतर ती होर्डिंग्ज तातडीने हटवण्यात आली आहेत.

विद्यालयासमोरील अनधिकृत होर्डिंग्जमुळे शाळा न दिसण्याबरोबरच विद्यालयासमोरील विद्यार्थ्यांनी लावलेल्या सायकलच्या चोऱ्या होत होत्या. अनेक विद्यार्थी त्रस्त झाले होते. यामुळे शाळेसमोरील अनधिकृत होर्डिंग्ज ताबडतोब हटविण्याबाबत दैनिक तरुण भारतच्या प्रतिनिधीकडे व्यथा मांडली होती. विद्यार्थ्यांच्या मागणीवरून त्यांच्या व्यथांना वाचा फोडण्यासाठी दैनिक तरुण भारतने ५ मे रोजी वृत्त प्रसिद्ध केले होते. याच दणक्याने शाळेसमोरील सर्व अनधिकृत होर्डिंग्ज हटविण्यात आली आहेत. यामुळे शाळेने अक्षरशः मोकळा श्वास घेतला आहे. आता बसस्थानकावरुन याठिकाणी विद्यालयाची इमारत दिसत आहे.




कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय समोरील अनधिकृत होर्डिंग्ज हटविल्यावर दिसणारी शाळा.






पिलीवमधील अनधिकृत होर्डिंग्ज ताबडतोब हटविण्याची मागणी

# टेंभुर्णीत गाडीची काच फोडून लाखाची बॅग लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ७ मे -**

हॉटेलमध्ये मित्रासोबत चहा पित बसलेला असताना संधीचा फायदा घेऊन दुचाकीवरून पाळत ठेवून आलेल्या दोघांनी गाडीची काच फोडून १ लाख रूपये असलेली बॅग लंपास केली. ही घटना मंगळवार दि.५ रोजी हॉटेल जय शिवशंकर समोर अकलूज चौक टेंभुर्णी येथे घडली. चोरी करताना चोरटे सीसीटीव्हीत कैद झाले आहेत.

नागनाथ मेनकुदळे, रा.वरवडे, ता.माढा, जि.सोलापूर हे मंगळवार दि. ५ रोजी दुपारी १.१५ मिनिटांनी बँक ऑफ बडोदा शाखेतून पैसे घेऊन आपली चारचाकी क्र. एम.एच.१३ सी.एस.७२५५ या गाडीमध्ये पैशाची बॅग घेऊन निघाले होते.अकलूज चौकातील हॉटेल जय शिवशंकर समोर रस्त्यावर गाडी उभी केली. बँकेतून काढलेले एक लाख रूपये असलेली काळी बॅग गाडीच्या मधील सीटवर ठेवून गाडी लॉक करून मित्र अशोक मस्के, रा. शेवरे, ता. माढा व शांतीलाल खुळे, रा. टेंभूर्णी यांच्यासह चहा पित बसले होते. चहापानानंतर २.३० वाजण्याच्या दरम्यान गाडीजवळ गेल्यानंतर त्यांना गाडीची काच फोडून एक लाख रूपये रक्कम असलेली बॅग चोरून नेल्याचे लक्षात आले. नंतर त्यांनी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.पो.हे.कॉ. शिवाजी जाधव प्रकरणाचा तपास करीत आहेत.

**दुचाकीवरून पाळत ठेवून बॅगची चोरी**

चोरीची ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली असून दोन चोरटे एका दुचाकीवरून गाडीच्या मागोमाग आले. गाडीजवळ कोणी नाही याचा फायदा घेत एकाने कशाने तरी बोलोरो गाडीची काच फोडली. नंतर सीटवर ठेवलेली बॅग घेऊन दोघे दुचाकीवरून पसार होतानाचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झाले आहे.

# आढेगाव पाटी येथे सव्वा लाखांची अवैध दारु जप्त

**सद्‌गुरु हॉटेलवर छापा; बापलेकावर गुन्हा**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.७ मे-**

टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राहुल आत्राम यांच्या पथकाने पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर टेंभूर्णीजवळील आढेगाव शिवारातील उजनी पाटी येथे असलेल्या सदगुरु हॉटेलसमोर केलेल्या कारवाईत १२१५६० रुपयांची अवैध देशी-विदेशी दारु जप्त केली. ५ मे रोजी रात्री ११ वाजता छापा टाकून ओमीनी कार व अवैध दारू साठा जप्त केला.

कारवाईत विठ्ठल बिरा कोळेकर-पाटील, पिंटू विठ्ठल कोळेकर-पाटील रा. आढेगाव ता. माढा या बापलेकांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. ओमीनी कारमधून अवैध देशी-विदेशी दारू विक्री होत असल्याची गुप्त माहिती मिळाल्यावर परिविक्षाधीन अधिकारी राहुल आत्राम यांनी पथकासह हॉटेल सदगुरूवर छापा टाकला. तेव्हा ओमीनी कार क्र. एमएच ४२ एच ०७३१ ही हॉटेलच्या बाहेर लावलेली आढळून आली. तिच्या तपासणीत कारमध्ये विविध देशी-विदेशी दारुंच्या तब्बल ११ हजार १८२ बाटल्या १ लाख २१ हजार ५६० रूपये किंमतीचा अवैध देशी विदेशी दारूचा साठा सापडला. त्यानंतर हा दारुसाठा तसेच ओमीनी कारसह २ लाख ५१ हजार ५६० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी विठ्ठल बिरा कोळेकर-पाटील, पिंटू विठ्ठल कोळेकर पाटील पिता पुत्रावर टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक भीम गोळे हे करीत आहेत.



# हिरेजेवर्गी येथील श्री शांतलिंगेश्वर हिरेमठच्या नव्या वास्तूचा शुभारंभ

**प्रथमेश इंगळे, शिवाचार्य व स्वामींची उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि ७ मे -**

अफजलपूर तालुक्यातील श्रीक्षेत्र हिरेजेवर्गी येथील श्री शांतलिंगेश्वर हिरेमठच्या नव्या वास्तूचा शुभारंभ आज मोठया भक्तीभावात झाला. यावेळी

श्रीशैल श्रीपीठाचे जगद्गुरु डॉ. चन्नसिद्धाराम पंडिताराध्य शिवाचार्य भागवतपद, काशी श्रीपीठाचे जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य भागवतपद यांच्या सान्निध्यात अफजलपूरचे विश्वाराध्य मलेंद्र शिवाचार्य, चौडापूरचे सिद्धराम शिवाचार्य, गौरा बु.चे कैलासलिंग शिवाचार्य, हिरेअल्लगीचे शांतलिंग शिवाचार्य, अक्कलकोटचे बसवलिंग महास्वामी, मुगळीचे भोगेश्वर महाराज, श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन, नगरसेवक महेश इंगळे यांचे पूत्र प्रथमेश इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

यावेळी श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने हिरेजेवर्गी मठाचे मठाधिपती श्री जयगुरुशांत लिंगाराध्य शिवाचार्य यांचा प्रथमेश इंगळे यांनी श्री.स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सत्कार केला. हिरेजेवर्गी मठाच्या वतीने मठाधिपती श्री जयगुरुशांत लिंगाराध्य शिवाचार्य यांनी प्रथमेश इंगळे यांचा आशिर्वाद देवून सन्मान केला. आज ब्रह्म मुहूर्तावर झालेल्या श्री शांतलिंगेश्वर सिंहासनावर शिवलिंगाची प्रतिष्ठापना, कलशारोहण व धर्मसभेस महेश इंगळे- प्रथमेश इंगळे यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कडगंची येथील वीरभद्र शिवाचार्य होते. यावेळी अक्कलकोटचे पत्रकार विरुपाक्ष कुंभार, रमेश शिंदे, श्रीशैल गवंडी, सुनिल पवार, ग्रामस्थ व भाविक उपस्थित होते.



# पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या सर्व शाखांना प्रवेशासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.७ मे -**

स्थानिक शैक्षणिक क्षेत्रात भक्कम परंपरा आणि गुणवत्तेचा ठसा उमटवणाऱ्या पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या सर्व शैक्षणिक शाखांमध्ये यावर्षी प्रवेशासाठी पालकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे.

संस्थेच्या सर्व शाखांमध्ये आधुनिक सोयी-सुविधा, तंत्रयुक्त व संगणकीय शिक्षण, पूर्णपणे डिजिटल शैक्षणिक प्रशासन यामुळे शिक्षण प्रक्रियेला नवे परिमाण प्राप्त झाले आहे. विद्यार्थी केंद्रित शिक्षण पद्धतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि नेतृत्वगुणांचा विकास होत आहे. उन्हाळी सुट्टीत इयत्ता १० वी आणि ५ वीच्या विद्यार्थ्यांना विशेष मिळते. दरवर्षी दहावीच्या परीक्षेत प्रत्येक शाखेतून ९० टक्यांपेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या किमान ५० विद्यार्थ्यांची परंपरा ही संस्थेच्या गुणवत्तेची साक्ष देते. याशिवाय एन.एन.एम.एस. टि.म.वि.,विज्ञान, स्कॉलरशिप, गणित व इतर स्पर्धात्मक परीक्षेत या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी सातत्याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे.


संस्थेच्या यशामागे चेअरमन वीणा जोशी, अध्यक्ष नाना कवठेकर, मानद सचिव सु.र.पटवर्धन, तसेच सु.त्रि.अभ्यंकर आणि इतर सदस्यांचे दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शन लाभत आहे. याबरोबरच कवठेकर प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही.वाय.पाटील व द.ह.कवठेकर प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही.एम. कुलकर्णी, आदर्श बाल व प्राथमिकच्या माया सांगोलकर तसेच पंचरत्न इंग्लिश मिडीयम स्कुलच्या मुख्याध्यापिका मोहोळकर यांच्या कुशल नेतृत्वाखाली सर्व शैक्षणिक शाखांची यशाची चढती कमान अधिकाधिक उंचावत आहे. पंढरपूर एज्युकेशन सोसायटी ही गुणवत्तापूर्ण शिक्षणाची एक विश्वासार्ह परंपरा असल्याचे सिद्ध झाले आहे.



# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मिळणार प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ७ मे-**

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना इयत्ता पहिलीत इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत प्रवेश देण्यासाठी योजना राबविण्यात येत आहे. यासाठी विद्यार्थ्यांचे वय दि. ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत ६ वर्षे पूर्ण असावे. जातीचा दाखला, रेशनकार्ड, रहिवासी दाखला, उत्पन्न दाखला यांच्या साक्षांकित प्रती सादर कराव्यात. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दि. ३१ मे २०२६ आहे. अधिक माहितीसाठी बी. के. आंदळकर, कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन प्रकल्प अधिकारी धनंजय झाकर्डे (सोलापूर बी.एस.एन.एल. कार्यालय, संगमेश्वर कॉलेजसमोर, सात रस्ता, सोलापूर यांनी केले आहे.




# खेडभाळवणी येथे रंगणार महिला सक्षमीकरणाचा सोहळा

**एकता महिला मंचतर्फे महिलांच्या स्पर्धा, सन्मानाचे आयोजन**

**आमदार अभिजीत पाटील, आयपीएस प्रशांत डगळे यांची प्रमुख उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ मे.**

महिला सक्षमीकरण आणि सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने, एकता महिला मंच तर्फे शनिवारी ९ मे रोजी खेडभाळवणी (ता.पंढरपूर) येथे विशेष मार्गदर्शन मेळावा, सन्मान सोहळा आणि भव्य महिला स्पर्धेचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती मंचचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर यांनी दिली.

सोहळ्याचे प्रमुख आकर्षण म्हणून आमदार अभिजीत पाटील उपस्थित राहणार आहेत. तसेच, पंढरपूर उपविभागाचे सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, नगराध्यक्षा प्रणिता भालके, जिल्हा परिषद सदस्या मयुरी बागल आणि ग्रामीण पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकारी रेखा घनवट यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी कार्यरत असलेल्या निर्भया पथकाच्या प्रमुख सुप्रिया यादव आणि खेडभाळवणीचे सरपंच डॉ. संतोष साळुंखे हे देखील याप्रसंगी मार्गदर्शन करणार आहेत. सोमेश्वर मंदिर, खेडभाळवणी, ता. पंढरपूर येथे सकाळी १० वाजता या स्पर्धा होणार आहेत. सोहळ्यासाठी एकता महिला मंच, समन्वय समिती खेडभाळवणी आणि एकता महिला मंचच्या मीनाक्षी साळुंखे, प्रियांका दामोदरे, सुरेखा साळूंखे व सर्व पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.



**खेळ, मनोरंजन, लकी ड्रॉचा धमाका**

कार्यक्रमात महिलांच्या उत्साहासाठी विविध स्पर्धा होणार आहेत. त्यात रांगोळी स्पर्धा, संगीत खुर्ची व बिस्किट खाणे, उखाणे स्पर्धा यांचा समावेश आहे.

**विशेष आकर्षण :** कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या महिलांमधून मलबार गोल्ड अँड डायमंड सोलापूर यांच्यातर्फे लकी ड्रॉ काढला जाणार आहे. भाग्यवान विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात येईल.

महिलांनी चूल आणि मूल या पलीकडे जाऊन स्वतःची ओळख निर्माण करावी, या हेतूने आम्ही या मेळाव्याचे आयोजन केले आहे. मान्यवरांचे मार्गदर्शन आणि विविध स्पर्धांच्या माध्यमातून हा सोहळा अविस्मरणीय ठरेल.

**- प्रभाकर क्षीरसागर, प्रमुख, एकता महिला मंच.**

# सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये गुणवंत कर्मचाऱ्यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मे -**

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय तसेच सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, केगाव येथे महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा करण्यात आला. यावेळी गुणवंत कर्मचाऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

प्रारंभी कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या हस्ते तिरंगा ध्वज फडकावण्यात आला. यावेळी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. रवींद्र व्यवहारे, सीआरटीएडचे संशोधन संचालक व ज्येष्ठ संशोधक एस. एच. पवार, पब्लिक स्कूलच्या प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, निखहत शेख, मुख्य प्रबंधक डॉ. डी. आय. नवले यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.




यावेळी विविध प्रवर्गातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा ‘‘बेस्ट एम्प्लॉयी ऑफ द इयर’’ सन्मानपत्र व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी त्यांचा गौरव करताना पुरस्कार विजेत्या कर्मचाऱ्यांचा इतरांनी आदर्श घ्यावा, असे आवाहन केले.

उपक्रमशील विशेष कामगिरी : जुवेरिया शेख, शिपाई : मनोज सलगर, मावशी : करिष्मा मुलानी, अरुणा शिंदे, बस चालक : नूर शेख, वसतिगृह अधीक्षक : सिंधू पोळ, शिक्षकेतर कर्मचारी : विनायक नाळे, कार्यालयीन कर्मचारी : रामकृष्ण लांबतुरे (जनसंपर्क अधिकारी), शिक्षक : शशिकांत लामकाने, (अभियांत्रिकी महाविद्यालय) राजू ठाकूर (पब्लिक स्कूल अँड ज्यूनिअर कॉलेज), १०० टक्के उपस्थिती: गोपाळ नलवडे, स्मिता नवले, शाहीन शेख (मुख्याध्यापिका) अशा वर्गवारीत पुरस्कार वितरित करण्यात आले.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त चित्रकला स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मे-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळ आणि चित्रस्पर्श कलाविहार यांच्या संयुक्त विद्यमाने चित्रकला स्पर्धेचे पारितोषिक वितरण आयुक्त कार्यालयातपार पडले.



आयुक्त सचिन ओम्बासे, महापालिकेचे मुख्य लेखा अधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर, प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी मल्हारी माने, चित्रकार डॉ. सचिन खरात आदी उपस्थित होते. दोन्ही गटातून प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ २ व विशेष पारितोषिक ५ असे १०-१० पारितोषके दिली. प्रथम बक्षीस ट्रॉफी, ३ हजार रुपये, प्रमाणपत्र, चित्रकला साहित्य, पुस्तक. द्वितीय बक्षीस-ट्रॉफी, २ हजार रुपये, प्रमाणपत्र, चित्रकला साहित्य, पुस्तक. तृतीय बक्षीस ट्रॉफी, १ हजार रुपये, प्रमाणपत्र, चित्रकला साहित्य, पुस्तक असे होते. पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिचित्र व त्यांच्या जीवनातील एक प्रसंग या विषयावर स्पर्धा झाली. आयुक्तांनी विद्यार्थी व पालकांचे कौतुक केले. सूत्रसंचालन बाळासाहेब जगताप यांनी केले. पर्यवेक्षक सुरेश कासार आणि सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### महत्त्वाचे...



## प्रियांका गोसावीचा श्री सदगुरु बोधराज भक्त मंडळातर्फे सत्कार

**बार्शी, दि. ७ मे**

बार्शी तालुक्यातील दडशिंगे येथील प्रियंका गोसावी हिने बारावी परीक्षेत तब्बल ८९.३३ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात दुसरा क्रमांक पटकावला आहे. तिच्या यशाबद्दल तिचा श्री सदगुरु बोधराज भक्त मंडळातर्फे सत्कार करण्यात आला. प्रियांकाचे वडील गोरख गोसावी हे खाजगी ड्रायव्हर म्हणून बार्शीत काम करतात. पण प्रियांकाने आपल्या गुणातून कष्टाचे चीज केले आहे. बारावीचा निकाल यंदा कठीण लागला. अशा निकालात ८९.३३ टक्के मिळवणं ही केवळ टक्केवारी नाही, तर एका मध्यमवर्गीय स्वप्नांची उंच भरारी आहे. प्रियंका ही महाराष्ट्र उच्च माध्यमिक विद्यालयात शास्त्र विभागात शिक्षण घेत होती. सामान्य कुटुंब व प्रतिकूल परिस्थितीतून तिने विद्यालयात ८९.३३ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळविला. तिच्या यशाबद्दल हभप जयवंत बोधले महाराज यांनी फोनवरुन शुभेच्छा दिल्या. श्री सद्गुरु बोधराज भक्त मंडळाच्यावतीने प्रा. विलास जगदाळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मंडळाचे सोमनाथ ढगे, पप्पू ढगे, चिंतामणी आण्णा, उद्योजक महेश यादव, ॲड. पी. बी. काटमोरे, श्रीकांत शिंदे आदी सदस्य उपस्थित होते.




## अकलूज येथे ब्राह्मण सेवा संघातर्फे ११ बटुंवर उपनयन संस्कार

**अकलूज दि. ७ -**

अकलूज येथील ब्राह्मण सेवा संघ व श्री गणपती मंदिर ट्रस्ट यांचे वतीने ११ बटुंवर सामुदायिक उपनयन संस्कार करण्यात आले. अकलूज येथील कांतीलाल सांस्कृतिक भवन येथे हा शाही समारंभ पार पडला. समाजातील गरजूना अल्प खर्चात हा संस्कार करता यावा यासाठी ट्रस्टच्या वतीने १९८३ सालापासून हा उपक्रम सुरू केला आहे उपक्रमात विविध भागातून समाज बांधव सहभागी होतात. त्यांची सर्व व्यवस्था ब्राह्मण सेवा संघाकडून होते. कार्यक्रमात बटुंना आशीर्वाद देण्यासाठी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील,किशोरसिंह माने-पाटील,शीतलदेवी मोहिते-पाटील,शिवतेजसिंह मोहिते-पाटील,धनंजय देशमुख, अभय इनामदार, नगरसेवक व मान्यवर उपस्थित होते. पौरोहित्य दिपक कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली हरि कुलकर्णी, अवधूत शेकदार, प्रवीण इनामदार, श्रीराम महाजन, गणेश कुलकर्णी, निलेश कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमासाठी ब्राह्मण सेवा संघ व श्री गणपती मंदिर ट्रस्टच्या सर्व पदाधिकारी व समाजबांधवांनी परिश्रम घेतले.

# यमाई तलाव लगतची जागा मंदिर समितीला दिल्यास आंदोलन

### यमाई तलाव बचाव समितीचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.७ मे -**

येथील यमाई तलाव व लगत असलेली जागा गोशाळेसाठी विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीला देऊ नये, अशी मागणी यमाई तलाव बचाव समितीने केली आहे. जमीन मंदिर समितीला दिल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे.

पंढरपूर नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, नगरसेवक लक्ष्मण शिरसट, गट नेते सुजितकुमार सर्वगोड, नगरसेवक सुनिल वाळूजकर, अमोल डोके, ॲड.गुरुदास अभ्यंकर, धर्मराज घोडके, सौरभ थिटे, इब्राहिम बोहरी, मालोजी शेंबडे, गणेश शिंदे नाईक यांनी जिल्हाधिकारी एस.कार्तिकीयन यांना याबाबत निवेदन दिले. उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे यांनी सांगितले की, यमाई तलावाजवळील गट नं.१६१ मधील ३.१२ हेक्टर जागा श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीच्या गोशाळेचा विस्तार करण्यासाठी देण्याबाबत महसूलमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच मंत्रालय मुंबई येथे बैठक झाली. बैठकीत काहींच्या मागणीवरुन १५ दिवसात जागा मागणी बाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्याची सुचना दिली आहे. वास्तविकत: यमाई तलाव हा ऐतिहासिक आहे. ही जागा नगरपरिषद मालकीची व ताब्यात आहे.



देखभाल, दुरूस्तीही नगरपरिषद करते. मध्यंतरी श्री विठ्ठल रूक्मिणी दर्शनासोबतच पर्यटनाचाही आनंद मिळावा म्हणून राज्य सरोवर संवर्धन योजनेतून हा तलाव कोट्यवधी रूपये खर्चून विकसित केला आहे. सुंदर तुळशी वृंदावन निर्माण केले. वॉकिंग ट्रॅकवर हजारो महिला व पुरूष नागरिक फिरण्यासाठी येतात. पंढरपूर शहरात सुरक्षितपणे व्यायाम करणे, फिरणे आदींसाठी केवळ एकमेव यमाई तलावाची जागा राहिली आहे.

वास्तविकत: नगरपरिषदेने मंदिर समितीला यापुर्वी गोशाळेसाठी ३ एकर जागा दिली आहे. मंदिर समितीमार्फत श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज, संत विद्यापीठ व दर्शन मंडप उभारणीसाठी ती दिली. सध्या तेथे गोपालन होते. तेथील दुध श्रीविठ्ठल रूक्मिणी पुजेसाठी जाते. जास्त प्रमाणात दुध स्थानिक विक्रेत्यांना विकतात. गोशाळेवर मंदिर समितीचे नियंत्रण नाही, गोशाळा व गोपालनाबद्दल तक्रारी आहेत. गोपालनाकडे दुर्लक्षामुळे अनेक गाई, वासरे दगावली. काही कर्मचारी निलंबितही झाले. त्यामुळे गोशाळेसाठी वाढीव ३.१२ हेक्टर जागा देणे योग्य नाही. उलट मंदिर समितीच्या वाखरी, गोपाळपूर, देगाव व पंढरपूर तालुक्यात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात जमिनी आहेत. समिती त्याचे उत्पन्नही घेते. त्यामुळे पुर्वी दिलेली गोशाळेची जागाही काढून तलाव सुशोभीकरणासाठी वापरावी, गोशाळा झाल्यास मलमुत्र, शेण तलावात जावून तलावातील जल व वायू प्रदुषित होईल.

यमाई तलाव सुशोभिकरण, तलावालगत ऑक्सिजन पार्क, खुली व्यायाम शाळा,तुळशी वृंदावनच्या भराव सुशोभिकरण आदींसाठी १ कोटी ७१ लाख रूपयाचा निधी नगरपरिषदेला दिला आहे. निविदाही प्रसिध्द झाल्या. आदींचा विचार करून शासनाने श्रीविठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीस गोशाळेसाठी ३.१२ हेक्टर जमीन देवू नये. अन्यथा यमाई तलाव बचाव समितीतर्फे जन आंदोलनाचा इशारा दिला आहे.

### तलाव बचाव समितीची भुमिका

* तलावा नजीकचे तुळशी वृंदावन पार्क उत्तम व एकमेव पर्यटन, विरंगुळा स्थान * मंदिर समितीला पुर्वी दिलेल्या ३ एकर जागेत आधीच गोशाळा * गोशाळेत कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षाने अनेक जनावरांचा मृत्यू * गोशाळमुळे तलावाचे प्रदुषण, दुर्गंधीचा पर्यटनाला त्रास * तलावालगत ऑक्सिजन पार्क, खुली व्यायाम शाळा बांधल्यास पर्यटनात वाढ

## उन्हाळ्यात वीज पुरवठा पूर्ववत ठेवा



### आ. आवताडे; वीज वितरणच्या अधिकाऱ्यांना सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.७ मे -**

उन्हाळ्यात वीजपुरवठा अधिक सुरळीत राहण्यासाठी सतर्क रहा, जळालेला ट्रांसफार्मर तीन दिवसात बसवा, शेतीपंपाची वीज पूर्ण दाबाने आठ तास द्या, सिंगल फेज वीज पूर्ण दाबाने द्या आदी सूचना आमदार समाधान आवताडे यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

पंढरपूर व मंगळवेढा विभागात वीज पुरवठ्याबाबत येणाऱ्या अडचणीबाबत गुरुवारी मंगळवेढा येथे आमदार समाधान आवताडे यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी ते बोलत होते. महावितरणचे अधिकारी व कर्मचाऱ्यांना शेतकऱ्यांशी नम्रतेने बोलण्याबाबतच्या सूचना दिल्या. तसेच पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी कार्तिकेएन यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून वीजपुरवठ्याबाबत येणाऱ्या अडचणी निदर्शनास आणून दिल्या.

उन्हाळ्यामुळे वीजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्याचा परिणाम वीज वितरण यंत्रणेवर होता आहे. वारंवार वीजपुरवठा खंडित, कमी दाबाने वीज, वीज ट्रांसफार्मर जळण्याच्या घटनांत वाढ झाली आहे. ट्रान्सफार्मर जळाल्यावर तासन्तास वीजपुरवठा बंद राहिला. जळालेले अनेक ट्रांसफार्मर दुरुस्तीसाठी पडून असल्याने वीजपुरवठा सुरळीत करण्यात अडचणी निर्माण होत आहेत. पंढरपूर मंगळवेढा तालुक्यामध्ये जवळपास ४५ ट्रांसफार्मर दुरुस्तीसाठी ऑइल नसल्यामुळे थांबलेले होते, त्यावेळी आमदारांनी अधीक्षक अभियंत्यांना भ्रमणध्वनी द्वारे कळवून २००० लिटर ऑइलची व्यवस्था करण्यास सांगितले. तसेच पेंडिंग ४५ ट्रांसफार्मर लवकरात लवकर देण्यास सांगितले. भीमा नदीतून सोडलेले पाणी औज आणि हिळ्ळी बंधाऱ्यापर्यंत पोहचेपर्यंत वीज पुरवठा तीन तास केला होता. आता त्याठिकाणी पाणी पोचले असून वीजपुरवठा सुरळीत करण्याबाबतही पालकमंत्री व जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले.

यावेळी कार्यकारी अभियंता शिंदे, सहाय्यक कार्यकारी अभियंता देवकर, उपकार्यकारी अभियंता मरळी, उपकार्यकारी अभियंता अकोलकर, मंगळवेढा पंचायत समितीचे सभापती दिपाली ताड, पंढरपूर पंचायत समितीचे सभापती शुभम आगवणे, जिल्हा परिषद सदस्य प्रदीप खांडेकर, जिल्हा परिषद सदस्य रमेश भांजे, जिल्हा परिषद सदस्य जनार्दन शिवशरण, उपसभापती अर्जुन मल्लाळे, पंचायत समिती सदस्य विनायक यादव, विजय माने, श्रीमंत म्हेत्रे, सचिन चव्हाण, दत्ता यादव व इतर पदाधिकारी उपस्थित होते.



## सह्याद्री फार्मसीमधील कार्यशाळेला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.७ मे -**

सह्याद्री कॉलेचे ऑफ फार्मसी, मेथवडे (ता. सांगोला) मधील बी.फार्मसी अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी इंटिग्रेटेड हेल्थकेयर रेडीनेस प्रोग्रॅम या विषयावरील कार्यशाळा दि.४ ते ६ मे दरम्यान झाली. कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यशाळेचे उदघाटन पुणे येथील माईंडवर्कचे डायरेक्टर कमल कुमार, संस्थाध्यक्षा अनिता इंगवले, विश्वस्त विश्वजीत इंगवले, प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने झाले. यावेळी कमल कुमार यांनी हेल्थ इन्शुरन्स पोर्टेबिलिटी अँड अकौंटंयाबिलिटी ॲक्टची गोपनीयता आणि रुग्ण डेटा संरक्षण मानकांशी संबंधित क्षेत्रामधील सखोल व्यावहारिक ज्ञान विशद केले. आरोग्यसेवा संस्था, केपीओ आणि ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्समध्ये आत्मविश्वासाने प्रवेश करून यशस्वी होण्याचे तंत्र सांगितले. व्यक्तिमत्व विकासाबरोबरच मुलाखत कौशल्य, इंग्रजी भाषेचा प्रभावी वापर, प्लेसमेंट स्किल, गटचर्चा आदींबाबतही सविस्तर मार्गदर्शन केले. सहभागी विद्यार्थ्यांना उपस्थिती प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. कार्यशाळेसाठी ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागाचे प्रा.एस.एस.काळे, प्रा.एस. पी.जोकार यांचे योगदान लाभले.

## टिप्परची धडक; वृध्दाचा जागीच मृत्यू

**बार्शी, दि. ७ मे -**

बार्शी तालुक्यातील फफाळवाडी येथे मंगळवारी दुपारी घडलेल्या अपघातात घरासमोर बसलेल्या ५८ वर्षीय वृद्धाचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर टिप्पर चालक वाहन फरार झाला. भगवान क्षीरसागर (वय ५८, रा. फफाळवाडी, ता. बार्शी) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

क्षीरसागर हे दुपारी जेवण करुन घरासमोरील झाडाखाली बसले होते. त्याचवेळी बार्शीकडून खामगावकडे भरधाव वेगात जाणाऱ्या टिप्पर (क्र. एमएच १३ पी. २४३५) ने त्यांना जोरदार धडक दिली. धडकेत क्षीरसागर काही अंतर फरफटत गेले आणि गंभीर जखमी होऊन घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातानंतर चालकाने टिप्पर घटनास्थळीच सोडून पलायन केले. घटनेची माहिती मिळताच बार्शी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. या प्रकरणी चालकाविरुद्ध गुन्हा दाखलकेला असून, फरार चालकाचा शोध सुरु आहे.



# बोगस डॉक्टरांविरोधात जि.प. आक्रमक; तालुका पातळीवर विशेष शोधमोहीम

### तक्रारींसाठी मोबाईल ॲप, संवाद सेतूची तयारी

### ग्रामपातळीवर आरोग्य यंत्रणा अधिक सतर्क करा

### अध्यक्ष दीपक वैद्य यांचे आरोग्य विभागाला निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मे**

बोगस डॉक्टरांच्या जाळ्यावर जिल्हा परिषदेने आक्रमक भूमिका घेतली आहे. जिल्हास्तरीय समितीच्या धर्तीवर तालुका स्तरावर स्वतंत्र आणि अधिक प्रभावी समित्या स्थापन करण्याचे निर्देश दिल्याचे जिल्हा परिषद अध्यक्ष दिपक वैद्य यांनी सांगितले.



नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या बोगस डॉक्टरांविरोधात केवळ कागदी आदेश नव्हे, तर प्रत्यक्ष शोध मोहीम राबविण्याचे संकेत प्रशासनाने दिले आहेत. महाराष्ट्र वैद्यकीय व्यावसायिक अधिनियमांतर्गत अनधिकृत वैद्यकीय व्यवसायावर कारवाईचे अधिकार प्रशासनाला आहेत. त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषद आरोग्य विभागाला अधिक सक्रिय केले जात असल्याचे वैद्य यांनी स्पष्ट केले. गावात बोगस डॉक्टर कार्यरत असल्याचा संशय आल्यास नागरिकांना तात्काळ तक्रारीसाठी मोबाईल ॲप आणि 'संवाद सेतू' प्रणालीशी ही मोहीम जोडणार आहे. त्यामुळे कोणतीही तक्रार दडपली जाणार नाही, असा प्रशासनाचा दावा आहे. नागरिकांनी पुढे येऊन माहिती द्यावी, असे आवाहनही केले आहे. मोहिमेसाठी स्वतंत्र विशेष पथक तयार केले आहे.



पथकात वैद्यकीय अधिकारी, आरोग्य विस्तार अधिकारी, औषध निर्माण अधिकारी, सहाय्यक कर्मचारी, बीट अंमलदार, पोलीस पथक तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाच्या प्रतिनिधींचा समावेश आहे. प्रत्येक अधिकाऱ्यावर स्वतंत्र जबाबदाऱ्या निश्चित केल्या असून तालुकास्तरावर नियमित तपासणी आणि छापेमारी मोहीम राबविण्यात येणार आहे. अलीकडील काही घटनांमुळे कथित बंगाली डॉक्टर, अपात्र कंपाउंडर आणि बनावट प्रमाणपत्रा आधारे सुरू असलेले दवाखाने प्रशासनासाठी आव्हान ठरत आहेत. याच पार्श्वभूमीवर प्रशासनाने 'शोधा आणि कारवाई करा' ही भूमिका स्वीकारली आहे. ग्रामीण भागात डॉक्टरांची कमतरता आणि दुसरीकडे बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट, या दुहेरी संकटामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे प्रशासनाची ही मोहीम प्रभावी पणे राबवली गेली पाहिजे.

### अनियमितता आढळल्यास तत्काळ कारवाई



बोगस डॉक्टरांविरोधात तक्रार प्राप्त झाल्यानंतर संबंधित व्यक्तीची कागदपत्रे, परवाने आणि वैद्यकीय पात्रता तपासली जाईल. कोणतीही अनियमितता आढळल्यास तत्काळ कारवाई केली जाईल.


**- डॉ. सतीश कोपूरवाड, जिल्हा आरोग्य अधिकारी.**

### प्रत्यक्षात प्रभावी कारवाई होणार का?

अध्यक्ष दिपक वैद्य यांनी कठोर कारवाईचे आदेश दिले. मात्र, प्रत्येक दुर्घटनेनंतर प्रशासन जागे होते आणि काही दिवसांनी पुन्हा परिस्थिती जैसे थे होते. त्यामुळे बोगस डॉक्टरांविरोधातील मोहीम बैठका आणि आदेशांपुरती मर्यादित न राहता प्रत्यक्षात प्रभावी कारवाई होणार का, हा प्रश्न आहे.

## श्रीपतपिंपरी येथे तरुण शेतकऱ्याची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि ५ मे -**



तालुक्यातील श्रीपतपिंपरी येथे स्वप्नील नानासाहेब मोरे या २८ वर्षीय शेतकऱ्याने शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेमुळे मोरे कुटुंबासह संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.

स्वप्नील सकाळी १० वाजण्याच्या दरम्यान शेतात गेला होता. मात्र दुपारी २ वाजण्याच्या सुमारास सरपंच रामराजे ताकभाते यांनी फोनद्वारे नानासाहेब मोरे यांना स्वप्नीलने शेतात गळफास घेतल्याची माहिती दिली. त्यानंतर नानासाहेब मोरे, पत्नी सुनीता व धाकटा मुलगा सुजीत यांनी तातडीने शेतात धाव घेतली. यावेळी गावातील शहाजीराजे घाडगे, अतुल काकडे तसेच सरपंच यांनी मदत केली.

स्वप्नीलला झाडावरून खाली उतरवले असता त्याचे शरीर थंड पडल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. याबाबत नानासाहेब मोरे यांनी बार्शी तालुका पोलीस ठाणे येथे माहिती दिली असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. दरम्यान, आत्महत्येचे कारण अद्याप उघडकीस आले नाही.